रविवार, १३ नोव्हेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -९४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 13 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-94 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-14 ● PRICE-5

चर्चेतील बातमी

## मंगला भास्कर यांची घरवापसी

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शिंदे गटात गेलेल्या शिवसेनेच्या जिल्हा संघटक मंगला भास्कर यांनी ठाकरे गटात पुनर्प्रवेश केला आहे. अवघ्या पंधरा दिवसातच त्यांची ठाकरे गटात घरवापसी झाली आहे. उद्धव ठाकरे गटातून अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता. नाशिकमध्येही महिला पदाधिकारी मंगला भास्कर यांनी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचा झेंडा हाती धरला होता. मात्र आता अवघ्या दोन आठवड्यातच त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला सोडचिठ्ठी दिली आहे. पालकमंत्री दादा भुसे, खासदार हेमंत गोडसे, आमदार सुहास कांदे आणि माजी नगरसेवक प्रवीण तिदमे यांच्यासह जिल्ह्यातील एक-दोन माजी आमदार, नेते शिंदे गटात गेलेत. मात्र नाशिकमध्ये शिंदे गटात पाहिजे तशी संघटनात्मक पातळी मजबूत नसल्याचा दावा केला जातो. अशातच कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांची संख्या कमी असतानाच पदाधिकाऱ्याने पुन्हा ठाकरे गटाची वाट धरल्याने आता नाशिक जिल्ह्यातील शिंदे गटाच्या पुढील संघटनात्मक पातळी आणि राजकीय वाटचालीबाबत राजकीय वर्तुळात अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहेत. मागच्या काही दिवसांपूर्वी शिवसेनेच्या जिल्हा संघटक मंगला भास्कर या पालकमंत्री दादा भुसे, खासदार हेमंत गोडसे आणि आ. सुहास कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिंदे गटात गेल्या होत्या.

# मी रोज दोन-तीन किलो शिव्या खातो

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांना खोचक टोला!

आधुनिक केसरी न्यूज

**हैदराबाद : मी आज सकाळी दिल्लीत होतो. नंतर कर्नाटक, तमिळनाडूमध्ये होतो. रात्री आंध्र प्रदेशमध्ये असेन. आत्ता तेलंगणामध्ये आहे. लोक मला विचारतात तुम्ही थकत नाहीत का? मी त्यांना समजावले की हे बघा.. मी रोज दोन-तीन किलो शिव्या खातो. परमात्म्याने माझ्यामध्ये अशी रचना केली आहे की या सगळ्या शिव्या माझ्यामध्ये प्रक्रिया होऊन जीवनसत्वांमध्ये रुपांतरीत होतात. एक सकारात्मक ऊर्जा तयार होते, अशा खोचक शब्दांमध्ये विरोधकांना पंतप्रधान नरेंद्र मोदी टोला लगावला.**

तेलंगणामधील सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करतानाच राज्यात लवकरच कमळ फुलेल, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. तेलंगणाच्या रामगुंडम भागातील बियाणांच्या प्रकल्पाचे यावेळी त्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. तेलंगणामध्ये लवकरच अनेक विकासकामे होणार असल्याची घोषणाही यावेळी मोदींनी केली. तेलंगणाच्या बागमपेटमध्ये झालेल्या कार्यक्रमात मोदींनी तेलंगणा राष्ट्र समितीला उद्देशून खोचक शब्दांत टोलेबाजी केली. तेलंगणामधील जनता ज्या राजकीय पक्षावर सर्वाधिक विश्वास ठेवतात, त्याच पक्षाने तेलंगणाची सर्वात मोठी फसवणूक केली आहे. पण जेव्हा जेव्हा अंधार वाढू लागतो, त्या परिस्थितीत कमळ फुलत असते. तेलंगणामध्येही कमळ फुलताना दिसेल, असे मोदी म्हणाले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तेलंगणामधील सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले. तेलंगणाच्या नावावर जे मोठे झाले, सत्तेत आले त्यांनीच राज्याला मागे ढकलले. तेलंगणा सरकार आणि तेलंगणामधील नेत्यांनी राज्याच्या क्षमतांवर आणि लोकांच्या कौशल्यावर अन्याय केला आहे, असे मोदी म्हणाले.




### आश्वासने पूर्ण न केल्याने तेलंगणात बॅनरबाजी

पंतप्रधान नरेंद्र मोदी दक्षिण भारतातील राज्यांच्या दौऱ्यावर आहेत. काल (११ नोव्हेंबर) पंतप्रधान कर्नाटक आणि तामिळनाडूत होते. आज (१२ नोव्हेंबर) पंतप्रधान मोदी तेलंगणाच्या दौऱ्यावर असून काही प्रकल्पांचे त्यांनी उद्घाटन केले. त्यापूर्वी पंतप्रधान मोदींच्या दौऱ्याला जोरदार विरोध करण्यात आला. शनिवारी रामगुंडम परिसरात पंतप्रधान मोदींच्या विरोधात काही आक्षेपार्ह बॅनर्स लावल्याचे दिसून आले. त्यावर मोदींना रावण असल्याचे दाखवले आहे. तसेच पंतप्रधानांनी तेलंगणाला दिलेल्या नऊ प्रकल्पांच्या आश्वासनाचे काय झाले? असा प्रश्नही विचारण्यात आला आहे. तर दुसरीकडे आज टीआरएसच्या विद्यार्थी संघटनेने उस्मानिया विद्यापीठ परिसरात पंतप्रधानांविरोधात निदर्शने केली. यावेळी 'गो बॅक मोदी'चे नारे लगावण्यात आले. या नारे लगावणाऱ्या विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# सरकार पडण्याच्या वारंवार वावड्या : मुख्यमंत्री

## ठाकरे गटावर टीका : आमदार टिकवून ठेवण्यासाठीच केविलवाणा प्रयत्न



आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** आमचे सरकार तीव्र गतीने काम करणारे आहे. त्यामुळे काहींना पोटशूळ उठत आहे. म्हणूनच राज्यातील सरकार पडणार, अशा वावड्या वारंवार उठवल्या जात आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज भंडाऱ्यात म्हटले आहे. स्वतःचे आमदार टिकवून ठेवण्यासाठी हे केविलवाणा प्रयत्न केला जात आहे, अशा शब्दात त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या सरकार पडणार असल्याच्या दाव्याला उत्तर दिले. भंडाऱ्यात विविध विकास कामांच्या भूमिपूजन नंतर जाहीर सभेत बोलत होते. पुढे शिंदे म्हणाले, सरकार पडेल याचं काहीच लॉजिक विरोधकांकडे नाही. फक्त स्वतःचे आमदार पक्षात टिकविण्याची धडपड करण्यात येत आहे. आमच्याकडे 170 आमदार आहेत. तसेच दररोज नवीन आमदार आणि खासदार आमच्यासोबत येण्यासाठी संपर्क साधत असल्याचा दावाही त्यांनी केला. या सभेत मुख्यमंत्र्यांनी प्रकल्प राज्याबाहेर जात असल्याच्या आरोपांनाही सडेतोड उत्तर दिले. कोणताही मोठा प्रकल्प दोन तीन महिन्यात बाहेर जातो का किंवा राज्यात येतो का? ती काय जादूची कांडी आहे. असे विचारत मुख्यमंत्र्यांनी महाविकास आघाडी आपले पाप आमच्या माथ्यावर मारत असल्याचे सांगितले. आमचे सरकार काम करणारे सरकार असून आम्ही राज्यात उद्योग आणू, अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली. पुढे मुख्यमंत्री म्हणाले, 'समृद्धी महामार्गाचा नागपूर ते शिर्डी दरम्यान काम पूर्ण झाले आहे. सर्वांचा आग्रह आहे की समृद्धी महामार्ग नागपूर पासून पुढे भंडारा आणि गडचिरोली पर्यंत आला पाहिजे. समृद्धी महामार्ग आम्ही भंडारापर्यंत आणण्याचा निर्णय घेतल्याचे शिंदे यांनी सांगितले. आमच्या आमदारांवर पन्नास खोके घेतल्याचा आरोप केला जातो. मात्र आम्ही 50 खोके घेणारे नाही, तर विकासासाठी 200 खोके म्हणजेच विकासासाठी 200 कोटी देणारे आहोत, असंही मुख्यमंत्र्यांनी या जाहीरसभेत केली. मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांची ही विदर्भातील पहिलीच जाहीर सभा होती.

### गजानन किर्तीकर यांच्या अनुभवाचा फायदा होईल

ज्येष्ठ नेते गजानन किर्तीकर यांनी काल शिंदे गटात प्रवेश घेतला. यासंदर्भात बोलताना ते म्हणाले की काल गजानन कीर्तीकर आमच्याकडे आलेत. एक वरिष्ठ नेते खासदार आमच्याकडे आले त्यांच्या अनुभवाचा फायदा आम्हाला होईल, त्यांचं मार्गदर्शन, त्याच्या कामाचा अनुभव याचा फायदा आम्हाला आणि महाराष्ट्राला होईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

## जंगलातांडा गावात डेंग्यूचे थैमान; मुलाचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील जंगलातांडा गावात डेंगूणे एका बारा वर्षीय मुलाचा मृत्यू झाला आहे. प्रमोद प्रेमसिंग चव्हाण असे डेंग्यूमुळे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे तर अर्णव प्रेमसिंग चव्हाण (वय ७), मानवी प्रेमसिंग चव्हाण (वय १५), विक्रम विलास चव्हाण (वय ११), कुणाल राजू राठोड वय(१२), प्रवीण बद्री राठोड (वय १४), किसन रामदास राठोड वय (१५) या डेंगूच्या सहा रुग्णांवर पाचोरा सोयगाव व शेंदुर्णी येथील खाजगी रुग्णालयात वैद्यकीय उपचार करण्यात येत आहेत. विशेष म्हणजे डेंगूने बाधित झालेल्या रुग्णांमध्ये पंधरा वर्षाच्या मुलांची संख्या अधिक आहे.



गावात ठिकठिकाणी नालीचे पाणी साचून निर्माण झालेल्या घाणीच्या साम्राज्यामुळेच जंगलातांडा गावात डेंगूची साथ पसरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या घटनेची माहिती मिळताच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉक्टर श्रीनिवास सोनवणे, यांच्यासह पथकाने गावात सर्वेक्षण केले.

# आला थंडीचा महिना ... शेकोटी हळूच पेटवा !

## दिंडोरी तालुक्यात शेकोटी गप्पा घेताय रंग; उबदार कपडे खरेदीसाठी गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यात यंदा एक दीड महिना गुलाबी थंडीचे आगमन झाले असून शेकोटी च्या गप्पा सध्या रंगू लागल्या आहेत.


यंदाच्या हवामान व वातावरणातील बदलामुळे हिवाळा आणि पावसांळा हे समीकरण नागरिकांना समजलेच नाही. परंतु दिवाळी नंतर पावसांने पोबारा केल्यामुळे आता काही अंशी दिंडोरी तालुक्यातील असंख्य गावांमध्ये गुलाबी थंडीचे आगमन झाल्याने सध्या थंडीचा अनुभव नागरिकांना मिळू लागला आहे. तालुक्यातील सध्याचे तापमान दिवसागणीक कमी होऊ लागल्याने ग्रामीण भागातील चौकांचौकांतील उब देणाऱ्या शेकोट्या पेटू लागल्या आहेत. सध्या तापमान कमी होऊ लागल्याने उबदार कपडे खरेदीकडे नागरिकांचा कौल मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्यासाठी सेटोर, जेरकिंग, हातमोजे, कानटोपी, मफलर इ.उबदार कपडे खरेदी साठी गर्दी होऊ लागली आहे. थंडीचा महिना म्हटला की मल्ल, पैलवान, कसरत करणारे खेळाडू यांना तो पर्वकाळ समजला जातो. त्यामुळे सध्या ग्रामीण भागातील तालीम, जिमखाने गर्दीने फुलून जात आहेत. तसेच पहाटे व संध्याकाळी रस्त्याच्या कडेला आता पदचारी वर्गाची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढू लागली आहे. हिवाळा म्हटला की प्रत्येक जण आपल्या आरोग्यांवर लक्ष केंद्रित करीत असतो. त्यासाठी धावणे, विविध कसरती, योगासने, विविध खुराक यावर नागरिकांचा मोठा भर असतो. यंदा गरम कपड्यांच्या किंमती, व काजू, बदाम इ. पौष्टिक पदार्थाच्या किंमती गगनाला भिडल्यामुळे खरेदीला थोड्याफार प्रमाणात झटका बसला आहे.



दिपावळीच्या फराळांमुळे यंदा हिवाळ्यात बनवले जाणारे डिंक, बदाम काजु लाडु कालबाह्य झाले आहे. कारण दिवाळीनंतर थंडीला प्रारंभ झाल्याने अजून ग्रामीण भागातील असंख्य नागरिकांच्या घरी जवळपास पन्नास टक्के दिवाळीचे फराळ तसेच असल्याने आता गरम लाडू, विविध गरम पदार्थ बनविण्याकडे नागरिकांनी कानाडोळा केला आहे.

### शेकोट्यांच्या गप्पांचा रंगच निराळा

ग्रामीण भागात हिवाळा म्हटला की डोळ्यासमोर उभी राहाते ती जमिनीवर पेटवलेली शेकोटी. व तिच्या अवतीभवती जमलेले नागरिक व लहान लहान मुले व ज्येष्ठांच्या आपल्या जुन्या आठवणीना उजळा देणा–या विविध जुन्या गोष्टी यामुळे शेकोटीच्या गप्पा अतिशय रंगत असतात. त्यामुळे ग्रामीण भागात आला थंडीचा महिना... शेकोटी हळूच पेटवा या गाण्याचे सुर घुमू लागले आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# देखो रुठा ना करो ...

आधुनिक केसरी

पुणे तेथे काय उणे असे म्हणतात ते उगीच नाही. झालं असं की परवाच्या दिवशी ( हा ' परवाच्या दिवशी ' फार सोयीस्कर शब्द आहे बरं का ! यात खरोखरच्या परवाच्या दिवसापासून तो थेट आठवडा, पंधरवडा एवढंच काय वर्ष दोन वर्ष देखील खपून जातात. ही गोष्ट नक्की केव्हा घडली हे सांगण्याची आवश्यकता राहत नाही.) पुण्याच्या पोलीस आयुक्तांनी एक पत्रकार परिषद घेतली. या परिषदेत त्यांनी जे काही सांगितले ते अतिशय महत्वाचे आहे. अशा पद्धतीने आजपर्यंत (आणि तेही एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने अधिकारवाणीने सांगणे) कोणी सांगितले नव्हते.

ते म्हणाले, " नवरा बायकोच्या भांडणाच्या खूप तक्रारी आमच्याकडे येतात. पण माझ्या मते सगळ्या पुरुषांनी जर आपल्या बायकांचे ऐकले तर भांडणे होणार नाहीत. " तात्पर्य म्हणजे असा सल्ल्ला त्यांनी समस्त पुरुष वर्गाला दिला आहे. पण त्यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तीने देखील हे सांगावे म्हणजे त्यात निश्चितपणे काही तरी अर्थ असलाच पाहिजे असा अर्थ आमच्या सुमार बुद्धीनुसार आम्ही काढला. अर्थात तुम्हाला म्हणून सांगतो आम्ही आयुष्यभर हेच करत आलो आहोत. आमच्यात भांडणे नाहीत असे नाही. पण शेवटी आम्ही आमची चूक मान्य करून माघार घेतो. त्यामुळे एवढी वर्षे झाली तरी आमचा सुखी संसार सुरु आहे. खरे तर वारंवार घटस्फोट घेणाऱ्या पाश्चात्य लोकांनी आमच्याकडे येऊन काही दिवस प्रशिक्षण घ्यायला हरकत नाही.

मागे एकदा एक किस्सा वाचलेला आठवतो. बहुधा अकबर बिरबलाच्या गोष्टीतला असावा. एकदा दरबारात प्रश्न विचारला जातो की आपल्या पत्नीच्या आज्ञेत कोण कोण आहेत त्यांनी हात वर करा. तेव्हा अगदी बादशहापासून सगळी मंडळी हात वर करतात. पण एका कोपऱ्यात एक गरीब फाटका माणूस हात वर न करता उभा असलेला त्यांना दिसतो. सगळ्यांनाच त्याचे मोठे आश्चर्य आणि कौतुक वाटते. त्याच्या धैर्याचा हेवा वाटतो. बादशहाला तर वाटते की आपण बादशहा असूनही काय कामाचे ? हा सामान्य माणूस आपल्यापेक्षा लाख पटीने श्रेष्ठ. तेव्हा सगळे खोदून खोदून त्याला त्याच्या वागण्याचे रहस्य विचारतात. तेव्हा तो सांगतो, ' माझ्या पत्नीनेच मला असे सांगून ठेवले आहे की जेव्हा असा काही प्रश्न तुला विचारेल तेव्हा तू नाही म्हणून सांगायचे. ' घ्या, आता काय बोलणार? आणखी एक मजेदार किस्सा आठवला. पुरुष हा लग्नापूर्वी वाघ असतो. तो लग्नानंतर देखील वाघच असतो. फक्त त्या वाघावर दुर्गादेवी स्वार होते. मग दुर्गादेवीची आरती म्हणण्यावाचून गत्यंतर नसते. **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

# माणसांची मने ओळखता येणे ही एक कलाच

आधुनिक केसरी

ज्या व्यक्तीला सतत शुभ, सकारात्मक, आशावादी विचार करण्याची सवय असते, त्याचे मन नेहमीच आनंदाने, उत्साहाने भरलेले राहते. अशा उत्साही मनाच्या व्यक्तीला नेहमीच यशप्राप्ती होत राहते. सकारात्मक, आशावादी, आनंदी विचार हीच यशस्वी होण्याची गुरुकिल्ली असते, ह्याची जाणीव सर्वप्रथम आपण करून घेणे आवश्यक असते. गुरुकिल्लीद्वारे आपल्या सानिध्यात येणाऱ्या प्रत्येकास आपल्यासारखेच घवघवीत यश मिळत राहण्यासाठी श्वास-विश्वास दोन्हींही महत्वाचे असते. श्वास-विश्वास एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. परस्पर नातेसंबंधातील विश्वास हा श्वासासारखाच असतो. आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत विश्वास टिकवून ठेवण्याची केवळ नैतिक जबाबदारीच नाही, तर कर्तव्य असल्याचे भान राखले पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

नकळत केलेल्या अनेक गोष्टी आपल्याकडून अनेकदा दुर्लक्षित रहात असतात. श्वास आणि विश्वासाचे देखील तसेच असते. श्वास-विश्वासाच्या बाबतीत खरेच आपण नेहमीच गाफील रहात असतो, हीच खरी उणिव म्हणावी लागेल. अनेकदा आपल्या बाबतीत जसे श्वासाचे, तसेच विश्वासाचे सुद्धा असते. आपण अगदी सहजपणे केवळ दृश्य पण आभासी जगावर आंधळेपणाने विश्वास टाकत असतो. आपल्या डोळ्यांवर चढलेली विश्वासाची झापडे आपल्याला भ्रमांत अडकवतात. आपल्याला अगदी नुकत्याच भेटलेल्या व्यक्तीबरोबर, एखाद्या योजनेसाठी, जाहिरातींना भुलून जाऊन आपले सर्वस्व सुद्धा अर्पण करायला तयार होतो. अगदी काही क्षणांत, काही काळांत आपण त्यांवर विश्वास ठेवतो आणि व्यवहार करून मोकळे होते. पण हे मोकळे होणे आपला खिसा, तिजोरी देखील मोकळे करत आहे ह्याची जाणीवही होत नाही. आपण म्हणतो, कि आपण माणसे ओळखायला चुकत नाहीत म्हणून; परंतू त्याच माणसांचे मन ओळखू शकत नाहीत, हीच शोकांतिका ठरते.

# लीन माणसाला भगवंत लवकर साधेल



आधुनिक केसरी

नामस्मरण करायचे ते अभिमान टाकून करीत जावे. परमेश्वराला अनन्यशरण जाऊनच त्याचे नाम घेत जावे. पुष्कळ वेळा, आपण साधन करू लागलो म्हणजे आपल्याला अभिमान चढू लागतो, आणि त्यामुळे साधन व्यर्थ होते. संताकडे जाताना आपण मनामध्ये काही एक बरोबर घेऊन जाऊ नये; किंवा काही नेलेच तर भगवंताचे प्रेम न्यावे. आपण प्रपंचाचे प्रेम आणि अभिमान बरोबर घेऊन जातो आणि मग, एकावर एक लिहिलेले जसे वाचता येत नाही तशी अवस्था होते. एखादी वस्तू आपल्याला हवी असे वाटल्यावर आपण तिच्या प्राप्तीविषयी विचार करू लागतो. म्हणूनच पहिल्याने, भगवंत हवा असे आपल्याला वाटले पाहिजे. त्यानंतर त्याच्या प्राप्तीच्या साधनांचा अभ्यास करायला पाहिजे. हा अभ्यास मनाच्या कष्टाचा आहे. क्रोधाला बाहेर येऊ देण्यापेक्षा, क्रोध गिळणे यात जास्त श्रम आहेत. असे करण्यामध्ये आज कष्ट आहेत हे खरे, पण पुढे मात्र सुख आहे हे निश्चित. वागण्यात आणि चालण्यात आपण सावधगिरी बाळगावी; नको ते टाळावे.

अनन्यतेला पैसा लागत नाही, विद्या लागत नाही; त्याला फक्त आपली अभिमानवृत्ती बाजूला ठेवावी लागते. भगवंताचे होण्यासाठी अंगी लीनता आलीच पाहिजे. लीन माणसाला भगवंत लवकर साधेल. लीनतेमध्ये बाकीचा विसर पडून भगवंत तेवढा शिल्लक राहतो. जो वृत्तीने लहान आहे त्याला भगवंत लवकर वश होतो. मनुष्य मोठा असून लहानासारखा वागला तर ते फार चांगले असते. मनाने मात्र आपण बळकट बनले पाहिजे. आपण स्वतःशी चोवीस तास उघडा व्यवहार करावा. भगवंताने आपल्याला केव्हाही जरी पाहिले तरी आपल्याला लाज वाटता कामा नये. आपले वागणे असे असावे की भगवंताची आस मनामध्ये वाढत जाऊन, तिचे पर्यवसान ध्यासामध्ये व्हावे. रात्री जे स्वप्न पडावेसे वाटते ते दिवसभर करावे. यासाठी आपली वृत्ती नामामध्ये गुंतवून ठेवावी. 'असावे सर्वांत पण नसावे कोणाचे' अशा वृत्तीने जो राहील त्याला लवकर परमार्थ साधेल.

देहाच्या उपचारांना जो भुलतो तो भगवंताला अगदी विसरलेला असतो. पण ज्याचे अनुसंधान मजबून असते त्याला जगातल्या ऐश्वर्याची किंमत नसते. पैशाची वासना आणि लौकिकाची लालसा माणसाला भगवंतापासून दूर नेतात. त्यांच्या तावडीत सापडता कामा नये. लोकेषणा आणि धनेच्छा या दोन्ही गोष्टींचा संबंध प्रपंचात वावरत असताना येणारच. तो टाळता येणे कठीण आहे. पण ज्याला भगवंताचे प्रेम पाहिजे आहे त्याने त्यांचा गुणधर्म ओळखून त्यांना वापरावे, म्हणजे त्यांच्यापासून उत्पन्न होणारे दोष त्याला बाधणार नाहीत.

**अभिमानरहित जावे रामाला शरण ।**
**त्यानेच राम आपला होईल जाण ॥**

**-श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर**

## "निरुपण"

आधुनिक केसरी

**जनावाहन**

**सोडा सोडा रे। मोहपाश सारे।**
**यारे यारे सारे। तुम्ही रे माहोरे।**
**चरणी लागता। रेणुकेच्या रे।**
**भय विधात्यास। चंद्रहास म्हणे।।**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# जीवन अनमोल आहे...

आधुनिक केसरी

शाळकरी मुलं आत्महत्या करतात.किती विचार करण्यासारखी गोष्ट आहे! इतक्या लहान वयात आत्महत्या करायची असा मनात विचार येतोच कसा? संस्कार करण्यात कोण कमी पडतात ? चौदा पंधरा वर्ष वय असलेल्या ,खेळण्याचे वय! आणि मुलांना इतका राग यावा की लगेच आत्महत्येसारखे पाऊल उचलावे ? काही जण घर सोडून जातात. पुन्हा घरी जायचे नाही म्हणून. आई वडील इतके वाईट असतात का? कशी पिढी आहे ही? असेही आपण म्हणू शकत नाही. कारण सगळीच मुले तशी नाहीत .काही मुले खूप कमालीची सुसंस्कारी आहे. आणि सहकार्य वृत्ती देखील खूप आहे. संस्कार सगळ्याच मुलांवर नसतात असं नाही. काही थोडीच मुले भरकटतात. त्यांना जागेवर आणनं आपलं पालकांचं काम आहे. कधी त्यांचा वेळ घेऊन तर कधी त्यांना वेळ देऊन. मुलांना घडवायचं आहे. कुठेही कोणत्याही क्षेत्रात मुलांनी सहज झेप घ्यावी एवढं बळ आपण त्यांच्या पंखात द्यावं. आणि जीवनाचं आयुष्यात महत्त्व त्यांना समजावत आयुष्य किती अनमोल आहे ते पुन्हा मिळत नाही.म्हणून जन्मात येवून काहीतरी चांगले करावे जेणेकरून मुर्ती नाही राहिली तरी कीर्ती राहील. ऊठसूट कोणीही आत्महत्या करू नका. मुलांनी आत्महत्या केली तर आईबापांना आभाळा एवढे दुःख होत असतं. ते कधीही भरून येत नाही. तेव्हा मुलांमध्ये असा आत्मविश्वास निर्माण करा कि ती जीवनाला कंटाळून कधीच आत्महत्या करणार नाही. कठीण परिस्थितीत संघर्ष जरूर करावा.त्यातून आत्मविश्वास निर्माण होतो. सगळ्याच गोष्टी मागेल तेव्हा हातात देऊ नका. तशी सवय लागते. नाही मिळाली तर राग येतो. तो राग टोकाला पोहोचतो. राग क्षणाचा असतो. त्याला कधीच राग येऊ देऊ नका. "मौनं सर्वार्थ साधनम्". शांत व संयमी राहिल्याने नेहमीच आरोग्याला सुद्धा फायदा होतो. आयुष्य सुखकर होते.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-46

# मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

जगी धन्य तो राममूखें निवाला ।
कथा ऐकतां सर्व तल्लीन जाला ॥
देहेभावना रामबोधें उडाली ।
मनोवासना राम रूपी बुडाली ॥ १२७ ॥

**सरळ अर्थ :** जो रामनाम मुखाने उच्चारत राहिला आहे तो, तसेच जो रामकथा ऐकण्यात तल्लीन झाला आहे, ज्याची शारीरिक सुखांची भावना नष्ट झाली आहे आणि रामाच्या दर्शनाच्या इच्छेपुढे ज्याच्या इतर सर्व मनोवासना संपल्या आहेत असा माणूस या जगात धन्य होय.

**विवेचन :** सर्वच माणसे कमी अधिक प्रमाणात रामनाम घेतात,त्यांचा उद्देश वेगवेगळा असेल, पण रामाची भेट घडवून देणारे नाम वेगळे असते, अशा अर्थाचा तुलसीदास यांचा दोहा आहे. प्रत्येक माणसाला जगायाची इच्छा आहे, कारण त्याला आनंद हवा आहे. प्रत्येक मनुष्य आनंद शोधतो आहे. आपण जो आनंद शोधतोय, तो आपल्याला जगाकडून हवा आहे म्हणजे दुसऱ्याकडून हवा आहे. त्यामुळे तो कोणालाच मिळत नाही. आपण सर्व अपूर्ण आहोत. एक भगवंतच पूर्ण आहे. कितीही शून्यांची बेरीज केली तरी त्याची बेरीज एक येणार नाही, पण त्यात एक मिळवला तर मात्र सर्वांची बेरीज एक येईल. एक म्हणजे भगवंत. भगवंतामध्ये मिसळणे म्हणजे त्याच्याशी एकरूप होणे, त्याच्या इच्छेतच आपले सुख आहे अशी भावना दृढ होणे. ह्यासाठी सोपा उपाय म्हणजे भगवंताच्या लीला श्रवण करणे, त्याचे गुणवर्णन ऐकणे. कथाकीर्तन ऐकताना भक्ताचे अष्ट सात्विकभाव जागृत होतात, मनुष्य देहबुध्दी विसरतो. देहबुध्दी नष्ट होताच



आपल्या खऱ्या आनंदाची अनुभूती येते. आपल्या सर्व इच्छा आकांशा विरळ होऊन भगवंताचा नित्य सहवास हिच परमवासना उरते.

आद्यशंकराचार्यांनी *'धन्याष्टक' लिहिले आहे, त्यात सामान्य मनुष्याला ज्यात धन्यता वाटते त्यापैकी एकही गोष्ट अंतर्भूत नाही. अभ्यासू वाचकांनी ते मुळातून अभ्यासावे.*

धन्य होणे किंवा असणे म्हणजे काय ? आपण बऱ्याच वेळा हा शब्द वापरतो. (धन्यवाद हा शब्द तर वापरून वापरून पार झिजून झिजून गुळगुळीत झालेल्या नाण्यासारखा झाला आहे.) मग धन्य या शब्दाचा नक्की अर्थ काय ? कोणाला धन्य म्हणायचे आणि तो कशामुळे धन्य होतो ? श्रीमंत, भाग्यवान, श्रेष्ठ, उत्तम, पवित्र, कृतज्ञ, कृतार्थ, समाधानी, संतुष्ट, तृप्त असे कितीतरी पर्याय शब्दकोशांत दिलेले आहेत.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

समर्थांना इथे अपेक्षित आहे तो अर्थ म्हणजे भाग्यवान असणारा. श्रीरामाचे नाव ज्याला स्वमुखाने घ्यायला मिळते आणि जो जीव ते घेतो, तो जीव भाग्यवान असतो. का ? तर अशा नामोच्चाराने त्याला आंतरिक समाधान आणि शांतीचा लाभ होत असतो. त्याच्या मनातील तगमग निवते. हे भाग्य त्याला मिळते, म्हणून तो धन्य होतो. याशिवाय धन्य असण्यासाठीची पात्रता आणखीहि काहीजणांना मिळते. कोण असतात असे भाग्यवान ? ज्यांना श्रीरामकथा ऐकायला मिळते आणि ती समजून घेताना, ऐकताना जे देहभान विसरून तल्लीन होतात ते महाभाग धन्य ठरतात. देहभान म्हणजे समर्थांच्या भाषेत देहेभावना. रामाचे चरित्र श्रवण करत असताना जेव्हा श्रोता रामनाम घेण्यात किंवा ऐकण्यात तल्लीन झालेला असतो, तेव्हा त्याच्या आजूबाजूला काय चाललेलं आहे त्याची पर्वा, देहाची स्थिती आणि शारीरिक सुखदुःखाची भावना त्याच्या अंतरी उरलेली नसते.

संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराज भाग्यवंत मनुष्याचे पुढील प्रमाणे वर्णन करतात.

"भाग्यवंत म्हणों तयां । शरण गेले पंढरिराया ॥१॥
तरले तरती हा भरवसा । नामधारकाचा ठसा ॥२॥
भुक्तीमुक्तीचें तें स्थळ । भोळेभाविका निर्मळ ॥३॥
गाइलें पुराणीं । तुका म्हणे वेदवाणी ॥४॥"*
(सार्थ श्रीतुकाराम गाथा, अभंग क्र.२०५४, धार्मिक प्रकाशन संस्था)

एक कीर्तनकार होते. ते कीर्तनात राम कथा सांगत असत. एकदा एक श्रद्धावान जमीनदार त्या कीर्तनाला आला होता. सिताहरणाचे आख्यान चालू होते. बुवांची वाणी रसाळ होती. रावणाने सीतेला पळवून नेले असे बुवा म्हणाले. बुवा असे म्हणायचा अवकाश, जमीनदार उठून उभे ठाकले, म्हणाले आणा माझा घोडा! सीतामातेला पळवून नेतो म्हणजे काय ? मी जाऊन घेऊन येतो आणि निघाले दक्षिणेला.... जाता जाता घोडा एका दरीच्या टोकाला जाऊन अडला. स्वतः रामप्रभू प्रकट झाले आणि त्या जमीनदाराला म्हणाले, अरे मी रावणाला मारून सीतेला सोडवून आणले आहे, तू जायची गरज नाही. आपण शहाणे श्रोते असल्याने त्या जमीनदाराला नक्कीच मूर्ख म्हणू... पण असा श्रोता ज्याचे देहभान हरपते, त्याची ब्रम्हानंदी टाळी लागते, त्याला रामाचे दर्शन होते, त्याचे जीवन धन्य होते...!

**|| जय जय रघुवीर समर्थ ||**

# वैश्विक अधिकारासाठी शुद्ध चिकित्सा आवश्यक

## डॉ. मोहन भागवत : आयुर्वेद व्यासपीठ चर्चासत्राचा थाटात शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारतीय जनमानसात आता आयुर्वेदाचे प्रचलन वाढले आहे, त्यात सुलभता आणून वैद्यांनी शुद्ध चिकित्सा पद्धत अवलंबिल्यास भारताबाहेर वैश्विक अधिकार व मान्यता मिळेल असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले. आयुर्वेद व्यासपीठच्या रजत जयंती पर्वाचे औचित्य साधत केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या सहकार्याने त्रिदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आयुष विभागाचे केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, इंडियन मेडिकल कौन्सिलचे जयंत देवपुजारी, संस्थापक अध्यक्ष विनय वेलणकर, राष्ट्रीय अध्यक्ष रजनी गोखले, उपाध्यक्ष शिरीष पेंडसे, कार्यवाह विलास जाधव, कोषाध्यक्ष आनंद टेभूर्णीकर, आयुष मंत्रालयाचे सचिव राजेश कोटेचा, माजी अध्यक्ष संतोष नेवापुरकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना डॉ. मोहनजी भागवत यांनी, मागील २५ वर्षात आयुर्वेद व्यासपीठाने उत्तम काम केले. ज्या गुणांमुळे आपणास मान्यता मिळाली ते सदैव लक्षात ठेवा, आता आयुर्वेदाला जनतेची व शासनाची मान्यता मिळाली. त्यातील सदगुणांचा विसर पडू देऊ नका आणि इतर चिकित्सा पद्धतींमध्ये आलेल्या अहंकाराला आयुर्वेदाच्या मुलतत्वांवरील संशोधनाच्या माध्यमातून उत्तर द्या व जनतेने त्याचा अंगिकार करावा अशी स्थिती निर्माण करा त्यातून वैश्विक अधिकार प्राप्तीचा मार्ग मोकळा होईल असा सल्ला दिला. प्रास्ताविकातून राष्ट्रीय अध्यक्ष वैद्य रजनी गोखले यांनी, मागील २५ वर्षात आयुर्वेद व्यासपीठाने सेवा, संशोधन, प्रचार व प्रसार या चतु:सुत्रीवर काम केले असल्याचे सांगत, आता वैद्य आणि जनतेच्या माध्यमातून आयुर्वेदाला राजमान्यता मिळविण्याचा प्रयत्न आहे, त्यासाठी सर्व राज्यात आयुर्वेद व्यासपीठाची शाखा असावी हा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी बोलताना गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी, आयुर्वेदाचे वैद्य कोणत्याही समस्येवर मात करु शकतात. त्या विचारधारेतूनच यश हमखास मिळणार आहे. देशात पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वातील सरकार आल्यानंतर खया अर्थाने आयुर्वेदाला अच्छे दिन आले असल्याचे सांगितले. येत्या काळात आयुष मंत्रालयाने आयुर्वेद वैद्यांनी विमा दाव्यांचा निपटारा अग्रक्रमाने करावा असे आवाहन केले. यासंदर्भात बोलताना केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी, आयुर्वेद ही पूर्वजांनी दिलेली परंपरा म्हणून आपण सांभाळीत आहोत. आता त्याला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली, योगा देखील जगाने स्वीकारला.
आता जागतिक आरोग्य संघटनेने पारंपरिक चिकित्सा पद्धतीवर काम सुरू केले आहे ही बाब अभिमानास्पद असल्याचे सांगितले. पुष्पगुच्छ आणि विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देऊन उपस्थित पाहुण्याचे स्वागत करण्यात आले.
यानंतर एकूण ९ आयुर्वेद ग्रंथांचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आयुर्वेद व्यासपीठच्या पहिल्या कार्यकारीणीतील सदस्यांचा सत्कार करण्यात आला, तसेच त्यावेळी पूर्णकालीन कार्यकर्ते म्हणून काम करणारे गिरीश किल्लू, राहुल पालवे, अनिल गुप्ता, अमेय भावे, सुविनय दामले, विवेक कुळकर्णी, उमेश तागडे यांचा यथोजित गौरव करण्यात आला.

### नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत आज 'आयुर्वेद पर्व'चा समारोप

आयुर्वेद व्यासपीठाच्या तीन दिवसीय आयुर्वेद पर्वचा समारोप रविवार, 13 नोव्हंबर रोजी सकाळी 11.30 वाजता होत आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय रस्ते वाहतूक अणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती राहील. शनिवारी आयुष मंत्रालयाचे वैद्य कौस्तुभ उपाध्याय हयांच्या उपस्थितीत आयुर्वेदीय औषधी निर्मात्यांचे सम्मेलन पार पडले. सोबतच जानुसंधि परीक्षण विषयावर वैद्य मंगेश देशपांडे, आयुर्वेदातील आपात्कालीन उपचार वर वैद्य उपेंद्र दीक्षित व वैद्य गोपिकृष्णन तर आयुषची उपलब्धी विषयावर पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा यांची कार्यशाळा पार पडली. वन्ध्यत्व विषयावर वैद्य अनुप ठाकूर, वैद्य महेश मुळे, वैद्य नीता म्हैसेकर यांचे मार्गदर्शन लाभले. आयुर्वेदाची प्रॅक्टीस विषयावर झालेल्या समांतर सत्रात वैद्य राकेश शर्मा व वैद्य आशुतोष गुप्ता यांनी मार्गदर्शन केले. आरोग्य प्रदर्शन बघण्यासाठी दिवसभर विद्यार्थी व नागरिकांनी गर्दी केली. आमदार प्रवीण दटके यांनीही प्रदर्शनीला भेट दिली. बाह्य रुग्ण विभागातही आयुर्वेदिक उपचारांसाठी रुग्णांची गर्दी बघायला मिळाली.




# दिल्लीतील बृहन्महाराष्ट्र मंडळात गोव्याच्या कवीचे कविसंमेलन



आधुनिक केसरी न्यूज

**पणजी :** ओठात शब्द होते तेही न बोललो मी कळले तुला न काही इतकेच बोललो मी ..., मी पाहिलंय अश्रूंना मला सामावून घेतांना आणि पानातील थेंबाना नभाला आश्रा देतांना.. अशा रचनांनी ज्येष्ठ कवी माधव सटवाणी यांनी बृहन महाराष्ट्र मंडळ (मध्यवर्ती संघटना), दिल्ली येथे शनिवारी झालेल्या कविसंमेलनात उपस्थित कविमंडळी आणि रसिकांना प्रभावित केले. गोव्यातील मराठी कवी कवयित्रींचे कविसंमेलन पहाडगंज दिल्ली येथील बृहन महाराष्ट्र मंडळात आयोजित केले होते त्याचे अध्यक्षपद सटवाणी यांनी भूषविले होते. नागपूर येथील प्रसिद्ध लेखिका तथा कवयित्री प्रा. विजया मारोतकर सहअध्यक्षा म्हणून तर इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा, पणजी या संस्थेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कवी दशरथ परब हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.सहभागी कवींच्या कवितांवर प्रा. मारोतकर यांनी नेमकेपणाने भाष्य करतांना सुसंगत अशा कवितेच्या ओळी पेरून कविसंमेलनाची रंगत वाढवली. उन्मेशाचे नवे वारे नव्या दिशांना या ओळींनी विजया मारोतकर यांनी नवचेतनेचा संदेश दिला. त्याने पाहिले राधेच्या डोळ्यात मनात तनात प्रतिबिंब बासरीचे... या दीपा मिरिंगकर यांच्या सुरेख ओळी राधा कृष्णाच्या अकृत्रिम प्रेमाचे दर्शन घडविणाऱ्या होत्या.वळण बांध सखी पाणी यायच्या आधी... या पोर्णिमा केरकर यांच्या ओळी अंतर्मुख करून गेल्या. 'मुलं आणि मी' ही चित्रा क्षीरसागर यांची वास्तवदर्शी कविता दाद घेऊन गेली.दशरथ परब यांनी, ती दिवा लावते आत राहुनी दुसऱ्या देशी.. या ओळींनी मने जिंकली. झाडं आणि मुली वयात आल्यावर माणसांच्या नजरा कशा वखवखतात, यावर प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांनी आपल्या माणसांची खैर नाही या कवितेतून नेमकेपणाने भाष्य केले. शुभदा च्यारी यांच्या, 'पुन्हा नव्याने' या कवितेतील व समृद्धी केरकर हिच्या, "फुलाला माहित असतं अवघं दोन किंवा झालंच तर चार दिवसांचे त्यांचे जीवन असतं..

> सगळे नऊही रस कवितेतून मांडता येतात. भावना आणि विचार यातून कविता आकार घेत असते. काव्य हा हृदयाशी संबंधित वाङ्मय प्रकार आहे. कवितेचे सौंदर्याशी जवळचे नाते आहे.
> – माधव सटवाणी

# जादूटोण्याचे बावनकुळे समर्थन करत असतील तर दुर्दैवी : तपासे

## चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विरोधात कल्याण पोलीस ठाण्यात तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** जादूटोणा विरोधी कायदा करुनही भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे जादूटोणाचे समर्थन करत असतील तर पुरोगामी महाराष्ट्राच्यादृष्टीने दुर्दैवी आहे त्यामुळेच त्यांच्या विरोधात तक्रार केली असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी दिली.
भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उध्दव ठाकरे यांच्यावर शरद पवारसाहेब यांनी जादूटोणा केला असल्याचे वक्तव्य केले होते. त्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस आता आक्रमक झाली आहे.
शरद पवारसाहेब यांच्या आशीर्वादाने आघाडी सरकारने जादूटोणा विरोधी कायदा (२०१३) केला आहे. त्या कायद्याचे समर्थन भाजपने, नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, उध्दव ठाकरे यांनी केले होते मात्र ज्या कायद्याला भाजपच्या नेत्यांनी समर्थन दिले त्याच भाजपचे प्रदेशाध्यक्ष जादूटोणाबाबत बोलून जादूटोणाचे समर्थन करत आहेत याबाबत महेश तपासे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.
भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी जादूटोणा विरोधी कायद्याचे उल्लंघन केले असून त्यांच्याविरोधात खडकपाडा पोलीस ठाणे कल्याण येथे तक्रार दाखल केली असून कायदा त्याचं काम करेल असेही महेश तपासे म्हणाले.



# पाणी देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यावर बिबट्याचा हल्ला



आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** उसाला पाणी देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला केल्याचा प्रकार वाळवा तालुक्यातील हुबालवाडी येथे शनिवारी सकाळी घडला. अरविंद सदाशिव हुबाले (वय ४७) असे हल्ला झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. सुदैवाने शेतकरी सावध असल्याने हल्ल्यातून बचावला. मात्र, या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. हुबालवाडी येथील शेतकरी हे आज सकाळी ओढ्या काठाला असलेल्या शेतात उसाला पाणी देण्यासाठी गेले होते. फडाच्या बाहेर असताना फडामध्ये गुरगुरण्याचा आवाज येत होता. तसेच फडामध्ये काही तरी हालचाल होत असल्याचे दिसले. त्यांनी निरखून पाहण्याचा प्रयत्न केला असता उसाच्या सरीतून बिबट्यांने त्यांच्या अंगावर झेप घेतली. मात्र, सावध असलेल्या हुबाले यांनी ही झेप चुकवली. याचवेळी दंगा सुरू केला. या दंग्याने जवळच असलेले लोक धावून आले. त्यांनीही आरडाओरडा केला असता बिबट्याने उसाच्या फडात धूम ठोकली. याबाबत वन विभागाला माहिती देण्यात आली आहे. मात्र, बिबट्या उसाच्या फडात परतला असल्याने त्याचा शोध निरर्थक ठरला. रात्रीच्यावेळी असलेली बिबट्याची दहशत आता दिवसाढवळ्याही दिसत असून गावातील शेतकरी धास्तावले आहेत.

कितीही ज्ञान असले तरी बोलता आले पाहिजे
जालना शहरात
भाषणकलेची कार्यशाळा
दर रविवारी २ तास, प्रत्यक्ष सरावातून प्रशिक्षण
* व्हाट्सप संपर्क *
विनोद जैतमहाल
9823028332
SPEAKER'S ACADEMY
भाषणकलेची कार्यशाळा
Changing lives since 2016




प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# संशयाचे (राज)कारण

आधुनिक केसरी

**दैनंदिन जीवनात असे अनेक शब्द किंवा संकल्पना असतात ज्याकडे आपण फार गांभीर्याने पाहत नाही. प्रेम, स्वातंत्र्य, राग, क्रोध, विवेक असे कितीतरी शब्द आपण पुरता अर्थ लक्षात न घेता बिनदिक्कतपणे वापरत असतो. किंबहुना अर्थछटा माहीत नसतानासुद्धा आपल्या शब्दयोजनेमुळे वापरकर्त्याचे काही अडत नाही. शब्द त्याचे काम बरोबर करतात. असाच सर्वव्यापी शब्द म्हणजे संशय होय. आपण शंका आणि संशय साधारणतः एकाच अर्थाने वापरतो, परंतु या दोन्हींमध्ये सूक्ष्मस: भेद आहे.**

आकलनसुलभतेसाठी उपस्थित केलेला प्रश्न म्हणजे शंका आणि आकलनसिद्ध वस्तूवर अथवा व्यक्तीवर जाणीवपूर्वक केलेला हेत्वारोप म्हणजे संशय. शंका उपस्थित केल्याने प्रश्न मिटू शकतात पण संशयाने त्यात वाढच होते. शंकेचे समाधान होऊ शकते, परंतु संशय कधीच समाधान पावू शकत नाही.
ज्याला आपला अभ्यास आणि आकलन वाढवायचे त्याने शंका उपस्थित केलीच पाहिजे. इथे शंका म्हणजे प्रश्न या अर्थाने आपण घेतो. जोपर्यंत आपणास प्रश्न पडत नाहीत तोपर्यंत आपणास विवक्षित विषयाचे पूर्णतः आकलन झाले असे म्हणता येणार नाही. उत्तर देण्यातून विद्वत्ता कळतेच असे नाही कारण आकलनाच्या एका विशिष्ट बिंदूवर पोहचल्यानंतर बहुतांश उत्तरे साचेबद्ध किंवा प्रमाणित असू शकतात; परंतु प्रश्नांचे स्वरूप असे नसते. प्रश्न काहीही पडतात. म्हणूनच रुसोने उत्तम प्रश्नकर्त्याला उत्तरदात्यापेक्षा श्रेष्ठ म्हटले आहे. हे श्रेष्ठत्व प्रश्नांच्या उपयोजनेतून म्हणजेच शंकेतून निर्माण होते. व्यवहारात शंकेचे राजकारण होत नाही, त्याचे समाधान होत असते. खरा राजकारणी असतो संशय. ज्यांची मने निर्लेप नसतात अथवा आत्मस्तुतीने किंवा आत्मप्रौढीने ग्रस्त असतात अशा मनात संशय कायमचा मुक्कामाला असतो. त्यामुळे संशयग्रस्त आत्मे स्थीर अथवा संतुलित आयुष्य व्यतीत करण्यास कमी पडतात. स्वयें पाक करी | संशय तोचि धरी | संदेहसागरी | आणिक परी बुडती || असे तुकाराम महाराज एके ठिकाणी म्हणतात. म्हणजे बुडत्याचे पाय खोलात म्हटल्यासारखे संशय आपणांस आणखी संदेहसागरात खोल खोल घेऊन जातो. ज्यारीतीने भीतीचे परिमार्जन करता येते पण चिंतेचे नाही तद्वतच शंका आणि संशयाच्या बाबतीत आपण असे म्हणू शकतो. अलीकडे राजकारण खूप वाढले आहे असे आपण नेहमी ऐकतो किंवा म्हणतो. मनाची निर्लेपता, सात्विकता आणि सहानुभाव कमी होणे हे त्याचे मुख्य कारण आहे. समाजोन्नत्तीसाठी राजकारण हा फक्त पानाला चुना लावण्याचा प्रकार असतो. समाजामध्ये आपपरभाव जेवढा वाढेल तेवढे अधिकाधिक राजकारण होत जाणार. कारण कोण्यातरी दुसऱ्याबद्दल माझ्या मनात प्रचंड संशय आहे. हा संशय कशानेही दूर होणार नाही. शंकेचे निरसन किंवा समाधान होऊ शकते, परंतु संशयाचे कसे करायचे. हाच संशय एकदिवस संपूर्ण मानवजातीला बुडविण्यास कारणीभूत ठरेल. जेवढे हुकूमशहा झाले त्यांचे राजकारण यावर तर अधिष्ठित होते. त्यांनाही काळाच्या आणि प्रदेशाच्या मर्यादा होत्या. काय सांगावे उद्या एखादा कालातीत आणि प्रदेशविरहीत संशयी निर्माण झाला तर? म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी स्पष्टपणे म्हटले आहे, म्हणुनी संशयाहून नाही थोर | आणिक नाही पाप घोर | हा विनाशची वाघूर | प्राणियाशी || सर्व संत, विचारवंतांनी मनातला संशय दूर जाऊन सात्विकता कशी वाढेल यासाठी सदोदीत प्रयत्न केले. केवळ समाजकारणात नव्हे तर ही संशयी वृत्ती कौटुंबिक कलहास देखील जन्म देणारी ठरते. केवळ संशयावरुन या जगात दररोज कितीतरी जीव जातात. तरी आम्हांस त्याचे गांभीर्य कळत नाही. उपाय काय? आहे. ही संशयी प्रवृत्ती दूर करण्याचा फक्त एकमेव उपाय म्हणजे आत्मबोध होय. हा अनुभव ज्याचा त्याने घ्यायचा असतो. इथे शब्द खुजे पडतात. हा अनुभव वर्णनातीत असल्यामुळे व्यक्त होण्याला मर्यादा येतात. जोपर्यंत हे चित्त चैतन्याशी समरुप होणार नाही, तोपर्यंत रात्रंदिन युद्धाचा प्रसंग



## क्षितिजापल्याड

अनुभवावाच लागणार, यात काहीच शंका नाही. चैतन्य म्हटले की पुन्हा आपले डोळे फिरतात. तुम्ही जडवादी, अज्ञेयवादी अथवा कोणीही असा वाद फक्त कोणते अगोदर यासंदर्भातच आहे, एवढेच समजून घ्या.बहुतांश संदेहवाद्यांचा वृद्धापकाळ हा विस्मृती अथवा विक्षिप्तपणात झाला आहे. आणि संपूर्ण समाज विक्षिप्त होणे आपणास परवडणारे नाही. संशयाचा रस्ता विक्षिप्ततेच्या ठिकाणी पोहोचतो. म्हणून आत्मबोध महत्त्वाचा आहे. हा आत्मबोध कोणास कोठे, कधी, कसा प्राप्त होईल, हे ज्याच्या त्याच्या अभ्यास, आकलन आणि तिव्रतेवर अवलंबून असणार आहे. बुद्धाला पिंपळवृक्षाखाली आणि ज्ञानेश्वरांना अजाणवृक्षाखाली काहीतरी गुह्य सापडलं म्हणून आपणासही त्याच ठिकाणी सापडेल असे नाही. कारण प्रत्येकाचा प्रकृतीधर्म भिन्न आहे, साधना आणि कर्म भिन्न आहे. प्रारब्धी टाकिला देहो | बोधे फिटला संदेहो | आतांची पडो अथवा राहो | मिथ्या कळीवर || असे रामदास स्वामी म्हणतात त्याप्रमाणेही होऊ शकते. पण आम्हांस प्रारब्ध वगैरे म्हटलं की कपाळाला आठ्या पडतात. कर्म, कर्मफळ, संचित आणि प्रारब्ध या क्रमाने आपण थोडासा अभ्यास केला तर त्याची उकल होते. आपल्या प्रारब्धास आपल्याशिवाय दुसरे कोण जबाबदार असणार? आजचे आपले कर्म उद्या प्रारब्धरूपाने समोर येणार. मानत असलात तर देवही त्यात पडत नाही. त्यामुळे संशयाचे बीज ह्रदयी साठवून तुम्ही कितीही देवाला पाणी घातले तरी ते पालथ्या घड्यावर पाणी घातल्यासारखेच आहे. सर्वांठायी प्रेमपूर्वक वर्तन आणि जे जे भेटे भूत | ते ते मानिजे भगवंत || ही दृष्टीची निकोपता हे विश्व एक घर असल्याचा प्रत्यंतर घडविण्यास साह्यभूत ठरेल. शेवटी तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे संशयाचे बिरडे | याचे निरसले भेटी | घेतली ते तुटी | आता घेता पावेल ||

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# ग्रामपातळीवर सक्षम युवा नेतृत्वानेच सापडेल विकासाची वाट

आधुनिक केसरी

**तरुणाने ग्रामपंचायत निवडणूक लढवून ग्रामपंचायत मध्ये गेले आणि दमदार कामगिरी करून आपली छाप निर्माण केली तर स्वतः ला तर यश मिळेलच परंतु गावाचा विकास होऊन एक नवीन नेतृत्व निर्माण होईल. प्रत्येक गावामधून निर्भीड, प्रामाणिक आणि तरुण नेतृत्व पुढे आले तर देशात प्रामाणिक आणि नविन दमाच्या नेतृत्वाची निर्मीती होऊन देशात परिवर्तनाची व नव्या नेतृत्वाची लाट येईल. सक्षम भारताची युवा नेतृत्वाची सुरुवात ही ग्रामपंचायत पासुनच होते म्हणून सक्षम भारताची धुरा सांभाळण्यासाठी तरुणांनी सज्ज होणे भारताची धुरा सांभाळण्यासाठी तरुणांनी सज्ज होणे गरजेचे आहे.**

सध्या महाराष्ट्रात ग्रामपंचायत निवडणुकीचे वारे सुरू आहे. आपल्या गावाचा कारभार सुरळीत चालवून गाव पातळीवरच गावाचा विकास करुन घ्यायचा हा ग्रामपंचायत चा मुख्य उद्देश असतो. निवडणूक कोणतीही म्हणली तर त्यामध्ये लढत आणि जय पराजय होतच असतो. परंतु ग्रामपंचायत निवडणूक समजून घेणे गरजेचे आहे कारण एक निवडणूक आपल्या गावाचे रंग रुप सर्व काही बदल घडवू शकते. ग्रामपंचायत ही गावची संसद असते आणि म्हणून या संसदेच्या माध्यमातून आपल्या गावात कायदा सुव्यवस्था कायम ठेऊन गावचा सर्वांगीण विकास करणे गरजेचे असते. म्हणून या गावच्या संसदेमध्ये गावातील तरुणांनी सहभागी होणे अत्यंत गरजेचे असते. गावातील ग्रामपंचायत म्हणजे गावासाठी सर्वोच्च असते असते. गावातील शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी, यासोबतच गावात वेगवेगळ्या उपक्रमाच्या माध्यमातून तरूणांचे कौशल्य विकास, ग्राम विकासावर भर देऊन ग्रामपंचायचे काम गावाचे नाव नौकलोकिक करण्याची संधी म्हणजे ग्रामपंचायत निवडणूक होय.
आपण बघतोय बऱ्याच गावातील ग्रामपंचायत विशिष्ट लोकांच्याच हाती असतात. निवडणुक झाली तरी ग्रामपंचायत समिती व सरपंच बहुतांश तेच ते असतात. यामुळे लोकांचा मताधिकार व ग्रामपंचायतचे महत्त्व आपोआप कमी होत असते. तेच ते चेहरे जर ग्रामपंचायत मध्ये जात असतील आणि गावाचा विकास काही होत नसेल,पैसा आणि सत्तेच्या आकर्षणापायी अनेक युवकसुद्धात आपले भविष्य आजमावत असल्याचे दिसून येते.आजकाल ची युवा पिढी ही सर्व सामान्य घरातील आहे. गावातील सर्व सामन्य युवक हा मोठयाच अनुकरण करतो..आणि आपली शोकांतिका ही की गटबाजी, भाऊबधकी,या विळख्यात आटकून स्वतःच ही नुकसान होत.आणि गावाचा विकास खुंटत आहे..



गावातील सांडपाण्याच्या व्यवस्थापनापासुन तर सर्व मुलभुत सुविधा पर्यंत व्यवस्थित सुविधा मिळत नसेल तर दरपाचवर्षी निवडणुक घेउन फायदा काय. निवडणुकिचा उद्देशच असतो सत्तेत असलेल्या लोकांनी जर लोक विकासाची कामे केले नाही तर त्यांना खाली बसवून दूसऱ्यांना संधी निर्माण करून दिली जाते. आणि यामध्ये युवकांचा सहभाग असणे गरजेचे असते. परंतु अनेक गावामध्ये ग्रामसमस्या अनेक वाढलेल्या असताना आणि वारंवार तेच ते लोक निवडणूक लढवून ग्रामपंचायत मध्ये जात असतील याचा अर्थ तेथील युवा वर्ग झोपलेला आहे. आपल्या शिक्षणाचा व क्षमतेचा वापर तो आपल्याच गावासाठी करण्यास सक्षम नाही असा त्याचा अर्थ होतो. काही काही ग्रामपंचायत खुप चांगल्या प्रकारे काम करून स्वतःच्या गावाचे नाव लौकिकासोबतच ग्राम विकास करून घेतात. त्या गावामध्ये गेले तर आपल्याला विकास काय असतो, इमानदारी काय असते याची प्रचिती येत असते. जर काही ग्रामपंचायत खूप काही प्रगत करून गावातील लोकांना सर्व सुविधा मोफत देऊ शकतात तर इतर ग्रामपंचायत का देऊ शकत नाही याचे उत्तर शोधले तर काही काही ग्रामपंचायत मधुन कामे कोणकोणते चालतात, आपण भरलेला कर ग्रामपंचायत कोठे खर्च करते याची माहीतीच नसते. ती माहिती करून देण्याची जबाबदारी तरूण वर्गाची आहे. मुलांनी समोर येऊन गावाचे नेतृत्व केले तर बऱ्याच समस्या तेथेच मिटतात. परंतु तरुण वर्ग समोर येण्यास तयार होत नाही ही खेदजनक बाब आहे. आदर्श ग्रामपंचायत काय असते, आदर्श गाव निर्माण कसे करायचे, गावातील लोकांना प्रवाहात आणुन गावचा विकास कसा करायचा, गावाला सक्षम व स्वावलंबी कसे बनवायचे याचे नियोजन तरुणाईकडे असून सुद्धा तरुणाई निवडणुकीमध्ये उमेदवार बनुन गावाच्या हिताचे काम करण्याची तयारी दाखवत नाही पण गावातील निधी खाणाऱ्या, आज पर्यंत नविन चेहऱ्यांना संधी न देणाऱ्या एकाच घरातील सदस्य सरपंच असणाऱ्या लोकांच्या मागे जाऊन त्याचा प्रचार वा त्याचे समर्थन करतात. तेथेच शिक्षणाची आणि आपल्या नेतृत्वाची माती होते. अडाणी आणि अल्पशिक्षित लोक सत्तेत असतात आणि शिक्षीत तरुण त्यांच्या मागेपुढे फिरत बसतो. रिकामा गप्पा मारुन वेळ खर्च करणारा तरुण मात्र गावाच्या कल्याणासाठी कधीच चर्चा करताना दिसत नाही. तरुणाईने मग मुलगी असो मुलगा दोघांनी जर माझे गाव सुधारण्याची जबाबदारी माझी आहे. हे ठरवून पुढाकार घेतला तर प्रत्येक गाव आदर्श झाल्याशिवाय राहणार नाही. युवकांनी समोर येऊन नेतृत्व केले तर गावातील कामात पारदर्शकता येईल, आज पर्यंत चालत आलेल्या अलिखित नियमांवर बंदी येईल, ग्रामविकास निधी गावातील लोक कल्याण कामासाठी खर्च होईल, आणि ग्रामपंचायत चे मुळ काम काय आहे, आणि ग्रामपंचायत मुख्य उद्देश काय आहे हे सिद्ध होऊन राजकीय जागृती निर्माण होईल. ग्रामपंचायत गलीच्छ गढूळ आणि द्वेषाचे राजकारण करण्यासाठी करण्यासाठी नसुन ग्रामपंचायत सर्वांगीण विकास करण्यासाठी आहे हा समज निर्माण होईल. आणि ज्यांच्या कडे गावाला विकसित करण्याची क्षमता आहे असे तरुण गावाला पुढे नेण्यासाठी तयार होतील. गावातील ग्रामपंचायत निवडणुक ही आपल्या गावाचे भविष्य ठरवू शकते याची खात्री प्रत्येकाला होईल.निवडणुकिमध्ये पैसा वाटून, दारू मटण चारून उमेदवार खर्च करत असेल आणि तो जर निवडून आला तर तो गावाचा विकास वा लोकांचे काम कशाला करेल? आणि सर्वात महत्वाचे म्हणजे त्याला जर लोकांचेच काम करायचे तर मग तो पैसा दारू कशाला देईल. तरूण वर्गाने आपल्या मेंदूची बंद पडलेली दार उघडून सामाजिक जाणीवेचे भान ठेवणे आवश्यक आहे. ग्रामपंचायत निवडणुकिचा खर्च वाचवून दर्जेदार निवडणूक घेण्याची क्षमता ही फक्त तरुणांमध्येच आहे. तरूणाने ग्रामपंचायत निवडणूक लढवून ग्रामपंचायत मध्ये गेले आणि दमदार कामगिरी करून आपली छाप निर्माण केली तर स्वतः ला तर यश मिळेलच परंतु गावाचा विकास होऊन एक नवीन नेतृत्व निर्माण होईल. प्रत्येक गावामधून निर्भीड, प्रामाणिक आणि तरुण नेतृत्व पुढे आले तर देशात प्रामाणिक आणि नविन दमाच्या नेतृत्वाची निर्मीती होऊन देशात परिवर्तनाची व नव्या नेतृत्वाची लाट येईल. सक्षम भारताची युवा नेतृत्वाची सुरुवात ही ग्रामपंचायत पासुनच होते म्हणून सक्षम भारताची धुरा सांभाळण्यासाठी तरुणांनी सज्ज होणे भारताची धुरा सांभाळण्यासाठी तरुणांनी सज्ज होणे गरजेचे आहे.चौकात बसुन टिंगल टवाळ्या करून स्वतः चे नाव खराब केल्यापेक्षा, गाव विकासाची कास हाती घेऊन गावाचा विकास करण्यासाठी तरुणांनी हातात हात घेऊन ध्येय पुर्ती करावी. व्यसन करून बदनाम न होता गावाचा गाडा हाकण्याची जबाबदारी घेऊन नाव कमावणे कधीही चांगलेच. भरकटलेल्या युवकांनी ग्रामपंचायत मधुन आपली क्षमता दाखवून व गावाचा गौरव करून देशाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी माझी आहे. अशी भावना निर्माण झाली तर गावातील संसद गावातच विकसित होऊन देशाच्या संसदेमध्ये नेतृत्व करण्याची संधी मिळेल. ग्रामपंचायत च्या माध्यमातून देश मजबूत करण्याची शक्ती मीळते म्हणून तरुणांनी ग्रामपंचायत निवडणुकी मध्ये सक्रीय सहभागी होऊन आपले गुण दाखवून द्यावे तरच निवडणुकिचा उद्देश साध्य होईल.

इंजि. चंदर अहिरराव
संपर्क क्र. : 8530413801

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# राहुल गांधींच्या यात्रेवर काँग्रेसचा करोडोचा खर्च ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**काँग्रेस पक्षाचे नेते खा. राहुल गांधी यांच्या भारत यात्रा जोडो या पदयात्रेने महाराष्ट्रातील म्हणजे महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यात पहिला टप्पा पूर्ण केला आहे. गांधी हे ७ नोव्हेंबर ११ नोव्हेंबरपर्यंत या जिल्ह्यात होते. त्यांच्या स्वागताची दोन महिन्यापासून नियोजन करण्यात येत होते. नवल याचे वाटते की, गांधीकडे पक्षाचे अध्यक्ष अथवा पदही नाही. तरीही पक्षातील राष्ट्रीय अध्यक्षापासून सर्वच वरिष्ठ नेते त्यांच्यासमोर नतमस्तक होत आहेत. इतकेच नव्हे, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष खरगेपेक्षा गांधी हेच पक्षाचे प्रमुख आहेत, त्यांच्या सल्याशिवाय व आज्ञेशिवाय पक्षाचे पान हलविणार नाही. पक्षात गांधी परिवाराचे पक्षातील वर्चस्व कायम राहिल, हे पक्षाच्या सर्व नेत्यांनी शिक्कामोर्तब केले आहे. पक्षाचे गांधी कुटुंब काँग्रेसचे कुल दैवत आहे. गांधी परिवारांवरील निष्ठा, सेवा, आशीर्वादाशिवाय फळ मिळणार नाही, त्यांच्याशिवाय पक्षाला पर्याय नाही. तेंव्हा गांधी परिवाराबाहेरील राष्ट्रीय अध्यक्ष निवडला तरी त्यांचा सल्ला, आदेश पक्षाच्या अध्यक्षांसह इतर सर्वांकडून शिरसावंध मानला जाईल हाच संदेश नेत्या पदयात्रेनिमित्त सामान्य कार्यकर्यांना दिला आहे. हे निश्चितच !**

महाराष्ट्रात म्हणजे, नांदेड जिल्ह्यात राहुल गांधींचे स्वागत अतिशय दिमाखदारपणे व्हावे, त्यात कोठेही कमरता पडू नये, याची काळजी राज्य नेत्यांनी काँग्रेसचे व जिल्ह्याचे नेते अशोक चव्हाण यांनी घेतली. त्यासाठी पक्षाने यात्रेवर कोट्यवधीचा खर्च केला आहे. केंद्रात व राज्यात पक्ष सत्तेत नसतानाही पाण्यासारखा पैसा खर्च केला. हा खर्च कोणी व कसा केला हे मात्र गुलदस्त्यात आहे. राहुलबांबाच्या निवासाची सोय, त्यांच्या व आवडी निवडीची जेवणाची काळजी घेतली गेली. पदयात्रेच्या देगलूर ते नांदेड रस्त्याची दुरूस्ती करण्यात आली. एरव्ही रस्त्यावरील 'खड्डे बुजवा' असे लोकांच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करणारा बांधकाम विभाग मात्र काँग्रेस पक्षाच्या मदतीला धावून गेला. यासाठी पालकमंत्री गिरीश महाजन यांनी सहकार्य केले, अशी चर्चा आहे. बांधकामासाठी वा दुरूस्तीसाठी आता निधी कसा उपलब्ध झाला? जिल्हा प्रशासन काँग्रेसच्या पदयात्रेची तयारी करत होते, तरी जिल्ह्यातील भाजपा नेत्यांनी आक्षेप घेतला नाही. भाजपा नेते बिळात जाऊन बसले. त्यांनी गांधींच्या व पक्ष नेत्यांच्या आरोपाला प्रतिउत्तर देणे टाळले.

राहूल गांधींची पदयात्रा तेलगंणा येथून दि. ७ रोजी सांयकाळी तेलंगणा सीमेवर असलेल्या महाराष्ट्र सीमेवर असलेल्या देगलूर (जि. नांदेड) येथे आली. या ठिकाणी काँग्रेस नेते दिवसभर तेथेच मुक्कामाला होते. त्यांच्या स्वागतासाठी देगलूर शहरात कमानी, झेंड्यांनी सजविलेले होते. गांधींचे पक्षाने जोरदार स्वागत केले. रात्री मशाल मिरवणूक काढली होती. तसेच पदयात्रेच्या रस्त्यावर भव्य कमानी स्वागताचे बॅनर आणि पक्षाचे झेंडे लावले गेले होते.

राहूलबाबांच्या सुक्षतेसाठी पोलीस बळ मोठ्या प्रमाणत तैनात केले गेले होते. गांधींच्या मुक्कामस्थली भव्य मंडप आणि स्वागताची जबाबदारी स्थानिक नेत्याकडे देण्यात आली होती. हे गांधी पदयात्रेत चालत असताना हजारो पोलिसांचे सुरक्षा कमाडो चौहो बाजूंनी कडे करत सोबत चालत होते. त्यांच्या परवानगीशिवाय सामान्य माणसाला परवानगी येथे परवानगी दिली जात नव्हती. पण गांधी हे सामान्यांना भेटत होते, अशी त्यांची प्रतिमा तयार करण्याचा खटाटोप काँग्रेस नेते करत होते. विविध वेशभूषा घातलेल्यांना तसेच ग्रामीण एखादा माणसाला छायाचित्र काढण्यापुरते सोबत घेतले जायचे. यावेळी एन.सी.सी.चा गणवेश घातलेल्या विद्यार्थांना काँग्रेसने राजकारणात ओढले आहे. त्यांच्या हातात मोदी विरोधी फलक देण्यात आले होते. या पदयात्रेतील नेते व यातील काँग्रेस वारकऱ्यांसाठी रूचकर जेवणाची म्हणजेच व्हेज व नॉनव्हेज'ची व्यवस्था केली गेली होती. गांधीच्या पदयायात्रे निमित्त स्वागतापर जाहिरातीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला गेला. किमान यामुळे वृत्तपत्रातून दररोज पदयात्रेचे पानभर कव्हरेज मिळाले. वृत्तपत्रानी इमान राखले, 'ज्याच खाव मीठ त्याच कराव नीट' हे पत्रकारांनी पाळल आहे. त्यांनी गांधीजींच्या विधानाला मुख्य मथळा दिला. राहुलजींची कौतूक करणाऱ्या चौकटीतल्या वृत्त पेरण्याचे काम काँग्रेस मिडीया हाऊसने केले. पत्रकारांनी या दरम्यान कोठेही टीका टिप्पणी केलेली दिसत नाही. त्यांनी पत्रकारितेचा धर्म पाळला का? तेंव्हा वृत्रपत्र स्वातंत्र्य विकत घेता येते! हे काँग्रेस पक्षाकडून शिकले पाहिजे. काँग्रेसची पदयात्रा पत्रकारांसाठी सुगी ठरली आहे. पण राष्ट्रीय व राज्य वृत्तपत्र वाहिन्यांनी मात्र पदयात्रेची फारशी दखल घेत नाहीत, ही त्यांची खंत होती. काँग्रेस पक्ष कोट्यवधीचा खर्च करतो इतर पक्ष हे 'भिकारचोट' आहेत, असे पत्रकारांना वाटत असावे. पण आता भाजपा कमी नाही राजकीय सोहळ्यावर करोडाचा रुपये खर्च करतो आहे. या राजकीय पक्षाकडे इतका पैसा कोठून येतो? हे कोणी विचारणार व चौकशी सुध्दा होत नाही. या खर्चाचा 'इडी'लाही शोध लागणार नाही. राहुल गांधीच्या या पदयात्रेत पक्षाचे वरिष्ठ नेते सहभागी झाले होते. तर नांदेडच्या जाहीर सभेत तर राष्ट्रवादी काँग्रेस, उध्दव शिवसेना पक्षाच्या नेत्यांनी हजेरी लावली. इतर पक्षाचे काँग्रेसप्रमाणे समविचार व मोदी द्वेष मान्य असेल, तर त्यांनी आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्यास काय हरकत आहे? मोदींना पराभूत करण्यासाठी पक्षाची एकजूट हा पर्याय नाही काय? आधुनिक गांधीचींच्या 'भारत जोडो' यात्रेचे फायदे व तोटेही आहेत. त्यांनी पदयात्रेतून मोदीं व भाजपाला शिव्या दिल्या तर हक्काचा बहूसंख्य मुस्लिम मतदार पक्षाला जोडला जाईल, यातून पक्षाला उभारी मिळेल, असे जानकारांचे मत आहे. तेंव्हा भाजपा, आरए.एस.एस या हिंदुत्ववादी संघटनेवर सतत हल्ला करण्यावर भर दिला जातोय! देशात केवळ हिंदुत्वादी संघटनेमुळेच देशात व्देष पसरला चालला आहे, तेच देश तोडत आहेत असा गंभीर आरोप करत आहेत. पण दुसरीकडे कट्टर मुस्लिम राजकीय संघटनेच्या कृतीवर विरोधात शब्द काढत नाहीत! देशावर हल्ले करणारे अतिरेकी, पी.एफ आय.मुस्लिम लिग, एम.आय.एम. यासारखे पक्ष तसेच देश तोडण्याची षडयंत्र रचणाऱ्या प्रवृत्तीच्या विरोधात बोलणे म्हणजे मुस्लिम बांधव नाराज होतील. तेंव्हा ते त्यावर बोलणे पध्दतीशपणे टाळले जात आहे. देशातील एकता, बंधूभाव कायम रहावा, यासाठी राजकीय पक्षाची राजकारण बाजूला ठेवल पाहिजे. पण धार्मिक भेदभाव, हिंदु विरोधी द्वेषाची बीजे पेरून काँग्रेस पक्षही भारत जोडणार आहे काय? राहुल गांधी हे क्रांतीवीर सावरकर, हिंदुवादी संघटना, भाजपाला राष्ट्रद्रोही ठरवत आहेत. मग विव्दान राहुल गांधी यांची व पक्षाची विचारधारा केवळ राष्ट्रप्रेमी आहे. हेच सांगत आहेत. या राजकीय व्देषातून गांधी हे पदयात्रेत भाजपा व मोदीवर हल्ला करत आहेत. ही भारत जोडो नव्हे, तर मोदी हिंदु संघटना विरोधी यात्रा आहे, असा संदेश मात्र जात आहे. याचा फायदा होईल असे काँग्रेसला वाटते. सरकारने उत्तरही दिले. तरी गांधीचे समाधान होत नाही. त्यात मोदी उद्योग मित्रांना फायदा देत आहेत, असा एक आरोप आहे. तर राजस्थान काँग्रेसचे मुख्यमंत्री अशोक गहिलोतनी तर मोदींचे मित्र तर आडाणी गुप्र सोबत यावर्षी २०२२ मध्ये करार केलेला आहे. जैसलोर येथे सोलर पावर प्लँट उभारणीसाठी २३९७.५४ हेक्टर जमीन दिली आहे, हे त्यांना माहित नाही काय? गांधींनी पदयात्रेत 'महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळविणाऱ्या मोदींना धडा शिकवा'तसे त्यांनी



तसेच राहुल गांधींच्या पदयात्रेतील भाषणात मुद्दे पाहिले, तर जुनेच आहेत. हे विषय दिल्ली ते संसदेपर्यंत चर्चा जाऊन चौथा झालेले आहेत. यात महागाई, बेकारी, नोटबंदी तसेच मोदी उद्योग मित्रांचा फायदा. या जुन्या आरोपांचे ते गुऱ्हाळ चालवित आहेत. काँग्रेस सत्तेत असताना महागाई, बेकारी विषय होतेच. तेंव्हाही पक्षाला सोडविता आलेले नाहीत. नोटाबंदीत महिनाभर नोटा बदलण्याची संधी दिली गेली होती. काँग्रेस कारकिर्दीत नोटबंदीचे निर्णय झालेला आहे. वास्तविक दहा वर्षांनी नोटबंदीचा निर्णय घेतला गेला पाहिजे, असे अर्थतज्ञांचे मत आहे. वास्तविक नोटा छापणे बंद केले पाहिजे, त्या मर्यादित असल्या पाहिजेत डिझटल करन्सी हा काळापैश्यावर उपाय आहे. या नोटबंदीचा गरिबांना नव्हे, तर राजकीय नेत्यांना, बड्या लोकांना, अतिरेक्यांना फटका बसलला आहे. देशातील राजकीय नेत्यांनी रांगेत उभे राहून नोटाच बदलेल्या नाहीत. राहूल गांधी गांधींकडे त्यावेळस केवळ चार हजार रूपयेच होते का? हा विषय वारवार काँग्रेसने संसदेत अनेक वेळा उपस्थितीत केला, याचे भाजपा एक विधान केले आहे. त्यांचे सद्या गुजरात, हिमाचल प्रदेशात विधानसभेची सेमी फाईनल निवडणूक होणार आहे, याचे त्यांना भान नाही. त्यांचे हे विधान गुजरात निवडणुकीत काँग्रेसच्या मुळावर येण्याची शक्यता आहे. गुजरातच्या भाजपा नेत्यांनी प्रचारात हा मुद्दा उचला तर काँग्रेस पक्ष अडचणीत येऊ शकतो. विशेष म्हणजे, हे आधुनिक गांधीबाबांच्या आरोपांच्या यादीत भ्रष्टाचार शब्दच दिसत नाहीय! ते कोठेही राजकीय भ्रष्टाचारावर बोलले नाहीत. दिल्ली ते महाराष्ट्रापर्यंत अनेक राजकीय नेत्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, यात गांधी कुटुंब सापडलेला आहे. या प्रश्नावर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, उध्दव शिवसेना पक्षात एकमत आहे. भारतीय राजकारणात नैतिकता शब्दच राहिलेला नाही भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचा दर्जा दिला जात आहे. राजकीय नेत्यांना भ्रष्टाचाराच्या आरोपातून जामीन जरी मिळाला की, लगेच त्या नेत्यांचे स्वागत, तसेच सन्मानपूर्वक मिरवणूक काढण्याची परंपरा सुरु झाली आहे. शंभर गुन्हेगार सुटले तरी चालतील मात्र पण निरपराध व्यक्तीला शिक्षा होता होऊ नये,हे न्याय व्यवस्थेचे तत्व आहे, त्याचा फायदा राजकीय नेत्यांना घेत आहेत. भारतीय घटनेत शरियतप्रमाणे भ्रष्टाचारावरुन राजकीय नेत्यांना फाशी देण्याची तरतूद नाही. राहुल बाबांच्या पदयात्रेवर काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांचेच वर्चस्व राहिलेले आहे. त्यांच्याच नेतृत्वाचा उदो, उदो सर्वत्र दिसून येत होता. चव्हाणांच्या 'छबी'चे फलक सर्वत्र झळकले गेले. तेंव्हा ते आता गांधी कुटुंबाच्या विश्वास पात्रेत उत्तीर्ण झाले आहेत, असेच म्हणावे लागेल. तेंव्हा येत्या २०२४ च्या नांदेड लोकसभेचे काँग्रेस पक्षाचे चव्हाण उमेदवार असतील. दुसरीकडे नेते स्व.शंकरराव चव्हाण यांची तिसरी पिढी राजकारणात उतरली आहे. यावेळी अशोक चव्हाणांनी आपली कन्या श्रीजयाला पदयात्रेच्या निमित्ताने पुढे आणले गेले. तेंव्हा ती येत्या भोकर विधानसभा मतदार संघातून पक्षाचा उमेदवार असेल! यात नवल काही नाही, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनीच भोकर विधानसभा पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम यांची उमेदवारी दिली होती. पण ऐनवेळी चव्हाणांनी कदम यांचा पत्ता कट केला आणि पत्नीचे नाव पुढे केले व निवडून आणले. तेंव्हा भोकर मतदारसंघात चव्हाण कुटुंबाशिवाय इतरांना संधीच मिळणार नाही, ही काळ्या दगडावर ची रेघ आहे. तर नायगाव मतदारसंघात मात्र पक्षात माजी खासदार भास्करराव पाटील यांची सून मीनलताई खतगावकर व माजी आमदार वसंतराव चव्हाण हे दावेदार असतील.

काँग्रेसची पदयात्रा नसून एकप्रकारे जत्रा भरत आहे. याला भारत जोडोचा गोडस नाव दिले आहे. ही पदयात्रा २०२४ च्या निवडणुकीच्या फायदा होईल या अपेक्षने काढली गेली आहे .पदयात्रेत गांधीबाबा सामान्य माणसाचे प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत, असे सांगितले. त्यांचे समस्या प्रश्न कोणते आहेत, हे पक्ष ते प्रश्न राष्ट्रीय व राज्य पातळीवर कसा सोडविणार हे पदयात्रेनंतर समाप्तीनंतर सांगितले जाईल तेंव्हाच पदयात्रेचा निष्कर्ष काढला जाईल. याचा पक्षाला किती फायदा होईल ते दिसलच, पण सद्या तरी त्याचा गुजरात व हिमाचल प्रदेश निवडणुकीत होणार आहे काय? सद्या काँग्रेस हे बुडते जहाज आहे, असे भाजपा नेते म्हणतात. पण गांधीचींच्या पद यात्रेमुळे काँग्रेस थोडेफार तरी वाचेल! किमान पक्षाचे नेते तरी उड्या मारणार नाहीत. गळती थांबेल! अशी आशा आहे. आधुनिक गांधी यांच्या पदयात्रेने ११ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील पहिल्या टप्पा नांदेडचा पूर्ण केला आहे. गांधीनी नांदेड काँग्रेसचा येथेच्छ 'पाहूणचार' घेऊन पुढे हिंगालीकडे प्रस्थान केले आहे.

# दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय : एक स्वागतार्ह निर्णय



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य ठरलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. महाराष्ट्र राज्य सरकारचा हा निर्णय स्वागतार्ह असून दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालया मुळे दिव्यांगांच्या आशा पल्लवित होणार आहे. आज भारतात तीन करोड दिव्यांग आहेत, असे सरकारी जनगणनेच्या नोंदींवरून सांगण्यात येते. याशिवाय ज्यांची शिक्षण, व्यवसाय यात सहभाग नसल्यामुळे कुठेच नोंद नाही, असे अजून किती तरी दिव्यांग येथे आहेत. मात्र इतक्या प्रचंड संख्येने असलेल्या या विकलांगांच्या समस्या व प्रश्न शासन दरबारी अजूनही लाल फितीत अडकलेले आहेत.**

या पार्श्व भूमीवर महाराष्ट्र सरकारने दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याचा जी निर्णय घेतला तो प्रशंसनीय व दिव्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणारा असेल, अशा प्रकारचे एक आशादायक आनंद दिव्यां बंधून मध्ये निर्माण होत आहे.. हा निर्णय निश्चितच आशादायक व स्वागतार्ह आहे.

अनेक दिव्यांग खेळाडूंनी विपरीत परिस्थितीवर मात करीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके जिंकली. मात्र, चमकदार कामगिरीनंतरही राज्य शासनाने अद्याप त्यांची दखल घेतली नाही. उदरनिर्वाहासाठी त्यांना नोकरीची नितांत आवश्यकता असून, शासनाने आतातरी त्यांना रोजगार उपलब्ध करून द्यायला पाहिजे.

दिव्यांगांना अपंगत्वाची झळ आयुष्याच्या प्रत्येक वळणावर सोसावीच लागते. लहानपणी हे शारीरिक विकलांगत्व समजून घेणे, आपल्या विकल भाऊ अथवा बहिणीसोबत त्यांच्या मनोदशा व शारीरिक क्षमतेचा समतोल साधत संवाद साधावा लागतो, त्यांच्यासोबत खेळावे लागते. त्यांच्याही मनात अनेक अनुत्तरित प्रश्न असतातच. त्यांचे मित्रही या विकलांगतेबद्दल त्यांना बोलतात. पण या वयात जिज्ञासेमुळे ते बोलत असतात. वेळीच त्यांना सत्य परिस्थिती सांगितली तर दिव्यांग मुलांना ते खूपच चांगल्या पद्धतीने समजून घेऊ शकतात. आणि त्यांच्या सकारात्मक सहवासाने दिव्यांगांतही लक्षणीय सुधारणा दिसून येते.

पाश्चिमात्य देशात सामान्य-असामान्य, स्वावलंबी-परावलंबी, विकलांग-दिव्यांग असे वर्गीकरणच नाही. फक्त त्यांच्या शारीरिक क्षमतेच्या कमतरतेमुळे त्यांना जास्तीत जास्त सुविधा देऊन त्यांचे जीवन सामान्य करण्याकडे तेथील सरकारचा कल असतो. तेथे जन्माला आलेला प्रत्येक जीव म्हणजे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असून तो देशाचा सन्माननीय नागरिक आहे आणि त्याला त्याचे सर्व अधिकार मिळायला हवेत, हे कायद्याने बंधनकारक आहे. त्यामुळे विकलांग-दिव्यांगांना अथवा त्यांच्या पालक व भावाबहिणींना तेथे सहजसोपे जगता येते. या उलट आपल्याकडे परिस्थिती आहे. विकलांगांबद्दल सहानुभूती वाटणे, त्यांना मदत करणे हा सामाजिक सेवेचा एक राजमान्य मार्ग आहे. निखळ सत्य



फार विपरीत आहे. आज ज्या काही संस्था, व्यक्ती अशा दिव्यांगांकरता काम करत आहेत, त्यांच्या घरात असे दिव्यांग आहेत म्हणूनच. अन्यथा या प्रश्नाकडे मुद्दाम किंवा निखळ समाजसेवेच्या भावनेने कुणीच वळत नाहीत. विवाहप्रसंगी तर दोन घराणी जोडली जाणार असतात. ज्या घरात दिव्यांग व्यक्ती आहे तेथील सुशिक्षित, संपन्न विवाहोत्सुकांशी संबंध प्रस्थापित करायला शक्यतो कोणी तयार होत नाही. (याला काही अपवाद आहेत.) विकलांग मूल घरात असेल व त्याच्या भावाच्या विवाहाचे वेध घराला लागलेले असतील व भावाची नोकरी, शिक्षण, मिळकत, सर्व चांगले असूनही मुलीकडचे लोक व स्वतः मुलगी हा विवाह ठरवताना अनावश्यक अटी घालतात. त्यात लग्नानंतर विभक्त राहणे, विकलांगास हॉस्टेलमध्ये ठेवणे, भविष्यात त्याच्यासह आईवडिलांशी संबंध न ठेवणे याचा विशेषत्वाने आग्रह असतो. क्वचित एखादी मुलगी अटी न घालता विवाह करून अशा घरात आलीच तर ती अपंग व्यक्तीची जबाबदारी स्वीकारत नाही. घरात समरस न होता अलिप्त राहून परावलंबी व्यक्तीवरून घरातल्या सर्वांनाच मनःस्ताप होईल, असे बोलते. आपल्या अपंग मुलामुळे ही समस्या निर्माण झाली, ही जाणीव पालकांना अस्वस्थ करते. सामान्य, निर्व्यंग मुलाच्या संसारात या कारणाने रोजच्या कटकटी नको, म्हणून पालक आपल्या अपंग मुलाला घेऊन वेगळे राहण्याचा निर्णय घेतात. पर्यायाने लहानपणापासून आपल्या निष्पाप व परावलंबी भावाबद्दल वाटणारे प्रेम हृदयाच्या कप्प्यात बंदिस्त करून निर्व्यंग विवाहित भावाला आपला संसार सांभाळण्यास प्राधान्य द्यावे लागते. परिस्थितीमुळे आपल्या अपंग भावाचा व आईवडिलांचा सांभाळ त्याला करता येत नाही.

# संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प



संजीवन दिवे
संपर्क क्र. 9403696322.

आधुनिक केसरी

**शाळा भेटी करताना विद्यार्थ्यांचे वाचन, लेखनआणि हस्ताक्षर याबाबतीत तपासणी केली असता, असे निदर्शनास आले की विद्यार्थ्यांना वाचन करता येते. वाचन करताना पाहिजे तितका आत्मविश्वास त्यांच्यामध्ये दिसून येत नाही. अधिकाऱ्यांपुढे मुलांनी व्यवस्थित वाचावे यासाठी शिक्षक सुद्धा त्यांना प्रेरित करताना दिसून आले. हा दोष मात्र कुणाचाही नाही. फक्त विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वासची कमी दिसून आली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी काय करावे लागेल? यावर चिंतन केले. मग मनाशी ठरवले. आपण ज्यावेळी शाळा भेटी करू, तेव्हा शिक्षक आणि विद्यार्थी दोघांमध्येही प्रेरणा निर्माण होण्यासाठी आपल्याला काय करता येईल? पालकांच्या विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षा आहेत? शिक्षकांकडून पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या काय अपेक्षा आहेत? निव्वळ अधिकारी म्हणून आपणच अपेक्षा ठेवणं हे कितपत योग्य आहे? विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या ही काही समस्या असू शकतात. त्या सोडवण्यासाठी आपली अधिकारी म्हणून काय भूमिका आहे? विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सामाजिक वातावरण कसे आहे? या सर्वांचा विचार करून मी एक प्रयोग करण्याचे ठरवले.**

**इंग्रजी वाचनाबाबत**

कोणतीही भाषा शिकण्यासाठी प्रथम श्रवण अत्यावश्यक आहे. आपल्या स्वतःचे कौशल्य वापरून श्रवण,भाषण, वाचन, लेखन या पायऱ्या नुसार छोटासा संवाद वाचन प्रत्यक्ष विद्यार्थी आणि शिक्षक यांना शिकवला. वाचन शिकवताना विद्यार्थ्यांना समक्ष काय समस्या येतात? याचा शोध मला लागला. इंग्रजी वाचताना मुलांची जीभ वळत नाही. इंग्रजी उच्चारानुसार ओठांची हालचाल होत नाही. अनोळखी शब्द परके परके वाटू लागतात. कानावर न पडलेले शब्द बोलायचे कसे? इंग्रजी पाठ वाचताना, जो पाठ कधी शिकलोच नाही आणि डायरेक्ट वाचायचं? त्यांच्या चेहऱ्यावरील भाव मला स्पष्ट वाचता येत होते. यावर पर्याय म्हणून मी प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचे नाव विचारले. त्यामुळे त्यांना माझी जवळीक वाटली. कारण मी काही त्यांना शिकवणारा नियमित शिक्षक नाही. मी तर फक्त तपासणी करणारा अधिकारी. शाळेमध्ये साहेब आले शाळेचे पूर्ण वातावरणच बदलून जाताना, मी पाहिले आहे. विद्यार्थ्यांना शिकवण्या अगोदर त्यांच्याशी गोड-गोड बोलून त्यांची मानसिक तयारी करून घ्यायला लागलो. साधारण दहा मिनिटांमध्ये इंग्रजी चा एक पॅरेग्राफ त्यांना वाचायला शिकवायचो. मी पहिल्यांदा विद्यार्थ्यांचे श्रवण कौशल्य विकसित होण्यासाठी स्पष्ट वाचन करून दाखवायचो. त्यांच्याकडून उच्चार म्हणवून घ्यायचो . त्यामुळे त्यांचे प्रथम श्रवण कौशल्य आणि नंतर भाषण कौशल्य विकसित होताना मला दिसून आले. आणि याच वेळी त्या शब्दांची एक प्रतिमा त्या विद्यार्थ्यांच्या मनामध्ये, बुद्धी मध्ये तयार होताना जाणवले. लागलीच माझा प्रयोग यशस्वी झाला. मुलं आत्मविश्वासाने वाचन करून दाखवू लागली. त्यांना शिकवणारे शिक्षक सुद्धा आश्चर्याने भावना व्यक्त करू लागले. अनेक शाळा भेटी करता करता हा प्रयोग मी करायला लागलो. प्रयोग यशस्वी झाल्यानंतर जेव्हा शाळेतून निघायचो. तेव्हा एक अचंबित करणारी गोष्ट माझ्या निदर्शनास आली. ज्या वर्गाला मी इंग्रजी वाचन शिकवलं, ती मुले -मुली आनंदाने मला टाटा,बाय-बाय म्हणू लागली. परत कधी येणार? असेही विचारू लागले. झाली विद्यार्थ्यांची माझी जवळीक. यातून मात्र एक शिकायला मिळालं.

ज्या शाळेवर तपासणीसाठी जाणार, विद्यार्थ्यांशी जवळीक कशी करायची, याचे कौशल्य ही मी आत्मसात करून घेतली. मी ज्यावेळेस विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन शिकवत असे, त्यावेळी एखादे शिक्षक त्याची व्हिडिओ शूटिंग काढीत असे.ती शूटिंग पालकांच्या इतर शिक्षकांच्या ग्रुप वर जायची, त्यामुळे या कामाचा प्रसार आणि प्रचार झाला. काही शाळा भेटी मी न करताही व्हाट्सअप च्या माध्यमातून माझे व्हिडिओ पाहून, इतर शाळांनी हा प्रकल्प राबवायला सुरुवात केला. फोनवर माझे मार्गदर्शन घेतले. ज्या ठिकाणी समस्या येत होत्या,त्या ठिकाणी मला बोलावण्यात आले. जाणीवपूर्वक तेथे जाऊन तो प्रयोग यशस्वी करून दाखविला. लागले चौथीचे मुलं वाचायला. त्यांचे पाहून इतर लहान वर्गातील मुलेही, आम्हाला इंग्रजी वाचन शिकवा असे त्यांच्या शिक्षकांना म्हणून लागेल. इंग्रजी वाचनाचे आकर्षण विद्यार्थ्यांना निर्माण झाले. घरी गेल्यावर पालकांनाही हट्ट करू लागले, माझा अभ्यास घ्या. मला इंग्रजी वाचन शिकवा. अनेक शाळांचे मुले इंग्रजी वाचन करतात,असे माझ्या निदर्शनास आले. त्यावरुन मला एक क्लुप्ती सुचली. भेटी वेळी जे- जे विद्यार्थी चांगले वाचन करतील, त्यांचा व्हिडिओ मी काढू लागलो. माझ्या स्टेटस ला ठेवायला लागलो. माझे टेटस साधारण 800 पेक्षा जास्त लोक पाहतात. मला सर्वांनी अभिनंदन, सुंदर, फारच छान, आता जिल्हा परिषद शाळा पुढे जाणार, ग्रामीण भागातील मुले इंग्रजी शिकणार, विद्यार्थ्यांची इंग्रजीची भीती गेली, आपण फार चांगलं काम करत आहात, असे एक ना अनेक मेसेज यायला लागले. त्यातून असं वाटलं. या नुसार आपण एक प्रकल्प तयार करू.. जे शिक्षक इंग्रजी वाचन शिकवतात, त्यांनीच आपल्या विद्यार्थ्यांचा व्हिडिओ काढायचा. आणि स्वतःच्या मोबाईल वर स्टेटस ठेवायचा. शिक्षकांकडे BLO. चे काम असल्यामुळे गावातील सर्व नागरिकांचे मोबाईल नंबर त्यांच्याकडे सेव आहेत, त्याचप्रमाणे शिक्षकांचेही मोबाईल नंबर संपूर्ण गावातील नागरिकांकडे सेव आहेत. त्यामुळे एकमेकांचे टेटस ते पाहू शकतात, हि थीम लक्षात घेऊन, प्रकल्प माझ्यासमोर उभा राहिला. राहता तालुक्यातील शिक्षकांना मी आव्हान केले, की आपण आपल्या वर्गातील, ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन येते. त्यांचा छोटासा व्हिडीओ काढा. विद्यार्थ्यांना ते अप्रूप वाटू लागले. तो व्हिडीओ शिक्षक स्टेटसला ठेवू लागले.

आपण कसे वाचतो, हे पाहून विद्यार्थ्यांना अत्यानंद झाला. आपला पाल्य कसा इंग्रजी वाचतो ?हे स्टेटस ला पाहिल्यावर, पालकांना सुद्धा खूप आनंद झाला. बरे गावातील एकाच वेळी अनेक नागरिक, आपल्या गावातील विद्यार्थ्यांचे इंग्रजी वाचन पाहू लागले. चर्चा सुरू झाली. आपल्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी इतक्या चांगल्या रीतीने इंग्रजी वाचन करतात. जिल्हा परिषद शाळेत इंग्रजी शिकवलं जात नाही असा एक लोकांचा समज होता. या प्रयोगामुळे पसरलेला गैरसमज दूर झाला. सरांच्या मोबाईल टेटस ला आपण दिसणार म्हणून विद्यार्थ्यांमध्ये चुरस निर्माण झाली, एक प्रकारची स्पर्धा तयार झाली. त्याचबरोबर या उपक्रमाविषयी वृत्तपत्रांमध्ये बातम्या येऊ लागल्या. त्या सर्व बातम्या पालक, शिक्षक वाचू लागले. प्रकल्पाला उत्तम रीतीने प्रसिद्धी मिळू लागली. मुले घरी गेल्यावर इंग्रजी पुस्तकच वाचू लागेल. समस्या आल्यावर पालकांना विचारू लागली. पालक



सुद्धा मुलांचा अभ्यास घ्यायला लागले. पालक सुद्धा मुलांचे इंग्रजी वाचनाचे व्हिडिओ काढायला लागले. ते व्हिडिओ शिक्षकांना पाठवू लागले. पालक स्वतः तो इंग्रजी वाचनाचा व्हिडिओ टेटस ठेवायला लागेल. त्यामुळे त्या पालकाचे नातेवाईक, मित्रमंडळी यांना हे छोटेसे विद्यार्थी किती छान इंग्रजी वाचन करतात. याबाबत पालकांवर कौतुकाचा वर्षाव झाला. या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, पालक या सर्वांना शाबासकी मिळू लागल्याने सर्वजण प्रयत्नाला लागले. बघता बघता || संजीवन इंग्रजी वाचन प्रकल्प || हे नाव कधी त्या प्रकल्पाला मिळालं, मलाही समजलं नाही.

**प्रकल्पाचे फायदे**

1) जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना इंग्रजी वाचन मुलांना शिकवण याबाबत प्रेरणा मिळाली. 2) इंग्रजी वाचन शिकण्यासाठी विद्यार्थी स्वतःहून पुढे यायला लागेल.3) आपण इंग्रजी वाचू शकतो, हा आत्मविश्वास आल्याने विद्यार्थ्यांचे चेहरे खुलून गेले.4) सर, आज आपला व्हिडिओ काढून टेटस ला ठेवणार आहेत,या आनंदात, विद्यार्थी बागडू लागले.5) आपले बाळ इतके छान इंग्रजी वाचन करतोय आणि सगळं गाव टेटस वर पहातंय. त्यामुळे पालकांना अत्यानंद होऊन पालकाची एक प्रकारे गावात प्रतिष्ठा निर्माण झाली .6) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कशाप्रकारे कामकाज चालू आहे, सर्व गावात कळायला लागल्यामुळे, प्राथमिक शाळे कडे पाहण्याचा दृष्टिकोन नागरिकांचा अधिक चांगला झाला.7) गावात आणि शाळेत इंग्रजी वाचनाची शैक्षणिक चर्चा सुरू झाली.8) शिक्षकांना अनेक कौतुकाचे मेसेज गावातून, नातेवाईकांकडून, मित्रमंडळी कडून येऊ लागले . गावातून कौतुकाची थाप पडल्यामुळे शिक्षकांना भरपूर प्रेरणा मिळाली व ऊर्जा मिळाली.9) विद्यार्थी व शिक्षकांना इंग्रजी वाचनाबाबत कामकाज करण्याबाबत एक विशिष्ट दिशा मिळाली.10) जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजीचे वाचन येत नाही म्हणून पालक अस्वस्थ होते. पालक सुद्धा आनंदित झाले.11) गावात शिक्षकांचा मान आणि प्रतिष्ठा वाढली.12) एखाद्या दिवशी जरी शिक्षकांनी इंग्रजी वाचन घेतले नाही तर विद्यार्थी त्याची आठवण करून देऊ लागली, की आमचे इंग्रजी वाचन घ्या. आम्हाला इंग्रजी वाचन शिकवा.13) बऱ्याच नागरिकांना वाटत होते की जिल्हा परिषद शाळांमध्ये इंग्रजी शिकवले जात नाही, त्यांचा हा गैरसमज दूर झाला.14) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा इंग्रजी विषयाचा पाया पक्का झाला.15) एका शिक्षकाचा उपक्रम पाहून अनेक शिक्षक प्रेरित होऊन, आपल्याही शाळेत उपक्रम राबवू लागले.16) जिल्हा परिषद शाळेत मोफत आणि दर्जेदार शिक्षण मिळण्याच्या वाटा खुल्या झाल्या.17) लहान मुलांचे गावात कौतुक व्हायला लागल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सुधारणा झाली.18) शिक्षकांवर कोणत्याही प्रकारचा दबाव न देता उपक्रम सुरू केल्याने ते स्वयंप्रेरणेने उपक्रम अगदी मनापासून राबवू लागले.19) इंग्रजी वाचन आपल्याला येते,या जाणिवेतून विद्यार्थ्यांना सेमी इंग्रजीचा अभ्यास करणे सोपे वाटू लागले.20) आपला पाल्य इंग्रजी कसा वाचतो, हे पालकांना घरबसल्या समजू लागले.21) विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामधील दरी कमी झाली.22) बालक -पालक- शिक्षक सहसंबंध वाढला.23) शिक्षकांमध्ये एकमेकांच्या विचारांची देवाण-घेवाण सुरू झाली.24) शिक्षक, विद्यार्थी व अधिकारी यांच्यातील दरी कमी झाली.25) जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणारा विद्यार्थी कुठेही कमी पडणार नाही, असे माझे ठाम मत आहे.26) विद्यार्थ्यांना स्वतः अधिकारी शिकवतात, हा अनुभव विद्यार्थ्यांच्या भावी वाटचालीस दिशा देणारा आहे.27) जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांनी मनावर घेतले तर शाळाबाह्य किती कामे असली तरी गुणवत्ता वाढवू शकतात शकतात, हे या प्रकल्पातून दाखवून दिले.28) सर्व विद्यार्थ्यांची, सर्व शिक्षकांची, सर्व पालकांची, संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची प्रतिष्ठा वाढविणारा हा प्रकल्प आहे.29) शिक्षकांनी केलेले काम समाजाला दाखवण्यासाठी हा प्रकल्प उत्तम आहे. 30) विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा आत्मविश्वास वाढविणारा प्रकल्प आहे.

**(लेखक पंचायत समिती, राहाता येथे शिक्षण विस्तार अधिकारी आहेत.)**

# संस्कृती जपण्याची प्रेरणा देणारी 'पारंबी'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**लेखक डॉ. वैभव लोखंडे लिखित 'पारंबी' ही कादंबरी जीर्ण झालेल्या नात्यांमधील ओलावा पुनरुज्जीवित करणारी आहे. पिढ्यांमधील वैचारिक भिन्नता तसेच आपला वैचारिक वारसा, आपल्या परंपरा, संस्कृती, धार्मिक कार्य, पूजा- विधी इत्यादीची माहिती पुढच्या पिढीपर्यंत योग्य रीतीने संक्रमित व्हावी, ही साधी सरळ भावना या कादंबरीतून व्यक्त होते. पेशाने सर्जन असणारे डॉ. वैभव लोखंडे यांनी कोविड काळातील विश्रांतीच्या वेळेचा सदुपयोग करून आपल्यातील संवेदनशील, कल्पक, स्फुर्तीने या कादंबरीला स्वरूप दिले.ते डॉक्टर असले तरी त्यांच्यातील संवेदनशील लेखक हा कायम लेखणीतून व्यक्त होत राहतो.**

आयुष्य जगत असताना कालानुरूप परिवर्तन घडत राहते आणि ते परिवर्तन स्विकारून प्रत्येक जण काळासोबत सुसंगत राहण्याचा प्रयत्न करत असतो. पिढीनुसार जगणं - वागणं, आचार- विचार, राहणीमान, दृष्टिकोन भिन्न - भिन्न असतात. जुन्या पिढीतील व्यक्तींच्या गरजा, त्यांची विचारशैली वेगळी होती. या पिढीतील अंतरामुळे वैचारिक मतभेद स्वाभाविकपणे निर्माण होतात.

आजकालच्या धावत्या युगात प्रत्येकाला स्वतःचं अस्तित्व जपायचं असतं. आजची पिढी ही सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाशी जोडलेली आहे. सतत नवीन गोष्टी जाणून घेण्यास तरुण पिढी उत्सुक असते. उच्च शिक्षण घेऊन चांगलं करियर घडवणं, सुख- सोयींनी सुसज्ज आयुष्य जगण्याची अभिलाषा यामुळे काही जण नोकरीनिमित्त, शिक्षणानिमित्त परदेशी जातात आणि कालांतराने तिथेच स्थायिक होतात.

प्रगती करणं चांगली गोष्ट आहे, पण विदेशी चंदेरी दुनिया, तेथील वातावरण आणि अतिमहत्वाकांक्षेपोटी आपण आपले मूळ, आपली संस्कृती, नात्यांची ओढ यांना तिलांजली तर देत नाही ना? हा प्रश्न निर्माण करणारी कादंबरी वाचनात आली.


या कादंबरीचे कथानक काल्पनिक असले तरी त्यातील संदर्भ हे काळाशी सुसंगत आहे. प्रगतिपथावर मार्गक्रमण करताना आपण आपली पाळेमुळे घट्ट धरून ठेवायला हवीत, आपल्या संस्कारांचे, संस्कृतीचे जतन करणे प्रत्येक पिढीची जबाबदारी आहे, याचे स्मरण करुन देणारी ही कादंबरी आहे.

'पारंबी' कादंबरीचे शीर्षक किती समर्पक आहे!

शिव हा या कादंबरीचा नायक. तरुण पिढीचं प्रतिनिधित्व करणारा. लंडनमध्ये लहानाचा मोठा झालेला हा शिव पूर्णपणे पाश्चात्त्य संस्कृतीत वाढलेला. हसमुख, समंजस आणि मैत्री जपणारा. डायना, सोनिया, राहुल, जिग्नेश आणि शिव यांचा ग्रुप जमलेला. वेगवेगळ्या उद्देशाने विदेशात आलेली, विभिन्न भाषा, धर्म तरीही एका धाग्याने ही सर्व जोडली गेली होती , तो धागा अर्थात मैत्रीचा!

शिवचे वडील महेश हे आधुनिक विचारांचे तर शिवची आई वैदेही संवेदनशील, पूजा- अर्चा करणारी धार्मिक वृत्तिची. शिवचे वडील महेश आपल्या वडिलांच्या धार्मिक कार्य,पूजा - विधी करणं आणि आपल्या मंदिराच्या कार्यात लक्ष घालणं याबाबतच्या वैचारिक मतभेदामुळे आपले गाव सोडून परदेशात कायमचे स्थायिक होतात. त्यामुळे शिवला भारतातील आपल्या घराविषयी, मंदिराविषयी काहीच कल्पना नसते. महेश यांच्या हट्टी स्वभावामुळे शिव आणि त्याचे आजोबा यांच्यातील न फुललेलं अपूर्ण नातं , त्यांच्या नात्यातील दुरावा याला कारणीभूत असणारे शिवचे वडील इतके रुक्ष का वागतात ? आपले वडील आजारी असतानाही त्यांना भेटायला न जाणं , त्यानंतर थेट वडिलांच्या कार्यासाठी जाणं , या घटना मनाला वेदना देणाऱ्या आहेत. आपली मुलं कायमची परदेशात स्थायिक झाल्यानंतर पुन्हा घरी परतत नाहीत , त्यामुळे आई-वडिलांना एकटेपणा सहन करावा लागणं, आपल्या मुलांनी आपली विचारपूस न करणं हे आई - वडिलांसाठी किती वेदनादायी असते. आजी - आजोबांच्या सुखद सहवासाला नातवंडांना मुकावे लागणे जिव्हारी लागते, हे वास्तव आहे. सध्याच्या जगात हेच चित्र पाहायला मिळते.

आपलं नियोजित आयुष्य जगताना अचानक शिवला विचित्र स्वप्न पडू लागतात. स्वप्नात त्याला मंदिर, आजुबाजुचा परिसर, काही आकृत्या आणि कोणीतरी साद घालत आहे, असा भास होत राहतो. या स्वप्नांमुळे तो खडबडून जागा होतो, येथून सुरु होतो शिवचा रहस्यमय प्रवास. शिवला स्वप्नात दिसणाऱ्या या गोष्टींचा उलगडा करण्यासाठी तो सज्ज होतो. त्याला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची मोहीम सुरु होते आणि या स्वप्नांचा मागोवा घेणारी ही कहाणी हळूहळू उत्कंठावर्धक होत जाते. तृतीयपुरुषी निवेदन आणि पात्रांच्या संवादातून कादंबरी उलगड़त जाते. कादंबरीची रचना, ओघवती भाषाशैली आणि त्यातील गूढ वाचकांच्या मनात निर्माण होते आणि पुढे काय घडेल या उत्सुकतेमुळे वाचक त्यात गुंतत जातो. कादंबरीतील रहस्यमय गूढता लेखकाने शेवटपर्यंत टिकवून




ठेवली आहे.

या स्वप्नांचा मागोवा घेण्यासाठी, शिवला निःस्वार्थपणे या शोधकार्यात मदत करणारा शिवचा आतेभाऊ ऋग्वेद आणि शिव यांच्या नात्यातील प्रेमळ धागा किती सहजपणे लेखकाने उलगडला आहे. कधीही न पाहिलेल्या , फक्त फोनवरुन संपर्क करणाऱ्या आपल्या मामेभावाला शिवला आत्मियतेने सहकार्य करणारा ऋगवेद हे पात्र शिवप्रमाणे आपलेपणा निर्माण करतो.

शिव स्वप्नात दिसलेल्या गोष्टीचा छडा लावण्यासाठी भारतात जातो खरा पण त्याला त्याच्या प्रश्नांची उत्तरे मिळतात का? गावातील वाडा, नवनागाचे बंद असलेले मंदिर, त्यातील रहस्य नेमके काय ? या स्वप्नांचा नेमका अर्थ काय ? या शोधमोहिमेत शिवची उमाशी भेट होणं , शिवच्या आयुष्यात वेगळे वळण घेऊन येते का ? याचे उत्तर जाणून घेण्यासाठी 'पारंबी' कादंबरी वाचायलाच हवी. या कादंबरीत फक्त रहस्य दडलेली नाहीत तर नात्यांमधील हरवत चाललेले प्रेम, आपलेपणा , विभक्त कुटुंबपद्धतीमुळे घरातील व्यक्तिमधील हरवलेला संवाद , आजी- आजोबा आणि नातवंडं यांच्यात निर्माण होणारा दुरावा , पिढीमधील वैचारिक मतभेद यामुळे नात्यातील ओलावा कमी होत चालला आहे, याची जाणीव या कादंबरीमुळे होते. त्यासोबतच रक्ताच्या नात्यापलिकडील असलेलेले नाते म्हणजे मैत्री. एकमेकांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या , जिवाला जीव देणाऱ्या मित्रांची ही यारीदोस्ती या कादंबरीतील प्रेरणादायी भाग आहे. नात्यांमधील अंतर कमी करून संवाद साधायला हवा. आपली संस्कृती, आपल्या परंपरा, नाती जपण्यासाठी प्रत्येक पिढीने प्रयत्नशील असायला हवे, हा संदेश या कादंबरीतून मिळते. आपले संस्कार हे पुढील पिढीकडे योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने सुपूर्द करायला हवेत, तरच आपल्या संस्कृतीशी आपली नाळ जोडलेली राहते. वटवृक्षाची पारंबी हे प्रतीक सुयोग्य पद्धतीने वापरले आहे. शिवरूपी पारंबी आपल्या कुटुंबाच्या वटवृक्षाची मुळे कशी सावरते, कसा समन्वय साधते, याची संवेदनशील तितकीच रहस्यमय कादंबरी 'पारंबी' नक्की अनुभवा !

( पारंबी - कादंबरी / डॉ. वैभव लोखंडे / प्रकाशक : उदवैली बुक्स / मूल्य : २८० रुपये )

तुकारामनीती
भाग 33

# पापाविन नाही पाप येत पुढे।



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**वारकरी संतांनी कर्मठ वैचारिक आणि व्यावहारिक प्रवृत्तीवर घणाघात करून अवडंबर विरहीत कर्ममार्ग, ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग श्रेष्ठ असल्याचे वारंवार अधोरेखित केले आहे. तूकोबांनी आपल्या अभंग-कीर्तन-जीवनाच्या माध्यमातून अखंड प्रबोधन करतांना समाजाच्या कोणत्याही थोतांड विचार अथवा प्रवृत्तीची गय केली नाही. तुकोबांचा परमार्थ हा लोकानुवर्ती असल्याने सहजतेने त्यांच्या अभंगातून वैश्विक पावित्र्य, निर्धार, औदार्य, निर्भयता आणि शांती मार्गाची नवी लोकनीती समाजाभिमुख करतांना अनुभूतीपूर्ण जीवन नीतीचे नवनवे सिद्धांत प्रस्तुत केले आढळून येतात. तुकोबांच्या निर्वाणानंतर त्यांच्या चरित्राच्या भोवताल अनेक मीथक, चमत्काराच्या कथा लोकांनी रचून तूकोबांनी अनेक चमत्कार केल्याचे लोक सांगत असले तरी त्यांचे जीवन आणि संपूर्ण परिसराचा धांडोळा घेतल्यानंतर त्यांचे चमत्कार विवेक-बुद्धीला स्वीकारार्ह होत नाहीत.**

वारकरी संतांनी आपल्यावाङ्मय आणि कीर्तनाच्या माध्यमातून सातत्याने समाजमन निर्मळ करण्याचे महत्कार्य केले. तेराव्या शतकांपासून ज्ञात वारकऱ्यांचा हा अविरत संघर्ष आजतागायत सुरूच आहे! वारकरी संत हे सामान्य माणसातीलच एक महत्वपूर्ण घटक असून त्यांनी लोकांत राहूनच लोकजागृतीचे कार्य केले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत गोरोबा, संत सावतोबा, संत चोखोबा, संत जनाबाई, संत कान्होपात्रा, संत जगमित्र नागा, संत विसोबा खेचर आदि संतांच्या मांदियाळीने आपली दैनंदिन कामं इमाने-इतबारे करणे म्हणजेच भक्ती होय! संत गोरोबांना आपली गाडगी-मडकी घडवतांना, संत सावतोबाबांना आपले शेत पिकवून त्यातच श्री विठ्ठलाची स्पंदनं जाणवतात. संत चोखोबांना गावकीची कामे करणे म्हणजेच खरी ईश्वरसेवा, तर संत सेना महाराजांना लोकांची हजामत करण्यातच श्री विठ्ठलाचे दर्शन होत असे. हाच धागा पकडून संत एकनाथांनी गोदापात्रातील गाढवाला पाणी पाजून प्रत्यक्ष ईश्वराला पाणी पाजण्याचा निर्वाळा दिला. सर्वच संतांच्या विचारांची नाळ धरून निष्ठावंत वारकरी विचार आपल्या सडेतोड लेखणीच्या आणि कीर्तनाच्या माध्यमातून पुढे नेण्याचे कार्य सतराव्या शतकांत संत तुकाराम महाराजांनी केले. वारकरी विचारांच्या मंदिराला तुकोबांनी आपल्या रोखठोक अभंगांनी कळस चढवून आपला वसा-वारसा सिद्ध केला. ज्ञानदेव-नामदेवांपासून ते तुकोबांपर्यंतचे सर्वच वारकरीवाङ्मयसमाजाच्या प्रबोधनाच्या शीर्षस्थानी असून त्याची जागा घराघरातील प्रार्थनेने व्यापलेली आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

वारकरी संतांनी कर्मठ वैचारिक आणि व्यावहारिक प्रवृत्तीवर घणाघात करून अवडंबर विरहीत कर्ममार्ग, ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग श्रेष्ठ असल्याचे वारंवार अधोरेखित केले आहे. तूकोबांनी आपल्या अभंग-कीर्तन-जीवनाच्या माध्यमातून अखंड प्रबोधन करतांना समाजाच्या कोणत्याही थोतांड विचार अथवा प्रवृत्तीची गय केली नाही. तुकोबांचा परमार्थ हा लोकानुवर्ती असल्याने सहजतेने त्यांच्या अभंगातून वैश्विक पावित्र्य, निर्धार, औदार्य, निर्भयता आणि शांती मार्गाची नवी लोकनीती समाजाभिमुख करतांना अनुभूतीपूर्ण जीवन नीतीचे नवनवे सिद्धांत प्रस्तुत केले आढळून येतात. तुकोबांच्या निर्वाणानंतर त्यांच्या चरित्राच्या भोवताल अनेक मीथक, चमत्काराच्या कथा लोकांनी रचून तूकोबांनी अनेक चमत्कार केल्याचे लोक सांगत असले तरी त्यांचे जीवन आणि संपूर्ण परिसराचा धांडोळा घेतल्यानंतर त्यांचे चमत्कार विवेक-बुद्धीला स्वीकारार्ह होत नाहीत. आज चर्चेला घेतलेला तुकोबांचा

**काय म्यां मानावें हरीकथेचें फळ ।**
**तरिजे सकळ जनीं ऐसें ॥१॥**
**उच्छेद तो असे हा गे आरंभला ।**
**रोकडें विठ्ठला परचक्र ॥ध्रु.॥**
**पापाविण नाहीं पाप येत पुढें ।**
**साक्षसी रोकडें साक्ष आलें ॥२॥**
**तुका म्हणे जेथें वसतील दास ।**
**तेथें तुझा वास कैसा आतां ॥३॥**
(शा.अ.गाथा अ.क्र. ५५८)

हा अभंग सुद्धा चमत्कार संदर्भात आहे याचे मिडीयावर दोन-तीन ठिकाणी संदर्भ आढळून येतात. छत्रपती शिवाजी महाराज आणि संत तुकोबाराय हे समकालीन महापुरुष! छत्रपतींना तुकोबांविषयी माहित झाल्यानंतर ते त्यांना नक्की भेटायला गेले असतील यात तिळमात्र शंका नाही. त्यानंतर महाराजांनी आपल्या राज्यातील संतांची झालेली दयनीय अवस्था पाहून नजराणा पाठवून दिला. परंतु महाराजांनी पाठवून दिलेला नजराणा तुकोबाराय

**दिवट्या छत्री घोडे । हे तो बऱ्यात न पडे ॥**
**किंवा**
**तुमचे येर वित्त धन । ते मज मृत्तिकेसमान ॥**

असे अभंग लिहून परत पाठवतात. ही कृती पाहून छ.शिवाजी महाराजांना आश्चर्य वाटले आणि त्यांना भेटावे वाटले. त्यानंतर छत्रपतींची आणि तुकोबांची भेटही झाली. त्या भेटीत तुकोबांनी शिवबांना धर्म, राज्य, शौर्य आदि संबंधाने मार्गदर्शन केले असावे. शिवाजी राजांनी तुकोबांची कीर्तनेही एकली असतील. त्या कीर्तनांत छत्रपती शिवाजी महाराजांवर यवनांनी हल्ला केल्यानंतर कीर्तनातील टाळकरी-वारकरी आपल्या राजासाठी जीवावर उद्धार होऊन सैन्याशी दोन हात करायला सज्ज झाले. ही घटना लोहगाव या गावच्या कीर्तनात घडून आली. याच वेळी तूकोबांनी वरील अभंगासह अन्य अभंगांची रचना केली असून श्री पांडुरंगाला आळविले असावे.

**न देखवे डोळां ऐसा हा आकांत ।**
**परपीडे चित्त दुःखी होतें ॥१॥**
**काय तुम्ही येथें नसालसें झालें ।**
**आम्हीं न देखिलें पाहिजे हें ॥ध्रु.॥**
**परचक्र कोठें हरीदासांच्या वासें ।**
**न देखिजेत देशें राहातिया ॥२॥**
**तुका म्हणे माझी लाजविली सेवा ।**
**हीनपणें देवा जिणें झालें ॥३॥**
(शा.अ.गाथा अ.क्र. ५५७)



यातील हा पहिला अभंग आणि वरचा दुसरा अभंग. या दोन्ही अभंगांचे अवलोकन केले असता संत कसे सहाय्यकारी असतात (?) याचा प्रत्यय येतो. हरीदासांवर आलेले परचक्र निवारण्यासाठी तुकोबांचे शब्द कमी आले. सामान्य लोकांमध्ये मराठी माणसांचे स्वराज्य उभारण्याची उर्मी आली. लोक शिवाजी महाराजांना जाऊन मिळाले. वारकऱ्यांनी सुद्धा वेळप्रसंगी यवनांसोबत दोन हात करण्याची तयारी दर्शवली. याच अभंगांच्या अनुषंगाने कीर्तनात सगळे लोक छत्रपती शिवाजी महाराजांसारखे झाले, म्हणजे इथे कोणताही चमत्कार झालेला नसून सामान्य माणसांनी स्वराज्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या म्हणजेच मराठी माणसांच्या अस्मितेसाठी लढा उभारलेला दिसून येतो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शस्त्र संघर्षाला संत तुकाराम महाराजांच्या शब्दशस्त्रांनी बळ देऊन श्री विठ्ठलाला साकडे घातले. "माझ्या कीर्तनात असा गोंधळ होत असून, हे देवा हेच माझ्या सेवेचे फळ आहे का? माझ्या कीर्तनात असे परचक्र का आले? हे विठ्ठला, हे परचक्र थांबवा." असा हा अपरोक्ष संवाद आहे. "पापाविण नाहीं पाप येत पुढें । साक्षसी रोकडें साक्ष आलें" असे लिहून आपल्याकडून काही पाप घडले का काय? असा प्रश्न स्वतःशी महाराज विचारतात. असे असले तरी "हे विठ्ठला, तुझे दास जिथे असतील तिथे तू असे संकट येऊ देऊ नको!" असे आत्मपरीक्षण करून तुकोबा देवाकडे संकट निवारण्याचे आवाहन करतात. यावरून एक महत्वपूर्ण गोष्ट लक्षात येते, ती म्हणजे तुकोबा आत्मपरीक्षण करायला सुद्धा कचरत नव्हते. या अभंगातील हे चरण फारच बोलके असून सर्वच साधकांना आपल्या आयुषासाठी मोलाचे वाटते. या नंतर तुकोबा "भीत नाही आतां आपुल्या मरणा । दुःखी होतां जना न देखवे ॥ (५५९)" आणि "फिरंगी वाखर लोखंडाचे विळे । परि ते निराळे गुणमोल ॥ (५६०)" हे दोन अभंग बोलून जातात. तुकोबांच्या गाथ्यातील हे चार-पाच अभंग त्यांच्या बेडर, शूर वृत्तीचे दर्शन घडवतात. तुकोबा अभंग बोलतांना कुणाचीही भिडभाड ठेवत नाहीत. आपण केवळ टाळ-वीणा घेऊन भजन म्हणणारे भोळेभाळे वारकरी नसून, इथल्या मातीची मशागत करून धान्य उत्पादित करणारे कणखर कुणबी आहोत. याचा परिपाक म्हणजे कीर्तनातसुद्धा आपली शूरत्वाची प्रतीती उजागर करतात. आलेले संकट लोकांमध्ये उर्जा निर्माण करून परतवून लावण्यात संत तुकाराम महाराज आणि कीर्तनातील श्रोते सुद्धा छत्रपती शिवबांचे लढाऊ मावळे-सैनिक बनतात. अशाप्रकारचे सहाय्य तुकोबांनी शिवरायांना केलेले संदर्भ गाथ्यात आढळून येतात. परंतु इथे कोणताही चमत्कार झाला नसून सर्व भजनकरी लोकांना आपल्यातील शक्तीचा आत्मसाक्षात्कार झाला! असे म्हणणे वावगे ठरू नये.

तुकोबांचे अभंग वाचणे म्हणजे सर्वांगीण जीवन संघर्ष वाचणे! वारकरी संतांनी आपले भजन-कीर्तन-अभंगांनी मराठी भाषेला साहित्यिक रूपाने नटवले असून दुसरीकडे त्यांना राज्य आणि धर्म रक्षणाचे मध्यम बनवले. हीच काही मुलभूत कारणे आहेत ज्यामूळे वारकरी सांप्रदाय अठरापगड जातीतील सर्वच धर्माच्या लोकांच्या घरी आजही अगदी गुण्यागोविंदाने नांदतांना दिसतो आहे! वारकरी संतांचा हा मूलगामी विद्रोह केवळ सामाजिक अनिष्ठ रूढी-परंपरा यांच्या विरोधात नसून प्रसंगी तो देशभक्तीच्या आंदोलनात आपली आहुती द्यायला मागेपुढे पहात नव्हता. याचाच परिपाक म्हणजे वारकऱ्यांना इतर सत्ताधाऱ्यांनी जास्त छळले नाही.

सतराव्या शतकाप्रमाणे आजही इथले राजकारणी संतांच्या कीर्तन-प्रवचनाला हजेरी लावतात. छत्रपती शिवराय आणि संत तुकाराम महाराज यांची भेट एक आदर्श भेट म्हणून ओळखली जाते! दोन्ही महापुरुषांनी आपले संपूर्ण जीवन लोकोद्धारासाठी वेचले, परंतु आज राजकीय लोक वैयक्तिक लाभासाठी, पदासाठी संत-बुवा-बाबांकडे जातात. त्यांना लाखो रुपयाची सुपारी देऊन त्यांच्याकडून वाढदिवसाच्या निमित्ताने आपला उदोउदो करून घेतात. काळ्या मार्गाने कमावलेले धन बुवा-बाबांना देऊन त्यांच्याकडून परमार्थ घडवून आणतात. यातून बुवा-बाबा यांच्याकडून वाम मार्गाने आलेले धन घेतले जात आहे. इथे "तुका म्हणे द्रव्य घेती । देती तें ही नरका जाती ॥ (३०८४)" हा तुकोबांचा अभंग तंतोतंत लागू पडतो. आज संत, बुवा, बाबा, महाराज, शास्त्री आदि सर्वच सन्माननीय मंडळींनी ज्ञानोबा-तुकोबांच्यावाङ्मयाचे बारकाईने अवलोकन करून परमार्थ करावा. कुणीही घरावर तुळशीपत्र ठेवून परमार्थ करू शकत नाही, मात्र प्रत्येकाने परमार्थात वाढणारा व्यापार याची मर्यादा ठेवूनच परमार्थ करावा. कोणत्याही राजकारणी व्यक्तीने पैशाच्या ताकदीवर कार्यक्रम करायचे ठरवले तरी कार्यक्रम ठेवणाऱ्या माणसाचे धन कसे आहे? याचे काळजीपूर्वक अवलोकन करूनच त्याच्यासोबत व्यवहार करावा. असे झाल्यास सर्वत्र निका परमार्थ मोठ्या ताकदीने संबोधला जाऊन संत वाङ्मयाला सोन्याचे दिवस कायम राहतील! असे झाल्यास या लेखनाचे सार्थक होऊन तुकाराम नीती इथल्या मनामनात रुजली जाईल हीच माफक अपेक्षा! जय तुकोबाराय!

**(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, लेखक, प्रबोधनकार, प्राणायाम प्रशिक्षक आहेत)**

# गोष्ट मायलेकीची आणि तिचीही !

आधुनिक केसरी

**कोल्हापूर मध्ये आपल्या गाडीच्या समोर पंधरा-वीस म्हशींचा तांडा येणं,हे नेहमीचच! अशावेळी असाह्यपणे त्या रस्त्याच्या बाजूला कधी एकदा होतात, हे पहाण्या पलीकडे आपण काही करू शकत नाही.... कितीहि राग आला तरी काही गोष्टी आपल्या हाता बाहेरच्याअसतात... रागावर काबू कसा मिळवायचा हेअध्यात्मात सांगितलं जाणारं तत्वज्ञान या म्हशी आपल्याला शिकवून जातात! मला म्हशींचा राग येतो,तसा एखाद्या गायीचा मात्र राग येत नाही.... उलट तिच्याबद्दल दया,कींव वाटते..गाय ही बुद्धिमान,भावनाशील आणि खूप जवळची वाटते... पांढरीशुभ्र किंवा तांबूस रंगाची धष्टपुष्ट,देखणी गाय रस्त्यात डौलदारपणे चालताना दिसते... जणूकाही एखादी घरंदाज हळदीकुंकू समारंभाला निघालेली स्त्रीच!**

डॉ. गजानन पेठे

गोष्ट आहे अश्याच एका गायीची....मायलेकीची आणि तिचीही! दुपारपासून एक गाय खाली पार्किंगमध्ये बराच वेळ घुटमळत होती.... सोसायटी मधल्या दोन मुलानी तिला हुसकावून लावण्याचा पण प्रयत्न केला, पण ती काही बाहेर पडायला तयार नव्हती...कमरे एवढ्या ऊंचीच्या भिंतीच्या आडोशाला जाऊन उभी राहिली.... संध्याकाळी वर राहणाऱ्या तिने आपली गाडी पार्किंग लॉटमध्ये उभी केली.. तिचं लक्ष त्या गायीकडे वळलं... तिच्या लगेचच लक्षांत आलं... त्या गाईचे दिवस भरत आले होते... गायीच्या डोळ्यांतल्या प्रसूतिवेदना तिला जाणवल्या.. काही क्षणातच ती गाय विणार आणि आपल्या लेकराला जन्म देणार हे तिनं ओळखलं...आणि एखाद्या अनुभवी सुईणी सारखी ती कामाला लागली.... तिच्या लहानपणी तिच्या घरी असलेल्या गोठ्यात तिने अनेक गाई आणि म्हशी विताना पाहिल्या होत्या.... ते सगळं ज्ञान क्षणांत तिच्या मनांत जागृत झालं.. घरी जाऊन तीनं दोन मोठी गोणपाटंआणि काही फडकी आणली....

तिला फार वेळ वाट पहावी लागली नाही.. वासराच्या डोक्याचा भाग आणि पुढचा पाय बाहेर आला.... काही क्षणातच वासराचा जन्म झाला.. तीनं नाळ कापून वासराला आईपासून वेगळं केलं...आईनं लेकीला जन्म दिला होता.... लेकीनं आईचंच देखणं रूप घेतलं होतं..पांढरीशुभ्र ...काही तांबूस टिपके,आणि डोक्यावर काळा नाम !! जन्मताच वासरू उभं राहण्याचा प्रयत्न करीत होतं...पण पडत होतं... तीनं मऊ फडक्यानं वासराला पूर्ण कोरड स्वच्छ केलं... त्याच्या पायांच्या खुरांची गेळं कापली.. गेळं म्हणजे आपल्या नखां सारखा खुरांचा वाढलेला भाग ....गेळं असताना वासरू पाय जमिनीवर टेकू शकत नाही... गेळं कापल्यावर ते छान ऊभं राहिलं...आणि प्रेमभरानं गाय आपल्या लेकरा चाटू लागली!अर्ध्या तासात गाईची वार पडली... अशा वेळेला आपल्याला लक्ष द्यावं लागतं... नाहीतर ती खाऊन टाकण्याकडे गुरांचा कल असतो... जनावरांनी वार खाल्ली तर त्याचा परिणाम दुधावर होतो..दूध कमी होतं ... तिने पडलेली वार शिताफीने बाजूला केली... हे सर्व घडत असताना बरीच प्रेक्षक मंडळी आजूबाजूला जमा झाली होती..पण ती सोडून गायीच्या जवळ जाण्याचं धाडस कोणी करत नव्हतं... काहीजणांनी आपल्या आयुष्यात प्रथम गाय विताना पाहिली होती!

काही उत्साही मंडळींनी आपल्या घरातून गायीला खाण्यासाठी केळी,घरातील शीळ अन्न असं काही काही आणलं ...पण ती गाय कशालाहि तोंड लावायला तयार नव्हती.. अशा वेळेला काय खायला घालायचं ते तिच्या लक्षांत आलं.. उमजलं...ती घरी गेली...एका मोठ्या पातेल्यात चार वाट्या तांदूळ दोन तीन वाट्या हरभऱ्याची डाळ, एक वाटी ऊडीदअसं सारं, खूपस पाणी घालून शिजत ठेवलं.. ते चांगलं शिजल्यावर दोन वाट्या तेल आणि एक मोठा गुळाचा खडा त्यात घातला आणि ते गरम गरम तयार झालेलं खाणं,तिनं गाईच्या समोर आणून ठेवलं... गायीच्या पोटात काही नव्हतं..श्रमानी तिला खूप थकवा आला होता... गरम गरम खाणं तिच्या पोटात गेलं... ती खूप ताजीतवानी.. हुशार झाली.

आता गाईचं दूध काढायला हव होतं... त्या नवजात वासराला पण त्याच्या आईच्या दुधाची तहान लागली होती... एका म्हशींच्या तबेल्यात काम केलेला इसम तुढे सरसावला.. हातात एक दोरी घेऊन. त्याचा गाईचे मागचे पाय बांधून दूध काढण्याचा बेत होता.... गायीनं त्याला आपल्या आसपास येऊ दिलं नाही!

तिने गाईच्या पाठीवरून हात फिरवला...मानेच्या खाली खाजवलं... हळू हळू तिच्या डोळ्यांवर,तोंडावर हात फिरवला .... एकमेकींच्या डोळ्याला डोळे भिडले! भावना आत पर्यंत पोहोचल्या... एकीच्या डोळ्यात कृतज्ञता तर दुसरीच्या डोळ्यात अपार प्रेम आणि कणव!

तिने कोमट पाणी आणून तिचे आचळ स्वच्छ धुतले... वासराला जवळ आणून त्याच्या तोंडात एक आचळ दिला....गाईच्या कासेत, आचळांत चांगलाच ताठरपणा आला होता...वासराच्या तोंडात आचळ गेल्याबरोबर तिला पान्हा फुटला... चांगलं जाड आणि घट्ट पौष्टिक दूध वासराच्या पोटांत शिरलं ...आणि ते गाईला चांगल्या ढूशा मारू लागलं.... त्या मायलेकराना झालेला आनंद त्यांच्या देहबोलीवरून जाणवत होता! तीने सावकाश दूध काढायला सुरुवात केली...तिला गाई-म्हशींचे दूध काढायला लहानपणापासून येत होतं...चांगली दोन मोठी भांडी भरून दूध निघालं!

गाईचा मालक गाईला शोधत सोसायटीत येऊन पोहोचला...गाईनं त्याला लगेच ओळखलं....म्हणत होता डॉक्टरनीआठ दिवसानंतर ची तारीख दिली होती...ही सर्वांचा डोळा चुकवून कुठे गेली हे आम्हा कोणाला कळलं नाही...त्याने तिच्याकडे कृतज्ञता व्यक्त केली..... तिचे आभार मानले....आणि तो क्षण येऊन ठेपला ...आता तो गाईला आणि वासराला आपल्या घरी घेऊन जाणार होता... पण ते वासरू त्याला कुठे ओळखत होतं!ते तिला सोडायला तयार नव्हतं! गाय एकदा मालकाकडे बघायची आणि एकदा वासरा कडे... आणि तिच्याकडे पण! त्या गाईची झालेली व्दिधा मनस्थिती तिच्या लक्षांत आली...मग तिनेच पुढाकार घेउन त्या वासराला गाई जवळ आणलं आणि त्या दोघीना तिच्या मालकाच्या स्वाधीन केलं! "काढलेल्या दुधावर खरा हक्क तुमचाच आहे ताई"असं तो म्हणत होता पण तिने त्याचं ऐकलं नाहीआणि ते दूध पण त्याच्या स्वाधीन केलं... ती तिघंही दूर जाई पर्यंत ती त्यांच्याकडे बराच वेळ पहात राहिली!

बाहेर चांगलाच काळोख पडला होता...गेले तीन-चार तास कसे गेले याचं तिला भान नव्हतं ....तिला घराची आठवण झाली... देवापुढे दिवा लावायचा होता... आणि घराच्या समोर पणत्या लावायच्या होत्या! दिवाळीचा आज पहिला दिवस होता... आज वसुबारस होती! दिवस सवत्स धेनू चा!!

**(लेखातील ती)- मनिषा वाडीकर, कोल्हापूर.**
**सत्य घटनेवर आधारित लेख.**

# स्वराज्य रक्षणार्थ लढलेल्यांची शौर्यगाथा म्हणजेच 'स्वराज्याची शौर्यगाथा'


आधुनिक केसरी

**बहुतांशी कवी / कवयित्रीची काव्यरचनेची पहिली पायरी ही प्रेम,आई वडील, किंवा कुटुंब असते आणि तद्रंतर येणारा काव्यसंग्रह हा त्याच विषयाशी, आशयाशी निगडित असतो. परंतु 'शौर्यगाथा स्वराज्याची' हा काव्यसंग्रह आणि त्याची निर्मितीकार कवयित्री सौ. मीना संदीप शिंदे या मात्र अपवाद असून त्यांनी आपल्या तारुण्यावस्थेत प्रेम वा अन्य भावभावनांना फाटा देऊन आपल्या छ. शिवरायांनी स्थापिलेल्या स्वराज्याच्या कामी लढलेल्या सर्व शूरवीरांवर त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकून आपल्या डोळ्यांपुढे स्वराज्याचा संपूर्ण जीवनपट उभा केला आहे.ही नक्कीच सर्वांसाठी अभिमानास्पद बाब वाटते.**

काव्यसंग्रह हाती येताच सूर्याच्या प्रकाशात, आपल्या अथांग कारकिर्तीने अवघ्या जगाला व्यापलेला प्रकाशस्त्रोत, स्वराज्यनिर्माते, अखंड भारताचे दैवत छ. शिवाजी महाराज आपल्या किल्यावरून आपल्या मुलुखाकडे एकटक बघत असल्याचे आपणास दिसते. सुंदर असे मुखपृष्ठ वाचक मनास लोभसवाणे वाटेल असेच असून मलपृष्ठ अभिनेते श्री. शंतनु मोघे सर आणि कवी गझलकार अनंत राऊत सर यांच्या सुंदर शुभेच्छाने व्यापलेले आहे.

'स्वराज्याची शौर्यगाथा' हा काव्यसंग्रह दोन खंडात असून पहिल्या भागात मुक्तछंदातील तर दुसऱ्या भागात अभंग रचना असून संपूर्ण काव्यसंग्रहातील रचना या ऐतिहासिक आहे. मीना ताईंच्या या काव्यसंग्रहास कोपरगाव तालुक्याचे युवा नेते व श्री. शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना, कोपरगावचे चेअरमन, विवेकभैय्या बिपिनदादा कोल्हे यांचे विशेष सहकार्य लाभलेले असून त्यासोबत छ.संभाजी महाराज सेवा समिती, तुळापूर आणि स्वराज्य इतिहासाच्या पाऊलखुणा परिवार याचेही सहकार्य लाभल्याचे विशेष नमूद करण्यात आलेले आहे. हळवं मन जेव्हा, आयुष्यात आलेल्या अनुभवाशी एकरूप होते तेव्हाच कवितेचं स्फुरण होतं, अशा कवी, कवयित्रीबद्दलचा गुणविशेष आपल्या प्रस्तावनेत छ.संभाजी महाराज सेवा समितीचे प्रवक्ते वैभव साळुंके सांगतात. कवयित्री मीनाताई शिंदे यांनी संग्रहाला स्वराज्याची शौर्यगाथा हेच नाव का दिले याचाही कयास ते व्यक्त करतात, ते म्हणतात की, महाभारतात वर्णील्याप्रमाणे शौर्यापेक्षा श्रेष्ठ असे काहीच नाही. याची जाणीव मीनाताईना तरुण पिढीला करून द्यायची असेल म्हणून त्यांनी हे संग्रहाला साजेल असे नाव दिले आहे. अगदी सुंदर शब्दांची प्रस्तावना संग्रहास लाभली असून आघाडीच्या युवा कवयित्री आणि सिनाकण्या शिवानी या नावाने साहित्यिक क्षेत्राला परिचित असणाऱ्या सौ. धनश्रीताई निंबाळकर, सोलापूर यांनी ओघवत्या आणि सुंदर शब्दांत शुभेच्छा दिलेल्या आहेत. त्यातील अखेरची शुभेच्छामय चारोळी अशी की, लिहिते आहे मीना काव्यात इतिहास शब्दांनी तिची चांगली संगत करावी एकच प्रार्थना, प्रत्येक कविता ताईची इतिहास मनामनात तेवत ठेवण्या कामी यावी...

काव्यसंग्रहाच्या कवयित्री या स्वतः छ.संभाजी महाराज सेवा समितीच्या अहमदनगर जिल्हा महिला अध्यक्षा असून संग्रहात आपल्या काव्यासोबतच आपल्या मनोगतातून व्यक्त होताना




म्हणातात की, आई निघून गेल्यानंतर आलेल्या दुःखाच्या छटा, विरह, आठवणींचा उमाळा यांमुळे मी अस्वस्थ होते आणि हे सर्व कोऱ्या कागदावर नकळत मी मांडू लागले आणि त्यापुढे माझ्या काव्याचा प्रवास सुरू झाला तो आजपावेतो. काही काळानंतर, माझ्या राजाला लेखणीतून न्याय देण्याच काम जीवात जीव असेपर्यंत करायचं, या महाराष्ट्राच्या मातीला सोन्याचे दिवस दाखवणाऱ्या थोर योद्धयांवर लिहायचं असं ठरवून ऐतिहासिक रचना लिहून या संग्रहाची निर्मिती झाल्याचे कवयित्री मनोगतात सांगते.

इतिहासात अजरामर असलेल्या शूरवीरांच्या पराक्रमाच्या गाथा वर्णीनाऱ्या काव्यरचनांचा संग्रह वाचताना वाचकाला स्फूर्ती तर येतेच पण वेळोवेळी डोळ्यांत पाणी देखील येते. अनेक पाठ्यक्रमाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास विद्यार्थ्यांना शिकवला जातो. त्याचप्रमाणे स्वराज्याच्या धाकल्या धन्याचा, छ.संभाजी महाराजांचा देखील इतिहास पाठ्यक्रमांत समाविष्ट करून अधिकाधिक लोकांपर्यंत छ.संभाजी महाराजांचा इतिहास, त्यांचे शौर्य, कार्य, तेज, पराक्रम, कीर्ती, अभ्यास आणि सत्यता पोहचवावी हीच माफक अपेक्षा आपल्या पहिल्याच रचनेत कवयित्री मीना शिंदे व्यक्त करताना म्हणतात की,

**शिकवला शिवबा आता**
**शंभूराजा शिकवा...**
**पाठ्यपुस्तकात त्यांचे**
**दिव्य पराक्रम दाखवा...**

छ. संभाजी महाराजांना औरंगजेबाने तब्बल ४० दिवस अनंत यातना दिल्या, तरीही श्वासाच्या शेवटच्या क्षणापर्यंत संभाजी राजे झुकले नाही की शरण गेले नाही. डोळ्यांत सळया घातल्या असतील की बोटांची एक एक करून नखे उपटली असतील, जीभ छाटली असेल की शरीराच्या प्रत्येक अवयवाला छिंन्न विचीन्न केले असतील तरीही माझ्या राजांना औरंगजेब तसूभरही नमवू शकला नाही ह्या सर्व घटनांचा साक्षीदार बहादूरगड असल्याचे कवयित्री 'बहादूरगड' या शीर्षकाखाली लिहिलेल्या रचनेत खालील कडव्यात स्पष्ट करतात,

चाळीस दिवस अन्याय केला
त्या कपटी औरंग्यानी
तरी नाही झुकला हो शंभूराजा
गेले धर्मासाठी प्राण त्यागुनी
बहादूरगड बघा सांगतोय आज माझ्या शंभूची कहाणी....

सईबाईचा असणारा लेक शंभूराजा याचे वर्णन करावे तितके कमीच आहे. शंभुराजांच्या नावाने देखील शत्रूला धडकी भरत असे, वाघाच्या जबड्यात हात घालून दात मोजण्याची हिम्मत केवळ याच छाव्यात होती, स्वाभिमानाने हसत हसत आपल्या मरणाला पत्करणारा, नायिकाभेद, बुद्धभुषन सारखे ग्रंथ लिहिणारे विदवत्त असणारा महापुरुष लाखात नव्हे, कोटीत नव्हे तर एकमेव होता. शंभुराजांच्या महतीच्या बहुतांशी रचना कवयित्रीने अभ्यासाअंती लिहिलेल्या असल्याचे अनुभवास येते.

छ. संभाजी महाराज, छ. शिवाजी महाराज यांच्यासोबतच स्वराज्यासाठी आपला पराक्रम गाजवलेल्या अनेक शूर मावळ्यांची शौर्यगाथा कवयित्री काव्यातून मांडते, त्यात बाजीप्रभूंचे वर्णन करताना त्या म्हणतात,

लाखोंचा पोशिंदा, वाचविला त्याने
मोठ्या धाडसाने, शिवराय॥
हजारोंची फौज, कापी सपासप
सुटे थरकाप, शिवराया॥

तर तान्हाजी मालुसरे यांचा पराक्रम सांगताना,

उदयभाण्याला, वारावर वार
करी थंडगार, मालुसरे॥
तुटलेली ढाल, शेला तो हाताला
वीर त्या तान्ह्याला, भान नाही॥

कोंडाजी फर्जंदने जिंकलेल्या पन्हाळा किल्ल्याचे वर्णन करतांना,

एकटा लढतो, नाही त्याला दम
कापितो गनीम, सपासप॥
कोंडाजी फर्जंद, धाडसी मावळा
जिंकतो पन्हाळा, एका रात्री॥

यांसारख्या, कान्होजी जेधे, बहिर्जी नाईक, रानुबाई, खंडोजी बल्लाळ, शिवा काशीद, येसाजी कंक, शहाजी राजे, येसूबाई, रानुआक्का, धाराऊ माता अशा अनेक स्वराज्याच्या रक्षणासाठी झिजलेल्या, कामी आलेल्या शुरांचा इतिहास, शौर्य आपल्या लेखणीने मांडून कवयित्रीने समृध्द केलेली आहे.

ज्ञानेश्वर शिंदे
अंचलगाव, ता. कोपरगाव,
जि. अहमदनगर

ऐतिहासिक संग्रह लिहिणे आणि त्यातल्या त्यात काव्यात गुंफण करणे तितकेसे सोपे कार्य नाही, परंतु शिवराय, शंभुराजे यांवर असणारी निष्ठा, प्रेम, भक्ती, अभिमान, प्रेरणा , संवेदनशील मन आणि उत्तुंग पराकोटीचा असणारी आपुलकी , जिव्हाळा आणि ओढ यांशिवाय हे शक्य नसून या सर्व बाबी कवयित्री मीना शिंदे यांच्यात असल्यानेच त्या हे आगळेवेगळे कार्य करून इतिहास आपल्या सर्वांच्या पुढ्यात मांडून नवचैतन्य भरण्याचे कार्य करत आहेत.

'शौर्यगाथा स्वराज्याची' हा अतिशय आशयसंपन्न आणि काळीजसंपन्न असलेला काव्यसंग्रह असून आपण सर्वांनी आवर्जून विकत घ्यावा, वाचावा, प्रतिक्रिया द्यावी, इतरांनाही भेट द्यावा तसेच सर्व वाचक, रसिक त्याचे स्वागत करतील, त्यांच्या पुढील साहित्यिक, सामाजिक, ऐतिहासिक वाटचालीस 'माऊली प्रतिष्ठान संचलित नाते शब्दांचे साहित्य मंच, कोपरगाव'च्या वतीने अनंत शुभेच्छा व्यक्त करतो.

# आधार

आधुनिक केसरी

**कोण कुठला काय होतो, कसातरी मी कुणासाठी, कशाचेच काय करावे, कशाला ते कशासाठी... अशा अनेक प्रकारच्या शंका आपल्या मनात कायम येत असतात. आपण अनेकदा त्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न करतो, आणि अनेकवेळा असफल होतो. याचे कारण असे असावे असे मला वाटते की, आपण आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करत असताना ते प्रश्न एखाद्या व्यक्तीपुढे मांडतो जी व्यक्ती आपल्याला आपली वाटते. मग ते गुरु असतील, आई-वडील असतील, भाऊ-बहीण असतील, मित्र-मैत्रिणी असतील, किंवा आपले सहाय्यक सुद्धा असतील. आपल्याला असं वाटतं की आपल्या प्रश्नांची योग्य उत्तरे ते देऊ शकतात. पण अनेकवेळा आपल्याला समाधान कारक उत्तरे सापडत नाहीत आणि आपण निराश होतो. मग पुन्हा त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यात व्यस्त होतो.**

आपण ज्यांच्या समोर आपले प्रश्न मांडतो ते ही माणूसच आहेत आणि त्यांनाही असे प्रश्न पडत असतील हेच आपण विसरून जातो. त्यामुळेच अनेकदा आपण निराश होतो. आणि त्या निराशेतूनच काहीवेळा, किंबहुना कित्येकदा आपण चुकीच्या मार्गावर जातो, आणि इतके दूर जातो की परतीची वाट सुद्धा आपल्याला दिसेनाशी होते. एका क्षणाला आपल्याला जाणीव होते आपल्या चुकीची आणि मग आपण चूक सुधारण्याचा प्रयत्न करायला सुरुवात करतो. अशावेळीही आपल्याला एका आधाराची गरज भासते. कारण त्या चुकीच्या मार्गावर आपण चुकलोय हे सांगणारंही आपल्याला कोणीतरी भेटतच. मग त्यांचाच आधार मागायला आपण सुरुवात करतो आणि त्यांनी नकार दिला तर आपण पुन्हा निराश होतो. हे असे चक्र कायम चालतंच राहते. कारण आपण एखाद्या व्यक्तीला आधार मागतो. आपल्याला त्या व्यक्तीचा सहवास हवासा वाटतो. पण त्या व्यक्तीने सांगितलेला मार्ग अवलंबायला आपण पूर्णतः तयार होत नाही म्हणून आपण निराश होतो.

लहानपणी काही चुकीचं वागलो तर वडील मारतील, ओरडतील म्हणून आईचा आधार घेत होतो. पण ती चूक पुन्हा होऊ नये म्हणून आपल्याच भल्याचं सांगणाऱ्या वडिलांचा आपल्याला धाक वाटून त्यांचे बोलणे आपण एका कानाने ऐकून काही दिवस असे वागून दुसऱ्या कानाने सोडून देत होतो. कारण आपण तेव्हादेखील आपला प्रश्नाला उत्तर किंवा आधार म्हणून एका व्यक्तीला पाहत होतो, आणि तो आधार निघून गेला की पुन्हा निराश होत होतो. कधीकधी हा आधार म्हणून आपण आपल्या भावा-बहिणीकडे बघतो, आपले प्रश्न त्यांच्या समोर मांडतो. काही काळ ते आधार देतात, प्रश्नांची उत्तरे देतात आणि अनुत्तरीत प्रश्न सोडवायला मदतही करतात, पण कायमचा आधार देऊ शकत नाहीत.

पुढे तारुण्यात मित्र-मैत्रिणी येतात तिथेही हेच होते. कालांतराने पती/पत्नी येतात तेव्हाही हीच परिस्थिती येते. आणि आपले आधार टप्प्याटप्प्याने साथ सोडतात. आपले प्रश्न अनुत्तरीत राहतात. हे पाहून आपण निराश होतो आणि पुन्हा पुन्हा चुकीच्या मार्गावर जातो, मग यात तो मार्ग व्यसनाचा असू शकतो किंवा अगदी आत्महत्येचा सुद्धा. हे नैराश्य का येते याचा आपण विचार करीत नाही, किंबहुना आपण तो विचार करणं सोडून देतो. शिशू, किशोर, बाल्य, पौगंड, तारुण्य, प्रौढ, वृद्ध, जरा या प्रत्येक



अवस्थेमध्ये माणसाला वेगवेगळ्या प्रकारच्या आधाराची गरज असते. सर्वसाधारणपणे प्रत्येक माणसाचं आपलं असं एक वर्तुळ किंवा परीघ असतो. त्या परिघातील माणसांचा आधार घेण्याचा प्रयत्न प्रत्येकजण करत असतो, परंतु ज्या क्षणी या वर्तुळातील माणसांबरोबरचा त्याचा मुक्त संवाद धाकामुळे, दडपणामुळे, संकोचामुळे, वयातील अंतरामुळे, जीवनशैलीतील बदलांमुळे, परिस्थितीमुळे, बदलत्या संस्कारांमुळे व अन्य इतर कारणांमुळे थांबतो किंवा संपुष्टात येतो, त्यावेळी किंवा त्याक्षणी अशी व्यक्ती आपले मूळचे वर्तुळ सोडून परिघाबाहेर व्यक्तींचा शोध घेते. आणि सुरुवातीच्या काळात त्यांचा आधार वाटला म्हणजे एक नवीन वर्तुळ तयार होते. मुक्त संवादाचा अभाव हे माणसाच्या नैराश्याचे आणि आधार शोधण्याच्या गरजेचे मूळ आहे असे मला वाटते. कारण आपण एकदा उत्तर नाही सापडले तर त्या व्यक्तीवर अविश्वास दाखवायला सुरुवात करतो. म्हणूनच आपले प्रश्न कोणाकडे न्यावेत, आपला आधार म्हणून कोणाकडे पहावे याचा विचार आपण करायला हवा.

- स्वानंद नंदकुमार मराठे

जे होते ते चांगल्यासाठीच असा विचार करत जगावे. ज्याच्यामुळे आपल्याला जन्म मिळाला त्याच्यामुळेच मोक्षही मिळेल हा विश्वास मनात असायला हवा. जो प्रश्न निर्माण करतो तोच उत्तरेही देत असतो. फक्त त्या उत्तरावर बारकाईने लक्ष ठेवता आले पाहिजे. जसं अंधाराला उत्तर प्रकाश आहे तसंच दुःखाला उत्तर सुख आहे. पण ते सुख आपल्या मानण्यावर आहे.

उदाहरण द्यायचं झालंच तर समजा... तुम्हाला आणि तुमच्या सोबतच्या व्यक्तीला खूप तहान लागली आहे; पण पिण्यासाठी पाणी नाही. समोर पाण्याने भरलेला अथांग समुद्र आहे पण ते पाणी आपण पिऊ शकत नाही. अशावेळी अचानक पाऊस सुरु झाला तर तुम्ही सर्वप्रथम म्हणाल देवा, निसर्गा तुझीच कृपा. बरोबर ना? का सोबतच्या व्यक्तीला म्हणाल तुझ्यामुळेच पाऊस पडला. नाही ना? मग जो प्रश्न निर्माण करतो तोच उत्तर देतो हे मान्य करून त्या देवाला, निसर्गाला, चैतन्यशक्तीला आपण शरण का जात नाही? आपल्याला पडणारे प्रश्न, शंका त्यांच्यासमोर मांडल्या तर त्या प्रश्नांची उत्तरे, शंकांचे निरसन ते नक्की करतील हा विश्वास का दाखवत नाही आपण?

विज्ञानाच्या जगात माणूस कुठेतरी हरवत चालला आहे. प्रश्नांची उत्तरे शोधायचा प्रयत्न करत आहे. पण उत्तर सापडत नसेल तर त्या देवालाच, निसर्गालाच किंवा चैतन्यशक्तीलाच सांगतो आहे. आणि तरीही त्यांच्यावर अविश्वास दाखवत आहे. पण त्या देवाचे, चैतन्यशक्तीचे नुसते स्मरण केल्याने आपल्या अनेक शंकांचे निरसन होते, प्रश्नांची उत्तरे सापडतात, दुःखातून बाहेर पडायची शक्ती मिळते. असे असले तरीही आपण त्या देवावर, निसर्गावर किंवा चैतन्यशक्तीवर पुर्ण विश्वास ठेवत नाही. कारण आपण एखाद्या व्यक्तीला किंवा त्या व्यक्तीच्या सहवासाला आधार मानत असतो.

देवाचे किंवा चैतन्यशक्तीचे अस्तित्व आपण मानत नाही, कारण ते डोळ्याने दिसत नाही. पण आपण त्यांचे अस्तित्व अनुभवू शकतो. आणि यासाठी सोपा उपाय संतांनी सांगितला आहे तो म्हणजे "नामस्मरण". श्री गोंदवलेकर महाराज म्हणतात

***"नाम सदा बोलावे घ्यावे भावे जनाची सांगावे।***
***हाचि सुबोध गुरूंचा नामापरते न सत्य मानावे॥"***

समर्थ रामदास स्वामी सुद्धा सांगतात

***"प्रभाते मनी राम चिंतीत जावा पुढे वैखरी राम आधी वदावा। सदा सर्वदा प्रीती रामी धरावी ।दुखाची स्वये सांडी जीवीं करावी।"*** इत्यादी.

अशाप्रकारे आपण नामस्मरण केल्याने त्या देवावर, चैतन्यशक्तीवर आपला विश्वास वाढत जातो. आणि आपल्यावरच्या प्रेमापोटी तो देव किंवा ती चैतन्यशक्ती आपल्या सर्व शंकांचे निरसन करतात, प्रश्नांची उत्तरे देतात, आपली दुःख दूर करतात.

म्हणूनच मी सुद्धा म्हणतो की

***तुझेची हे नाम घेतो विहारि।***
***हरती हरती नामे विषबाधा हरती॥ धृ ॥***
***तूच स्वामी माझा तूच हो आई।***
***तूच पाठीराखा तूच रे माई॥ १ ॥हरती...***
***दीनांचा दयाळू तूच रे पाही।***
***तुझ्या चरणी ठेवी चिंता ती माझी॥ २ ॥हरती...***
***तूच शाम माझा तूच मुरारी।***
***तूच जगन्नाथ तूच रे हरी॥ ३ ॥हरती...***

# मुलांच्या भावविश्वाशी एकरूप होणाऱ्या कविता : 'माझे आबा आज्जी'

आधुनिक केसरी

**गोष्टी, कवितांच्या माध्यमातून मुलांचे भावविश्व फुलविण्याचे कार्य ज्येष्ठ साहित्यिक अरुण देशपांडे हे अनेक वर्षांपासून निष्ठेने करीत आहेत. त्यांचे हे कार्य बालसाहित्यात निश्चितपणे मोलाची भरच घालते. नुकतेच बालदोस्तांसाठी त्यांचे 'माझे आबा आज्जी' नावाचे बालकवितांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक वाचताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही; की यातील सर्वच कविता बालमनाला साद घालतात. 'आई' ही पहिलीच कविता पुस्तकात आहे. आईची महती गाताना कवी म्हणतात: "मनाच्या गाभाऱ्यात आहे, हृदय मंदिर हे गाव वात्सल्याची मूर्ती त्यात आई आहे तिचे नाव." किती सहज, सुंदर आहेत या ओळी... हृदयातील मंदिरात आईचे स्थान. ही भावनाच केवढी महन्मंगल, उच्च कोटीची आहे.**

'माझे आबा आज्जी' ही कविता आबा आज्जीची सोबत मुलांच्या जगण्यातली गोडी कशी वाढवते हे नकळत सांगून जाते. आबा-आज्जी चिमुकल्यांसाठी काय काय करतात हे सांगताना कवी म्हणतातः-


"गमतीजमतीच्या गोष्टी
सांगून खूप हसवतात
मुलांशी खेळता खेळता
आज्जी आबा रमतात.

म्हणजे मुलं जशी आजी आबांच्या सोबतीत पाखरागत बागडतात तशीच आजी आबाही मुलांच्या सोबतीत रमून जातात. आजी, आबा आणि मुलं यांच्या सोबतीचं हे गाणं एकट्या दुकट्याने न गाता संपूर्ण कुटुंबाने मिळून गावं इतकं नितांत सुंदर आहे.

"भारतमाता की जय, देशप्रेम, तिरंगा प्यारा, स्वातंत्र्यदिनी", या कविता देशप्रेम, देशभक्ती मनामनात जागृत करणाऱ्या आणि या भावना वाढीस लावणाऱ्या आहेत.

'देशप्रेम' कवितेत सीमेवरचे जवान अतिशय कष्टप्रद जीवन देशहितासाठी हसत हसत जगतात. डोळ्यांत तेल घालून देशाचे रक्षण करतात. कवी म्हणतात :

"विपरीत हवामान असो
असो प्रतिकूल दिनमान
हर प्रहर जागे असती
सीमेवरती दक्ष जवान "..




"सण संक्रातीचा, गणपती बाप्पा मोरया, " चला जाऊ हो पंढरपुरा", विजयादशमी, " दिवाळीची मज्जा ",या कविता आपल्याला सण उत्सवाचे मनमोहक दर्शन घडवतात; नकळत छानसा संदेश देतात.

पुस्तकातील निसर्ग कविता तर फुललेल्या बागेसारख्या मुलांची मनंही फुलवतात. निसर्ग आणि माणसाचं जिवाभावाचं नातं उलगडतात.

एकूणच अरुण देशपांडे यांच्या 'माझे आबा आज्जी' या पुस्तकातील सर्वच कविता मुलांच्या भावविश्वाशी एकरूप होणाऱ्या आहेत. मुलांमध्ये कळत नकळतपणे जीवनमूल्यांचे संवर्धनसुद्धा त्या करतात.

या कवितांत कुठेही उपदेश नाही. मुलांच्या ज्ञानात त्या जशा सहजगत्या भर घालतात तशाच मुलांच्या आनंदाच्या बागाही त्या तितक्याच सहजगत्या फुलवतात, हे विशेष.

पुस्तकाचे नाव : माझे आबा आज्जी, कवी : अरुण वि. देशपांडे
प्रकाशक : सप्तर्षी प्रकाशन-मंगळवेढा, पृष्ठे : ३७ , किंमत : ६०/- रुपये.

**पुस्तक-परिचय-**
**एकनाथ आव्हाड**
**सुप्रसिद्ध बालसाहित्यकार**
**मुंबई.**
**9821777968**

# अन् ती फुले ओंजळीतून



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**आज सकाळी अपार्टमेंटमधून फिरायला बाहेर पडत असताना, गेटच्या रस्त्याला दुतर्फा लागून असलेल्या झाडांच्या खाली पडलेला आणि सकाळी सकाळी झाडांवरून पडणाऱ्या त्या पिवळ्या फुलांचा आवाज न येता ही उगीच कानात एक शांत आणि प्रसन्न वेळी भिरभिर नाऱ्या फुलपाखराचा गुंजारव आणि झाडावरून अलगद खाली पडणाऱ्या पिवळ्या फुलांचा नकळत सूक्ष्म असा आवाज न येता ही अलगद हवेतून येणाऱ्या ध्वनी लहरी वर तरळून हळूवार कानी पडत असल्याचा तो अनोखा अंदाज पडणारी काही फुले अगदीच कुठेतरी...**

छोटासा आवाज करीत उडणारा एखादा पक्षी, पूर्वेच्या बाजूला डोंगरा आडून वर येणारा तो लाल गोळा, आकाशातून पळणारे ते ढग, आणि नुकतीच पडू लागलेली ती कोवळी कोवळी किरणे....आणि काही ...? दूरवर फडकत असणारी ती भगवी पताका.....पताका पाहताच उगाचंच कानाजवळ त्या टाळा चा खनखनाट ऐकू येऊ लागला, डोळ्यासमोर नाम ओढून त्याच्या मध्यभागातील अबिरबुक्का न अष्टगंधाचा तो टिक्का असलेले ते सुंदरसे व्यक्तिचित्र डोळ्यासमोर आले. विचारांच्या तंद्रीत चालत चालत ओढ्याच्या पुलावरुन... चालताना ओढ्यातून वाहणारी ती छोटीशी धार संथ वाहत होती.आणि मग..... आता होते भुईवर, गेलं गेलं अभायात, मनच ओ ते,क्षणात कुठे तर क्षणात कुठे, चंद्रभागेच्या तीरावर पोहचले. खळखळून वाहणारे ते पाणी आणि कुठल्याशा खडकावर आपटून उडणारे आणि सूर्यप्रकाशात चम चम नारे ते तुषार....! पाण्यातुन चाललेल्या त्या नावा... कांदा मुळा भाजी.... विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल, चंद्रभागेच्या तीरी उभा मंदिरी...युगे अठ्ठावीस उभा विठू विटेवरी..ही आणि अशी कितीतरी गाणी गुण गुणत विठ्ठलाच्या भक्तीची एक आठवण म्हणून.... चालनारे ते पाय कुठेतरी थबकून भक्तीच बीज मातीत अंकुरण्यासाठी नी म्हणजे अर्थात (वृक्षारोपण) भक्तीच्या ओढीने चालणारे ते पाय.. वारीतून सामाजिक कार्य होऊ शकेलं! "काय वेडे" हे कसे शक्य आहे. मना मनाचे द्वंद्व, "का?" "काय हरकत आहे." अनायासे पावसाळ्याचे दिवस असतात, सरकारी जागेत वृक्षारोपण केले,थोडाफार पाऊस आणि थोडेफार स्थानिक गावकऱ्यांच्या मदतीने लक्ष घातले तर ,..तर एक आठवण म्हणून काही झाडांचे वृक्षारोपण होईल, परमार्थाचा आनंद अनुभव , समाधान, कृतार्थतेची भावना एक आठवण ,म्हणून तेवढ्याच ओढीने पुढच्या वर्षी तेवढ्याच तळमळीने येण्याची ची ती ओढ, आणि ओढीने येवून हात फिरवताना मनातल्या त्या विठ्ठलाचे झाडातून दिसणारे तेजस्वी आणि उजळलेले रूप पाहून तेजस्वी ज्योत पाना पानातून दिसावी, अन् तेजोमय अशी एक मूर्ती प्रसन्नतेने हसावी कृतार्थ तेनें फिटावे डोळ्याचे पारणे जन्म सार्थकी, समाधान एक झळकावे देवा तुझ्या कारणे. प्रसन्न नि चैतनयदायी तृप्ततेच्या हर्षाने, जणू वरदान म्हणून घरंगळून ओंजळीत पडावे त्याच झाडाच्या पान नी फुलाने. "अहो ताई , ओंजळीतून खाली सांडतायत फुले".... "अँ" "हा, हा" गेटच्या दारातून बाहेर येता येता वाचमन काका बोलले.



# श्रीमती यशोदा सदाशिव साने



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

**२ नोव्हेंबर१९१९ कोकणातल्या एका खेड्यात जन्म घेतला अख्ख आयुष्य दारिद्र्यात काढलं चुल आणि मुल हेच तिचे कार्यक्षेत्र. त्याकाळी एकत्र कुटूंब पध्दती होती त्यामुळे सासुसासरे दिर नणंदा जावा यांनी घराचं गोकुळ बनलेलं असेल. त्यात कोकणंची भुमी नारळपोफळीच्या आणि सागराच्या लाटांच्या गुंजावणीतचं दिवस सुरू। होणार आणि संपणार. घरात प्रवेश ठराविश्व दारिद्र्य पाहिलेल्या या भारतीय स्त्रीने संसाराच्या विद्यापिठात सन्माननीय कुलगुरू पद आजीव सभासद मिळवून कायम ठेवलंअसं म्हणलं तर ते चुकीचे होणार नाही. वाचक मित्रांनो तुम्ही म्हणालं की आजच्या जमान्यात आम्ही या स्त्रीला का आठवावे?का पुजावे?का वंदन करावे?**

स्वतंत्र विचाराच्या आजच्या काळातल्या महिलांना तर हे विचार हास्यास्पद वाटतील पण माझ्या प्रिय सख्यांचे जीवनमान जरी सुधारले असले त्यांच्या कडे सगळी भौतिकसुखे जरी हात जोडून ऊभी असली तरी त्यांच्या मनाला शांतता नाही म्हणून आजच्या जमान्यात "शामची आई चे विचार मला महत्त्वाचे वाटतात. आज आपण शामच्या आईचे मुलांच्या सर्वांगीण विकासाचे तत्वज्ञान अभ्यासणार आहोत. आणि मला खात्री आहे सर्व स्तरातील लोकांना ते समजतील व आपल्या भावविश्वात रमलेल्या मातांना यशोदा मातेचे हे विचार पटतील. बालक कसा घडवावा यासाठी यशोदा आईचे तत्त्वज्ञान1)मुलांशी सतत संवाद साधणे 2)मुलांना सतत त्यांचे दोष सांगत न बसता त्यांच्यातील चांगल्या गोष्टींचे कौतुक करणं. 3)मुलांच्या वयातील प्रश्न वेगळे असतात तेव्हा त्यांच्या पातळीवर जाऊन विचार करणं व ते सोडवणं.
4)आजची मुलं सतत टि,व्ही चँनल ,मोबाईल बघत असतात. थोड्याच वेळात यश मिळत नाही त्यासाठी अपार कष्ट,त्याग,सहनशीलता, विचारप्रवाह, कष्ट करण्याची तयारी असावी लागते हे मुलांना समजून सांगणे मला असे सांगायचे आहे की आधुनिक तंत्रज्ञानाने सगळं असं पटकन मिळतं असं लहान मुलांना वाटतं पुढे मोठं होत असताना अपयश आलं तर त्यांचं कोलमडणारं भावविश्व ही एक मोठी सामाजिक चिंताहोते म्हणून त्यांना भौतिकवादापासून शाश्वत आनंद मिळण्याच्या प्रवासासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टाची जाणीव करून देणे.
5)छोट्या शामला त्यांनी पर्यावरणाचे, गरिबीचे,सामाजिक बांधिलकी चे(त्याकाळी मोळीविकणाऱ्या आजीला मदत करायला लावली. 6)आई व मुलं दोघेही अहंकाराने ग्रासलेले नकोत कारणं हीच मुले ऊद्याचे नागरिक बनणार आहेत आणि संपूर्ण निर्णय प्रक्रीयेत तेच जबाबदार असणार आहेत ते ऊद्याचे अधिकारी होणार आहेत. म्हणून सर्व समावेशक विचारसरणी असणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. 7)शामच्या आईचे आजच्या काळासाठी खुप मोठे योगदान म्हणजे छोट्या शामला जेवायला बोलवून दक्षिणा दिली तो प्रसंग आईने ती दक्षिणा देवळात ठेवायला सांगितली. म्हणजेच फुकटंचं किंवा आयते काही घेऊ नकोस ही समर्पित भावना तिने शामला शिकवली हे फार मोठे तत्त्वज्ञान सांगून जाते. आजच्या काळातील मुले व आम्ही सर्व सुखसंपन्न जीवन पध्दतीने आम्ही त्यांना वाढवू शकतो असं म्हणणारे मातापितांना मी सांगु शकते की काळ बदलला आहे पण प्रश्न वेगळे आहेत पण समस्या बदलल्या नाहीत म्हणून शामच्या आईचे विचार आजच्या पिढीने वाचले पाहिजे
कष्टाची व मायेची पाखर आपल्या चिमुकल्यांना देणे व सम्यक समाज निर्माण करणे तुमच्या हातात आहे.
आजच्या काळातील सर्व पालकांनी वाचावी लक्षात ठेवावी अशा या शामच्या आईला शतकोटी वंदन.



# सुशिक्षित माणसांचे प्रश्न



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**चांगल्या शिकल्या संवरलेल्या माणसाला देखील आजकाल प्रश्न पडतात.. एक नव्हे, अनेक प्रश्न.. पण उत्तरेच माहिती नसतात. जसे की आपल्या पुढे मतासाठी लाचार झालेले पुढारी निवडून आल्यानंतर अचानक का माजतात? स्वतःला जनसेवक,नगरसेवक म्हणविणारे सत्तेच्या गुबगुबीत खुर्चीवर बसताच तुमच्या गरजा,तुमची गरिबी सारे काही विसरतात गाड्या खोके बंगले राजकारणात रंगले चिखलात रुतले की विसरून जातात तुमचे देणेघेणे त्यांचे काम फक्त घेणे! हे असे का वागतात?**

जे बाहेर तेच घरात चार भिंतीच्या आत सारखे वाद विवाद होतात दहा जणांची तोंडे दहा दिशाना तीही कधी एकत्र आलीत तर.. एरवी प्रत्येक जण आपापल्या अवकाशात... नवऱ्याला समजून घेत नाही बायको बायकोला पटत नाही नवऱ्याची मिजास प्रत्येकाच्या पंखाचे वेगवेगळे आकाश. मुलगा धड बोलत नाही आई बापाशी सून नीट वागत नाही सासू सासऱ्या शी कुणाचेच पटत नाही कुणाशी कुणालाच कळत नाही, हे असे का? म्हातारपणी मिळत नाही हवे ते आधार कुणाचाच नीट लागत नाही गळ्यातला गांधार ना सूर ना ताल किती वेळ नाचाल बेताल? संसाराची मैफिल नाही पोहचत भैरवीला सांगेल कुणी हे असे का? फक्त द्यायचे एक दुसऱ्याला दूषण प्रत्येक क्षेत्रात फक्त प्रदूषण अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार कुठे शोधायचा सदाचार? कुणी सांगेल का? तुटलेली नाती, भंगलेले आरसे प्रत्येकाची धावपळ, जसे लागले पिसे ज्याचा त्याचा पाय खोलात कुणालाच इंटरेस्ट नाही शिखरात कुठे गेला लळा जिव्हाळा श्रध्दा विश्वास निष्ठा? शब्दच नाहीत का हे आजच्या कोषात? सांगाल का कुणी लोक असे का वागतात? शिकला संवरलेला प्रत्येक जण आहे याच उत्तराच्या शोधात!!



## त्या सांजवेळी

जीवनाच्या वाटेवर चालता चालता,
किती पावसाळे आले किती उन्हाळे आले,
उन्हा पावसात धावता धावता,
जगणे मात्र जगायचे राहून गेले.

सुखाच्या सरीत भिजताना
ओले चिंब झालो.
दुःखाच्या झळा सोसताना
पावलांसोबत पावले टाकीत गेलो.

सुख दुःखाच्या सरीत चालता, भिजता,
एकमेकांचा हात मात्र एकमेकांच्या हाती होता.

सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत
जीवनाचे गाणे गाता गाता, खेळात उन्हं पावसाच्या
जीव थकून गेला आता.

थकलेल्या त्या एका कातरवेळी,
चिमनी पाखरं सारी घरट्यात विसावली.
आळवता आळवता ती मांदी याळी,
त्या स्तब्ध अशा एका संध्याकाळी रविराज - रजनी
अगदी शांतपणे विसावली.

वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923



## पाऊस गोवळीया



पाऊस माझ्या मनातला
पाऊस गंधाचा
पाऊस फुलझडीचा
पाऊस गाण्यातला
पाऊस सावळीया
पाऊस शृंगाराचा
प्रियकराच्या मिठीतला
हिरव्या पानाच्या दिठीतला
पाऊस मुक्या जनावरांचा
पाऊस झाडापेडांचा
पाऊस माडांचा
वेली फुलझाडांचा
पाऊस राधेचा
गोकुळीचा गोवळीया
पाऊस आषाढाचा, श्रावणाचा
गच्च आवेगल्या सरिंचा
पंढरीच्या विठूचा
सावळ्या घनांचा
पाऊस कळीचा
फुल झाडांना
चांदणं लखडण्याचा

चित्रा क्षीरसागर.
9850832291.

## पुस्तके

मी वाचली पुस्तके हे जग समजून
घेण्यासाठी माणूस म्हणून
समृद्ध जगण्यासाठी. पुस्तकांनी
सांगितला इतिहास इथला
पडद्यावरचा अन पडद्याआडचा.
म्हणून समजला भूगोल
गोलगोल माणसाचा. पण
बाकी राहिलं माणसं वाचण्याचं
म्हणून वाचतोय आता माणसं
अनुभवाच्या पुस्तकातले बुडाचे
अन बिनबुडाचे.. सारेच.खरं
तर त्यांनीच केले शहाणे प्रत्येक
वेळी वाटेवर वेड्या बाभळीच्या
काट्यासोबत दगडगोटे टाकून
मला. पुस्तकांच्या शब्दकोशात
'धोका' हा शब्द सापडला नाही
चुकूनही अन इथं माणसाच्या
जगात धोका खातोय रोज.. डोळे
उघडे ठेवूनही. आता माणसांचे
जुने प्रकार नव्याने अभ्यासतो आहे
खुरटया काटेरी झुडपासोबत
वेड्या बाभळींचा अभ्यास करतो
आहे. इथं बोटावर मोजता येतील
इतकीच उरलीय वटवृक्षाची झाडे
विशाल अन ते देताय सावली
रणरणत्या उन्हातही
अख्ख्या सूर्याला पचवून
जीवनाच्या वाटेवर थकलेल्या
माझ्यासारख्या असंख्य
वाटसरूंना.. म्हणून जगणं सोपं
झालंय या भयंकर तापलेल्या
वाळवंटात. असंच हिरवंगार झाड
होण्याचे स्वप्नं पडू लागलय मला
जगाला सावली देण्यासाठी
म्हणून आता उन्हाशी मैत्री करतो
आहे.

ज्ञानेश्वर गायके.कन्नड
मो.९४०३३८४८८९

## दमलास काय बा विठ्ठला तु

जनी नामयाची दासी,करि मदत
तिजशी।
कबीराने जाणिले जनाबाईशी
जनीचे दळण दळिता, गोव-
या थापता ।दमलास काय बा
विठ्ठला तु।।1।।
कबीर दासाचे शेले विणिशी ।
रोहिदासाचे जोडे बनविशी ।
भक्तांचिये कामं करता करता।
दमलास काय बा विठ्ठला
तु।।2।। रेड्यामुखी वेद वदविले
ज्ञानासाठी ।भिंत चालविली
मुक्ताईसाठी ।
संन्याशाच्या पोरांना मदत देता
देता ।दमलास काय बा विठ्ठला
तु।।3।।
नामयाचे लाड पुरवितो ।
दही भाताचा नैवेद्य खातो ।
नामयाला गुरू देता देता ।
दमलास काय बा विठ्ठला
तु।।4।।
व्यापारी तुकोबाची सचोटी
टिकविशी ।
लोक कल्याणाचे अभंग
रचविशी ।इंद्रायणीत गाथा बुडू
न देतांना ।दमलास काय बा
विठ्ठला तु।।5।। आम्हीही करितो
तुझी आराधना ।
आवरा दुर्जना, अभय दे
सज्जना।
समचरण पाहू या तुझे विटेवरी
दमलास काय बा विठ्ठला
तु।।6।।
आहेर वा.र., नासिक
9958782982

## दु:खाचे डोंगर

दुःखाचे डोंगर आज घेतले शिरी
विसावा सुखाचा शोधतो उरी
काट्यांनी टाकिल्या आता
पायघडया
हसत चाललो आता पायंदळी
दुःखाचे डोंगर आज घेतले शिरी
विसावा सुखाचा शोधतो उरी
नंदादीपा सारखं जळत जरी
चाललो
आशेच्या प्रकाशात वाटा न्हाऊ
घालु लागलो
दुःखाचे डोंगर आज घेतले शिरी
विसावा सुखाचा शोधतो उरी
सुख शोधत कुणी तरी मागे
येईल-येईल
जळणाऱ्या वातीला आनंद
अधिक होईल
दुःखाचे डोंगर आज घेतले शिरी
विसावा सुखाचा शोधतो उरी ...

लक्ष्मण वाल्डे,कन्नड
मो.नं-8888606068





## घर तुझं आणि माझं

घर तुझं आणि माझं माया, ममता,
जिव्हाळा लाभे सौख्याचा किनारा
फुलवण्या प्रीत माळा..१

होई प्रेमाचा वर्षाव आस कर्तुत्व सागर
रिती समृध्दी ओंजळ भरे विश्वाची
घागर....२

माय बाप सोबतीला संस्काराचा जपू ठेवा
आरोग्याचे संपादन लाभे अनमोल मेवा..३

घरी चिमणे गोपाल रंगे नाजूक सोहळा
गोड बोबड्या बोलीत खुले खास
गोतावळा ..४

विश्वासाने, सलोख्याने वाहे प्रगतीचा वारा
झेलू चारी दिशा आज एकोप्याने सौख्य
गारा ...५

सौ. प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे

## किर्ती

किर्ती, नावलौकिक, प्रसिद्धी
कतृत्वाशिवाय मिळत नाही
चंदनापरी झिजल्याशिवाय
किर्तीचा सुगंध पसरत नाही

सामाजिक प्रतिष्ठेची सतत
किर्तीला असते किनार
निस्वार्थ समाजसेवेशिवाय
प्रतिष्ठा कशी मिळणार

बुध्दी, कौशल्य, प्रामाणिकपणा
किर्तीसाठी पणाला लागते
सर्वोत्तम कर्म केल्यानेच
जीवन किर्तीमान होते

सुखलोलूप जीवनात
किर्तीला न मिळे स्थान
किर्तीप्राप्त मनुष्याला
सदैव असते कर्तव्याचे भान...

-सुनिल माथने, अकोला
मो.9403282970

## बुद्ध यावा

धावून या क्षणाला.. गर्दीत बुद्ध यावा
अनमोल वेळ त्याचा..खर्चीत बुद्ध यावा.

आहे तसाच येवो.. रानात पावसाळा
धारांमधून माती.. भिजवीत बुद्ध यावा.

आता कुठे दिसेना.. गंधीत पाकळ्या ह्या
घेऊन रंग त्यांचा..धुंदीत बुद्ध यावा.
कीर्ती समोर आहे.. स्फूर्ती अमाप घ्यावी
सिद्धार्थ गौतमाच्या..मूर्तीत बुद्ध यावा.

वैताग फार आला.. या राजकारण्यांचा
मी ही तसा म्हणालो.. खुर्चीत बुद्ध यावा.

सांगून माणसांना.. हा कायदा कळेना
बडवून दानवांना.. वर्दीत बुद्ध यावा.

पृथ्वीवरी विषारी.. वाढेल पाप जेव्हा
मग,आपल्याच तेव्हा..मर्जीत बुद्ध यावा.
-®रज्जाक शेख, श्रीरामपूर 9665778558

## देवा तुझ्या मंदिरात...

देवा तुझ्या मंदिरात
उजळते ज्ञानज्योत
मंद तेवतो प्रकाश
मन माझे झाले शांत....

जागते ही भावभक्ती
अंतरीच्या गाभाऱ्यात
होई ज्ञानाचा उदय
भाव जागतो मनात.....

सुगंधाचा दरवळ
तुळशीचा हार गळा
भाळी चंदनाचे गंध
देव शोभतो सावळा....

देवा तुझ्या दर्शनाने
शांत होते माझे मन
किती वेळा तुला पाहू
नाही भागत तहान....

पायी मस्तक ठेवता
विसरले देहभान



नीर वाहते डोळ्यात
व्याकूळले पंच:प्राण....

ऐसे द्यावे वरदान
तुझे नाम ओठी यावे
तुझे नाम घेण्यासाठी
पुन्हा पुन्हा जन्मा यावे....

सौ. अनघा पतके,
खंडाळा, जि. सातारा.
९७६४८६०२९६

## व्यायामाची महती



थंडीचे दिवस
असतात किती छान
रोज सकाळी उठून
शरीर बनवूया बलवान

आळस आपला शत्रू
दूर त्याला सारा
ध्येय गाठण्यासाठी
झेलूया सकाळचा वारा

असो कितीही थंडी
नको तिचे लाड
सकाळी पांघरूण घेवून
झोपायचे नाही गाढ

धावत-धावत मैदानाला
चकरा मारूया चार
शरीर बळकट होईल
घालता सूर्यनमस्कार

उत्साह आणि स्फूर्ति वाढते
सकाळच्या व्यायामामुळे

रोज न्याहारीला घेवूया
दूध आणि ताजी फळे

निरोगी शरीरात असते
सदा निरोगी मन
सुदृढ शरीरसंपत्ती
हेच आपले खरे धन

- रवींद्र व्ही. चालीकवार
मु. महागाव, जि.यवतमाळ
मो.9011559106

## माय



माय झिजविती काया राबती दिनरात घरात
कष्ट करुनी जीवनी सुख वाटती जगात
आई विना अधुरी जीवनाची ही काहणी
जसा वाट पाहे चातक पहिल्या पावसाची
माय रघात जाळते वाढविण्या लेकर
गाऊनी गीत अंगाई जगी सोसूनी भार
नऊ मास उदरात वाढवी ती बाळास
जगी धन्य माऊली आहे ती देवासमान
जीवनाच्या या देव्हाऱ्यात माय वसे हृदयात
कार्य तिचे महान राहू तिच्या ऋणात

-संदिप नानासाहेब वाकडे
रा. खेडा, ता.कन्नड

## ग्रहण



कधी येत असतं सूर्याचं
तर ते कधी येतं चंद्राचं
पण कोणतही असो ग्रहण
असतं मात्र ते महत्त्वाचं..

खगोल अभ्यासकांचे ह्या
वेगळेच सारे आराखडे
मंत्र तंत्र वाल्यांची नुसती
केवढी तरी धांदल उडे..

पंचांग कर्त्याचं मात्र पहा
गणित कधीच चुकत नाही
संपूर्ण वर्षभराचा ताळेबंद
अजिबात चूक ठरत नाही..

सुर्य माले तील ग्रह तारे हे
नैसर्गिक साऱ्या घडामोडी
शुध्द अशुद्ध कशाचे काय
अशी करताहेत कुरघोडी ..

ह्या ग्रहण काळाची चाहूल
आपल्या आधी लागे पक्षांना
ग्रहण स्पर्श ते ग्रहण मोक्ष
म्हणून बाहेर न दिसती कुणा..

ग्रहणाचा हा पूर्ण पर्वकाळ
सगळेच कसोशीने पाळतात
ग्रहण ग्रासले विचार मात्र
मरेपर्यंत कुरवाळत रहातात..

©® ज्योती ज.आळंदकर
लातूर

# होय, मी आ. बंब यांच्यामुळे पोलीस होणार

## मोफत पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र आ. प्रशांत बंब यांच्या पुढाकाराने सुरू मतदारसंघातील युवकांना वर्दीत पाहण्याचे स्वप्न

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर :** तालुक्यातील लासुर स्टेशन येथे गिताबन येथे मेगा पोलीस भरती मोफत प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन गुरुवारी (दि.१०) आ.प्रशांत बंब यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी बोलताना आमदार बंब म्हणाले कीं पोलीस प्रशिक्षण भरती यांचा अर्थ नुसता उद्योग-धंदे,नोकरी लागणे इथपर्यंत मर्यादित नसून यात माझ्या मतदारसंघासह राज्याचा व देशाचं हित जपलेलं आहे विद्यार्थ्यांनी ध्यानी,मनी,पाषाणी फक्त एकच ध्येय समोर ठेवायचा आहे की होय मी "पोलीस" होणार आणि जनतेला सेवा देणार मी वर्दीत आहे हेच लक्ष ठेवायचं आहे. पोलीस भरती आणि इतरही नोकर भरतीत बऱ्याच मैदानी सराव कींवा परिक्षा पुर्वतयारीत विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते आम्ही या सर्व गोष्टीचा विचार करून गिताबन मोफत पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. येथे मैदानी प्रशिक्षणासह लेखी तयारी,भरतीपूर्व परीक्षा चाचण्या,संपूर्ण नोट्स, अनुभवी शिक्षक,प्रशिक्षक या ठिकाणी उपलब्ध असणार आहेत. या माध्यमातून मुलांचे विद्यार्थ्यांचे भरतीचे स्वप्न पूर्ण करण्याचा आमचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान मोफत प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी १५५ विद्यार्थ्यांनी या ठिकाणी नोंदणी केली असून पुढील दोन दिवस नोंदणी सुरू राहील व १२ नोव्हेंबर पासून मैदानी सरावासह लेखी तयारी सुरू करण्यात येणार आहे. त्यात विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था स्वतः करावी लागणार आहे. यावेळी डॉ.बन्सीलाल बंब, वैजापूर मर्चंट बँकेचे संचालक प्रितम मुथा, नंदकुमार गांधीले, रामेश्वर मुंदडा, शिवनाथ मालकर, प्रकाश वाकळे, सरपंच मीनाताई संजय पांडव, ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर मुकणे, सुरेश जाधव, गणेश व्यवहारे, राजू गायकवाड, अशोक सौदागर, मनीष पोळ, आबासाहेब सरोवर, गफूर पठाण,अमोल जाधव, दादासाहेब तायडे, प्यारेलाल शहा, बाळू शर्मा, अनिल मढीकर, योगेश क्षीरसागर, भैय्याशा सय्यद आदींसह विद्यार्थी व पालक यांची उपस्थिती होती. पोलीस भरती आणि इतरही नोकर भरतीत बऱ्याच मैदानी सराव कींवा परिक्षा पुर्वतयारीत विद्यार्थ्यांना समस्यांना सामोरे जावे लागते



आम्ही या सर्व गोष्टीचा विचार करून गिताबन मोफत पोलीस भरती प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहे. येथे मैदानी प्रशिक्षणासह लेखी तयारी, भरतीपूर्व परीक्षा चाचण्या, संपूर्ण नोट्स, अनुभवी शिक्षक, प्रशिक्षक या ठिकाणी उपलब्ध असणार आहेत. या माध्यमातून मुलांचे विद्यार्थ्यांचे भरतीचे स्वप्न पूर्ण करण्याचा आमचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. मोफत प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी 155 विद्यार्थ्यांनी या ठिकाणी नोंदणी केली असून पुढील दोन दिवस नोंदणी सुरू राहील व दि.12 तारखेपासून मैदानी सरावासह लेखी तयारी सुरू करण्यात येणार आहे. त्यात विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था स्वतः करावी लागणार आहे. यावेळी डॉ.बन्सीलाल बंब, वैजापूर मर्चंट बँकेचे संचालक प्रितम मुथा, नंदकुमार गांधीले, रामेश्वर मुंदडा, शिवनाथ मालकर, प्रकाश वाकळे, सरपंच मीनाताई पांडव, ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर मुकणे, सुरेश जाधव, गणेश व्यवहारे, राजू गायकवाड, अशोक सौदागर,मनीष पोळ, आबासाहेब सरोवर, गफूर पठाण, अमोल जाधव, दादासाहेब तायडे, प्यारेलाल शहा, बाळू शर्मा, अनिल मढीकर,योगेश क्षीरसागर,भैय्याशा सय्यद आदींसह विद्यार्थी व पालक यांची उपस्थिती होती.

> गीताबन मोफत पोलीस प्रशिक्षण केंद्रात भरतीसाठी आलेल्या एका विद्यार्थ्यांने या अगोदर गरुड झेप अकॅडमी येथे भरती होण्याचे स्वप्न बाळगून होतो . परंतु घरची परिस्थिती हालकीची असल्याने प्रवेश घेता आला नाही . परंतु असे म्हणतात जे नशिबात लिहिलेलं असतं तेच घडतं . माझ्या नशिबात औरंगाबाद येथे प्रवेश घेणे नव्हते . आता तीच संस्था आमदार बंब यांच्या माध्यमातून हकेच्या अंतरावर आली असून मी त्यात प्रवेश निश्चित केला आहे . आता मी ही आयएस,आयपीएस, होऊन दाखवेल . असे सांगत डोळ्यातून अश्रूना मोकळे करून दिले .

# ‘भारत जोडो’ यात्रेचा संदेश राज्यभर पोहचवण्याचे काम करणार : थोरात

## शिवसेनेच्या सहभागावर भाजपाची टीका अनावश्यक



आधुनिक केसरी न्यूज

**कळमनुरी :** कन्याकुमारी ते काश्मीर निघालेल्या भारत जोडो यात्रेचे महाराष्ट्राच्या जनतेने जल्लोषात स्वागत केले असून नांदेड जिल्ह्यानंतर हिंगोली जिल्ह्यातील जनतेनेही आपुलकीने, आनंदाने स्वागत केले आहे. ही पदयात्रा पुढे मार्गक्रमण करत २० तारखेनंतर मध्य प्रदेशात प्रवेश करेल पण राहुलजी गांधी यांनी या पदयात्रेच्या माध्यमातून जो संदेश दिला आहे तो महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम आम्ही करणार आहोत असे विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते व भारत जोडो यात्रेचे समन्वयक बाळासाहेब थोरात यांनी सांगितले. कळमनुरी येथे पत्रकारांशी संवाद साधताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, ७ सप्टेंबरला कन्याकुमारी पासून सुरु झालेली पदयात्रा दोन महिन्यानंतर देगलूर मार्गे महाराष्ट्रात आली आणि मागील पाच दिवसात या पदयात्रेचे येथील जनतेने जल्लोषात स्वागत केले आहे. नांदेड नंतर हिंगोली जिल्ह्यातही पदयात्रेचे त्याच उत्साही वातावरणात स्वागत केले गेले. तुळजाभवानीच्या महाद्वारची प्रतिकृती, गजराजांच्या साक्षीने हजारो लोक रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. बंजारा समाजील भगिनी, तरुणांचा सहभाग मोठा दिसला. हिंगोली जिल्ह्यात आल्यानंतर स्व. राजीव सातव यांची आठवण येणे स्वाभाविक आहे ते असते तर आणखी मोठ्या प्रमाणात भारतयात्रींचे स्वागत झाले असते पण आजही येथील पदाधिकारी कार्यकर्ते व जनतेने स्वागतात काही कमी ठेवले नाही. लातूर, कोल्हापूर जिल्ह्यातूनही हजारो लोक पदयात्रेच्या स्वागताला आले होते.

भारत जोडो यात्रेबद्दल सामान्य जनतेमध्ये उत्सुकता, कुतुहल आणि राहुलजी गांधी यांच्याकडून मोठ्या अपेक्षा असल्याचे दिसते. महागाई, रोजगार, शेतकरी, कष्टकरी समाजाच्या प्रश्नांना पदयात्रेत हात घातला जात आहे. राहुलजी वंचित, पीडित, सामान्य जनतेच्या समस्या ऐकून घेत त्यांना आधार देत आहेत. ही पदयात्रा सर्वसामान्य जनतेच्या अंतःकरणाला भिडत आहे. भारत जोडो यात्रेला शिवसेनेने पाठिंबा दिला व शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी पदयात्रेत सहभाग घेतल्याने त्यांच्यावर केली जात असलेली टीका अनावश्यक आहे.

लोकशाही, संविधान वाचवण्यासाठी शिवसेना भारत जोडो यात्रेत सहभागी होत असेल तर स्वागतार्ह आहे. लोकशाही व संविधान वाचवणे भाजपाला मान्य नाही का? असा सवाला विचारून स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी त्या- त्या वेळची राजकीय परिस्थिती पाहून निर्णय घेतलेले आहेत. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार प्रणव मुखर्जी, प्रतिभाताई पाटील यांना शिवसेनेने पाठिंबा दिला होता हे भाजपाला माहित नाही का? प्रबोधनकार ठाकरे व स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल भाजपाने माहिती घ्यावी व नंतर बोलावे असा टोलाही थोरात यांनी मारला.

या पत्रकार परिषदेला आ. डॉ. प्रज्ञाताई सातव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष माजी आमदार मोहन जोशा, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे उपस्थित होते.

# राजपूत-परदेशी मेळाव्यात हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा : शिल्पा परदेशी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** डिसेंबर महिन्यात औरंगाबाद येथे राजपूत/परदेशी समाजाचा महा मेळावा होणार आहे. या मेळाव्यात राजपूत समाजाच्या जात प्रमाणपत्र बाबत येणाऱ्या अडचणी व आणखी ईतर ही शैक्षणिक, सामाजिक बाबीबाबत शासनाला निवेदन देऊन या समाजाच्या मागण्या मान्य करण्यासाठी विनंती करण्यात येणार आहे. तरी औरंगाबाद जिल्ह्यातील तालुक्यातील राजपूत/परदेशी समाजाच्या नागरिकांनी हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वैजापूरच्या राजपूत / परदेशी समाजाच्या कार्यकर्त्या शिल्पाताई दिनेशभाऊ परदेशी यानी शुक्रवार (ता,११)रोजी फुले-शाहू-आंबेडकर सभागृहात आयोजित बैठकीत केले. राजपूत /परदेशी समाजाचे जेष्ठ समाजसेवकव माजी शिक्षणाधिकारी धोंडिरामसिंह राजपूत, से. नि. प्राचार्य डॉ. विठ्ठलसिंह ढाकरे,राजुसिंह राजपूत, खुशालसिंह राजपूत, गोकुळसिंह राजपूत, सावनसिंग राजपूत, सतपालसिंह राजपूत, दिनेश ढाकरे, प्रेमसिंग गुलाबसींग राजपूत, सोनू राजपूत, सचिन राजपूत, डॉ. अनुराधा राजपूत, मंजुषा ढाकरे, दिनेश राजपूत, गोमलाडू यांनीही विधायक सूचना मांडून ह्या मेळाव्याला तालुक्यातुन जास्तीत जास्त नागरिक उपस्थित राहतील या साठी प्रयत्न करणार असल्याचे सूचित केले, भागवत बिघोत यांनी प्रास्ताविक केले, डॉ. योगेश राजपूत यांनी आभार मानले. या बैठकीत राजपूत-परदेशी




समाजाचे वैजापूरचे अध्यक्ष जीवन राजपूत, जयसिंह राजपूत, संजय राजपूत, दिलीपसिंह राजपूत ,जी.जी. राजपूत, सूरज राजपूत, तसेच वैजापूर ग्रामीण भागातील गोलवाडी,जम्मनवाडी येथील राजपूत/परदेशी समाजाचे नागरिक व युवा वर्ग मोठया संख्येने उपस्थित होता.

# शिरेसायगावचा वहिवाटीचा बंद रस्ता मोकळा करा : पीडित शेतकऱ्याचा आत्मदहनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील सिरेसायगाव येथील गट क्रमांक 95



व 96 मधून पुढील असणारे गट क्रमांक 91 98,99,100,101 च्या शेतकऱ्यांना जाणारा वहिवाटी रस्ता काही शेतकऱ्यांनीं बंद केल्याने शेतकऱ्यांना शेतमाल ने आन करण्यासाठी रस्ता नसल्याने शेतकरी पुरते वैतागले आहेत. त्यामुळे अखेर विमलबाई ज्ञानदेव आल्हाड, सचिन दादासाहेब नेमाने, बाबासाहेब येडू गडकर, मोहनराज भिकचंद नेमाने, हरिदास मोहनराज नेमाने आदी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना लेखी निवेदन देऊन रस्ता तात्काळ मोकळा न केल्यास 15 नोव्हेंबरला ज्या गटात वहीवटी रस्ता बंद केला आहे त्याठिकाणीच अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहन करणार असल्याचा इशारा दिला आहे. याबाबतच्या निवेदनच्या प्रती मुख्यमंत्री, महसूलमंत्री, गृहमंत्री, पालकमंत्री, पोलीस अधीक्षक, डिवायएसपी गंगापूर, शिल्लेगाव पोलीस निरीक्षक यांनाही देण्यात आलेल्या आहे.



आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे

शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट

महावीर
घर संसार



● घाऊक आणि किरकोळ ● किराणा, सुका मेवा, मसाले
● क्रॉकरी, घरगुती उपकरणे ● घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि अॅल्युमिनियम
● प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181

वितरण स्थिती 9021395308 9657398232

घाऊक चौकशी 7620111118 9527111185

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# शहर विकासासाठी खासदारांनी स्वकर्तृत्वावर निधी आणावा

## आमदार फारुख शाह : माझ्या कामाचा धडाका पाहून बाबा झोपेतून उठले आणि स्थगितीसाठी पळाले

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** खासदार सुभाष भामरे व महापालिकेच्या सत्ताधारींच्या आडमुढे धोरणामुळे विकास कामांना खिळ बसली आहे. गेल्या वर्षापासून राज्य शासनाकडून निधी आणून शहराचा विकास केला जात आहे. एका वर्षांपूर्वी जे 30 कोटीची कामे आम्ही मंजूर करून आणली त्या कामांना व निधींना स्थगिती देण्याचं काम खासदार सुभाष भामरे व महापालिकेच्या सत्ताधाऱ्यांनी केले आहे. यामुळे अनेक शहरातले महत्त्वाचे काम रखडले गेले आहेत. आमदार फारुक शाह यांनी मंजूर केलेल्या निधीला स्थगिती देण्यात यावी अन्यथा मी माझ्या पदाचा राजीनामा देईल असा इशारा खासदार सुभाष भामरे यांनी दिल्यानंतर त्याच्या विकास कामांसाठी मी मंजूर केलेल्या निधीला स्थगिती देण्यात आली असा आरोप आमदार डॉक्टर फारूक शाह यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून केला आहे. मी मंजूर केलेल्या निधीला स्थगिती आणून तोच निधी आणून खासदारांनी आपली वा - वा केले असल्याचेही त्यांनी सांगितल आहे. धुळे महानगरपालिकेला शहर विकासाच्या कामासाठी आम्ही शंभर कोटीहून अधिक निधी आणुन दिलेला



आहे. परंतु महानगरपालिकेच्या सत्ताधाऱ्यांच्या आडमुठेपणामुळे व विकासाच्या कामाला अडथळा आणण्याचे भगीरथ जोडीच्या आदेशामुळे शहर विकासाच्या कामाला अडथळा निर्माण होत आहे आणि हे पाप भाजप पक्षात असलेल्या भगीरथ जोडी करीत आहे. आम्ही आमदार म्हणून भाजपाच्या नगरसेवक व नगरसेविकांना भेदभाव न करता करोडो रुपयांचा निधी प्रभागाच्या विकासासाठी दिलेला आहे. आम्ही दिलेला निधी व खासदारांनी दिलेला निधी याची तुलना शहरवासीयांनी करावी असे मतही शाह यांनी व्यक्त केले आहे. खासदारांनी ९ वर्षापासून रेल्वेचे गाजर धुळेकरांना दाखवले आहे. मात्र प्रत्यक्षात हे काम कुठेही झाली नसल्याचं माहिती आ.शाह यांनी दिली आहे. अक्कलपाडयाचे पाणी दिवाळी जाऊन सुद्धा आजपर्यंत शहरात पोहचलेले नाही. दिवसभर झोपा काढणारे खासदार आमच्या शहराच्या विकासकामामुळे झोपी गेलेला जागा झाला या उक्तीप्रमाणे आमचे काम स्वताच्या नावावर खपवून घेत आहे. त्यांनी स्वताच्या कर्तुत्वाने केद्रातून व राज्य शासनाकडून निधी आणावा असे खुले आवाहनही पत्रकार परिषदेतून आमदार डॉक्टर फारुख शाह यांनी खासदार सुभाष भामरे यांना दिले आहे.

# चित्रपटगृहात जाऊन मारहाण करणे राज्यात सहन करणार नाही

## भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एखाद्या चित्रपटातील काही दृश्यांबाबत आक्षेप असेल तर त्याच्या विरोधात तक्रार करता येईल किंवा शांततामय पद्धतीने विरोधही करता येईल. पण चित्रपटगृहात जाऊन मारहाण करण्याची दादागिरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राज्यात कोणीही सहन करणार नाही, असा इशारा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी दिला.

बावनकुळे कोल्हापूर जिल्ह्याच्या संघटनात्मक प्रवासात आहेत. कोल्हापूरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, भाजपा कोल्हापूर शहर जिल्हाध्यक्ष राहुल चिकोडे, भाजपा कोल्हापूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष समरजीतसिंह घाटगे व विभागीय संघटनमंत्री मकरंद देशपांडे उपस्थित होते.

माजी मंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना पोलिसांनी अटक केल्याविषयी एका पत्रकाराने प्रतिक्रिया विचारली असता मा. बावनकुळे म्हणाले की, कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही. एखाद्या चित्रपटात काही आक्षेपार्ह असेल तर त्याच्या विरोधात सेन्सॉर बोर्डाकडे तक्रार करावी. विरोध करण्यासाठी शांततामय मार्गाने धरणे देता येते, निदर्शने करता येतात किंवा उपोषण करता येते. पण सीसीटीव्ही चित्रिकरण चालू असूनही थिएटरमध्ये जाऊन कोणी लोकांना मारहाण करेल आणि महिलांचा अपमान करेल तर दादागिरी खपवून घेणार नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राज्यात हे कोणीही सहन करणार नाही.

ते म्हणाले की, काँग्रेस पक्षातील निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे, त्यामुळे काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांची यात्रा राज्यात आली आहे आणि काँग्रेसचे कार्यकर्ते भाजपात प्रवेश करत आहेत. काँग्रेसच्या बाराशे कार्यकर्त्यांनी काल सातारा येथे भाजपामध्ये प्रवेश केला. गेल्या आठवड्यात नंदूरबार जिल्ह्यातील काँग्रेसचे तीन नगरसेवक भाजपामध्ये



दाखल झाले. राहुल गांधी यांची यात्रा काँग्रेसचे नेते आणि त्यांच्या मुलांनी ताब्यात घेतली आहे. काँग्रेसच्या निष्ठावान कार्यकर्त्यांना यात्रेचा गंधही नाही. त्यांनी सांगितले की, शिवसेना खासदार गजानन किर्तीकर यांनी बाळासाहेबांची शिवसेना पक्षात प्रवेश केला. किर्तीकरांसारखा शिवसेनेसाठी आयुष्य देणारा कार्यकर्ता सोडून जातो व अशा रितीने शिवसेनेच्या मूळ विचारांचे सर्वजण सोडून गेले तरी उद्धव ठाकरे यांना काही फरक पडत नाही. कारण त्यांच्या पाठीशी आता काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आहे. त्यांनी काँग्रेस पक्षाचे सर्व काही स्वीकारले आहे. ऊर्जा उपकरण निर्मिती झोन प्रकल्प मध्य प्रदेशला मिळाला आहे, त्याविषयी एका पत्रकाराने विचारले असता मा. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, याबाबतीत गैरसमज पसरवू नये. हा प्रकल्प मिळण्यासाठी जून महिन्यात केंद्र सरकारला एक निर्दोष प्रस्ताव सादर करायचा होता, पण त्यावेळी सत्तेवर असलेल्या महाविकास आघाडीने ते काम केले नाही, त्यामुळे हा प्रकल्प गमावण्यासही महाविकास आघाडीच दोषी आहे. त्याबद्दल शिंदे फडणवीस सरकारला दोष देता येणार नाही. ते म्हणाले की, लव्ह जिहादमध्ये जाणीवपूर्वक प्रयत्न करून हिंदू मुलींना फसविले जाते. त्यामुळे हा प्रकार थांबायला हवा, अशी भाजपाचे ठाम मत आहे. लव्ह जिहादचे कोणतेही प्रकरण असेल तर तेथे भाजपा कठोर भूमिका घेईल.



# दिव्यांग दांपत्याने वेगळ्या पद्धतीने मुलाचा वाढदिवस केला साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील आमखेडा येथील महामुनी अगस्थी महाराज वारकरी शिक्षण संस्थतेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा करून केला सत्कार. संस्कारमय शिक्षणाबरोबरच मृदंग, हारिपाठ, प्रवचन, अभंग, गायक, वारकरी चाली आदि वारकरी शिक्षण देण्यात येत आहे. १८ वर्षपूर्वीं स्थापन करण्यात आलेल्या संस्थेतून नामवंत किर्तनकार तयार झाले आहे शध्याला शिक्षण घेवून संस्कृतीचे खरे दर्शन घेत असलेल्या बाल किर्तनकार, गायक मृदंग वादक तसेच इत्यादी शिक्षण असलेल्या व त्यानां शिक्षण देणाऱ्या शिक्षकांचा सत्कार समारंभ जनहित क्रांती बहुउदेशीय विकास संस्थेचे अध्यक्ष तथा प्रहार अपंग क्रांती आंदोलन सोयगाव तालुका अध्यक्ष संदीप इंगळे यांचा मुलगा चि.अर्थव याच्या पाचव्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आला होता. तसेच यावेळी ह.भ.प.रवींद्र महाराज परेराव, ह.भ.प. शरद महाराज पवार, ह.भ.प. निवृत्ती महाराज मोहने, ह.भ.प. राहुल महाराज दामधर, नागेश महाराज, नाना सोनवणे यांचा उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेत शिक्षण घेत असलेले रोहन साबळे, कृष्णा शिंदे, पंकज साबळे, विश्वास पंडीत साई मोहिते यांच्या सह उपस्थित विद्यार्थ्यांचा सोयगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी उपोनि सतीष पंडीत, ज्ञानेश्वर सरताळे, आमखेडा गावचे सरपंच गजानन ढगे, पोसला गावचे सरपंच गणेश माळी, मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष भरत पगारे, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष दिलीप शिंदे यादवकुमार शिंदे, ज्ञानेश्वर (आप्पा) बाप ईधर इंगळे, गुलाब ( मामू) शेख, सुनिल काळे, सुलेमान शेख, दतू काटोले, योगेश बोखारे, भगवान कोचलकर प्रा. निलेश गाडेकर, महा ई सेवा संचालक दिपक फुसे, अनिल पवार, संजय ताडे, संजय मिसाळ, ज्ञानेश्वर खलसे, अनिल लोखंडे, ज्ञानेश्वर इंगळे, आदी उपस्थित होते.



# भारतीय कामगार सेना मुंबई रुग्णालय युनिटतर्फे संचालक मंडळाची निवडणूक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** बॉम्बे हॉस्पिटल को- ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीच्या सर्व संचालक संस्थेची समिती सदस्य पदासाठी पंचवार्षिक निवडणूक २०२२ ते २०२७ या कालावधीसाठी दिनांक ०४/११/२०२२ रोजी घेण्यात आली. निवडणूक निर्णय संस्थेच्या एकूण सभासदांपैकी ३० सभासदानी उमेदवारी अर्ज दाखल केले त्यापैकी सर्व साधारण मतदार संघात १८ उमेदवार, महिला राखीव मतदार संघात ०६, अनुसूचित जाती जमाती मध्ये ०२ उमेदवर तसेच भटक्या विमुक्त जाती जमाती मतदार संघातून ०४ उमेदवार निवडणुकीसाठी उभे होते. निवडणूक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले, बॉम्बे हॉस्पिटल व्यवस्थापन यांनी फार मोलाचे सहकार्य केले. रमेश भट्टड (एच आर डी डायरेक्टर) तसेच त्यांच्या सहकारी यांनी सर्व नियोजन व्यवस्थित केल्याने निवडणुक सुरळीत पार पडली. संस्थेचे व्यवस्थापक यांनी सर्व व्यवस्था उत्तम प्रकारे केली. भारतीय कामगार सेना, मुंबई रुग्णालय युनिट तर्फे जाहीर सत्कार समारंभ आयोजित करण्यात आले. बॉम्बे हॉस्पिटल को. ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या सर्व नवनियुक्त संचालकचे नावे पुढील प्रमाणे महेंद्र हरचंदे, सुनील चिकणे, विजय दळवी, अमृतलाल खुमान, रमेश कसबे, सरजू म्हात्रे, पल्लवी शिंदे, शिल्पा पवार, गणेश वरणकर, मंगेश गायकवाड व संतोष पाटील या सर्वांचा सत्कार शिवसेना जळगाव जिल्हा संपर्क प्रमुख संजय हरिश्चंद्र सावंत यांच्या विशेष उपस्थित शुक्रवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ रोजी दुपारी ३:०० वाजता करण्यात आले होते. हा संपूर्ण सत्कार समारंभ युनिटचे अध्यक्ष राजू नायर यांच्या देखरेखीत पार पडले व सर्व विजयी उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले.



# मनोज पवारांची शिक्षणासाठी कोमलला 55 हजारांची मदत

## तालुक्यात मनोज पवार यांच्यासारखे उमदे नेतृत्वात उदयास आल्याने नागरिकांमधून कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील शनिमंदिर येथील सोमनाथ वाघ या ड्राव्हर कष्टकऱ्याची मुलगी कोमल ही शिक्षणात अग्रेसर असुन पण घरची परीस्थीती जेम तेम असुन वडील सोमनाथ वाघ हे ड्रायव्हींग करून आपला व परीवाचा उदरनिर्वाक करत आहे. परंतु मुलीच्या शिकण्याची जिद्द बघुन शहरातील समाजसेवेची ओढ मनांत असणारे गरिबांचे कैवारी उद्योजक मनोज पवार यांच्या पर्यत कार्यकत्यांनी विषय घेतात त्यांनी शनिमंदिर येथील सोमनाथ वाघ यांच्या घरी धाव घेऊन भेटी दरम्याण सोमनाथ वाघ यांची मुलगी कुमारी कोमल वाघ ही इंजिनिअरींगच शिक्षण घेण्यास इच्छुक आहे पन घरची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्या कारणाने तिला शिक्षण घेण्यास शक्य होत नव्हते ही बाब उद्योजक मनोज पवार यांच्या निदर्शनास येताच कोमलची महत्व कांगक्षा बघुन कोमलला चालु वर्षाचे शैक्षणिक खर्च ५५ हजार रुपये देऊन कोमलला शैक्षणीक क्षेत्रात एक वेगळी भरारी घेण्यास बळ दिल्याने समस्त वाघ कुटुंबीयांनी मनोज पवार यांचे आभार मानले. तालुक्यात असेच उमद नेतृत्वात उदयास आल्याने नागरिकांमध्ये पवार यांचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.





माझी परिस्थिती जेमतेम असून मी सध्या ड्रायव्हिंग करून माझा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहे परंतु मनोज पवार यांनी या भल्या माणसाने माझ्या मुलीच्या शिक्षणासाठी 55 हजार रुपये दिल्यामुळे ती पुढील शिक्षण पूर्ण करू शकते मी व माझा परिवार नेहमी पवार यांचा ऋणी राहील.

–सोमनाथ वाघ, पालक

# गटविकास अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात स्वच्छता मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** पंचायत समिती आवारात स्वच्छता मोहिम गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांच्या नेतृत्वात राबविण्यात आली असुन या मोहिमेत पंचायत समिती कर्मचाऱ्यांसमवेत गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांनीही हातात झाडू घेऊन साफसफाई केली. 19 नोव्हेंबर रोजी जागतिक स्वच्छता दिन असल्याने तालुकाभरातील १३८ ग्रामपंचायतींच्यावतीने १९ नोव्हेंबर रोजी गाव, वस्त्यांवर स्वच्छता मोहित राबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर पंचायत समितीतर्फे जनजागृती करण्यात येणार आहे. पूर्व तयारी म्हणून शुक्रवारी पंचायत समिती परीसरात स्वतः गटविकास अधिकारी ढोकणे यांनी अधिकारी व कर्मचारी यांच्यासह हातात झाडू घेऊन पंचायत समिती परिसर स्वच्छ केला. यावेळी काही कामानिमित्त आलेले सरपंच, ग्रामसेवक, कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. दरपंधरा दिवसांनी ही मोहिम राबण्यात येणार आहे. १८ नोव्हेंबर रोजी सर्व ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक आपआपल्या मुख्यालयी मुक्कामी राहून १९ नोव्हेंबर रोजी गावांमध्ये स्वच्छता मोहिम राबविणार असल्याचे ढोकणे यांनी अशी माहिती दिली आहे. यावेळी गटविकास अधिकारी सी.एम. ढोकणे सहाय्यक प्रशासन अधिकारी हरिनाम कोलमवाड, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष वाय एम धाटबळे विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे, विजय काटे, पी. एस. वाणी, एस. जी. ताटे, व्ही. एस. वासणे, कल्पेश राठोड, एस. डी. चव्हाण, नागेश किरतकर, जफर अली व महीला कर्मचारी यांची उपस्थीती होती .





# हजारो लाभार्थी पंतप्रधान मोदींना पाठविणार पत्र

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने सर्वसामान्य जनतेसाठी राबविलेल्या विविध योजनांचा लाभ घेतलेल्या हजारो लाभार्थी धन्यवाद मोदीजी या उपक्रमांतर्गत कन्नड तालुक्यातील औराळा सर्कल मधून हजारो पत्र पंतप्रधानांना पाठविणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी विविध योजना राबविल्या असून याचा जनतेला कितपत फायदा झाला यासाठी भाजपा व भाजपा युवा मोर्चा च्या वतीने धन्यवाद मोदीजी या उपक्रमांतर्गत हजारो लाभार्थी पत्र देणार आहे यासाठी औराळा सर्कल मधून हजारो पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लाभार्थ्यांकडून पाठविण्यात येणार आहेत, याचा प्रारंभ शुक्रवारी दिनांक 11 नोव्हेंबर रोजी औराळा येथे भाजपा पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भाजपा युवा नेते प्रभाकर बागुल भाजपा बूथ प्रमुख विठ्ठल गुजराणे अविनाश जिवरख पवन शेठ खंडेलवाल भाजपा युवा मोर्चा विभाग प्रमुख सोमनाथ वाघचौरे संदीप रिंढे गोरख गायकवाड आदींसह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

# भानवाडी येथे आ. बंब यांच्या निधीतील सिमेंट रस्त्याचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासुरस्टेशन-सांवगी ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वार्ड क्रमांक तीन मधील भानवाडी येथे आ. प्रशांत बंब यांच्या माध्यमातून मंजूर असलेल्या सिमेंट कॉंक्रीट रोडचे उद्घाटन शुक्रवारी सरपंच मीनाताई संजय पांडव, माजी सरपंच प्रदीप भुजबळ, आ.बंब यांचे स्वीय साहाय्यक रज्जाक पठाण आदींच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर मुकणे, माजी उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य गणेश व्यवहारे, राजु गायकवाड, प्रकाश कोकरे, कल्याण पवार, शिला गाढे, सोपान बोरकर, विक्की मढीकर, अशोक सौदागर, संजय पांडव, सुरेश जाधव, अमोल जाधव, संतोष काळे, सिराज मिर्झा, भगवान गाडे, बापूसाहेब देशमुख, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब थोरात, प्रशांत जैन, दिनेश व्यवहारे आदींसह भानवाडी येथिल ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.




काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# ट्रॅव्हलमध्ये गांजा; आरोपीच्या आवळल्या मुसक्या

## तालुक्यात मनोज पवार यांच्यासारखे उमदे नेतृत्व उदयास आल्याने नागरिकांमधून कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुका पोलीस स्टेशनची कारवाई ट्रॅव्हल मध्ये मानवी मेंदूवर परिणाम करणारा ११ किलो चा गांजा घेऊन जात असताना आरोपीला रंगे हात पकडले. धुळे तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी फागणे येथे पेट्रोलींग करत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की , फागणे येथे स्टॅन्डजवळ उभ्या असलेल्या चोपडा ते पुणे जाणाऱ्या ट्रॅव्हल्स मध्ये प्रवाशाकडून गुटख्याची चोरून लपून वाहतुक केली जाते . त्यावरून धुळे तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी अशांनी वाहनाची चेकींग केली असता सुरेश असरद छाजेड वय २५ रा . बालमटाकळी ता.शेवगांव जि.अहमदनगर हल्ली रा.शिक्रापुर रोड , चाकण , पुणे,आनंद नागनाथ कापुरे वय १९ रा.कोळेगांव ता . मोहोळ जि . सोलापुर ह . रा . आळंदी जि . पुणे,सुनिल मद्रास पवार वय २५ रा.महादेव दोंदवाडा ता . शिरपुर जि.धुळे हे तिघे त्यांचे कब्जातील पिशवीत गांजा बाळगून मिळून आले . त्यांचे कब्जात असलेल्या मोठ्या पिशवीत एकूण ११.३९८ कि.ग्रॅ . वजनाचा ५६.९९०/ - रुपये किंमतीचा मानवी मेंदुवर परिणाम करणारा, हिरवट रंगाचा उग्र वासाचा , ओलसर असा, पान - फुल, देठ असलेला गांजा दोन चिकट पट्टी पॅकींगमध्ये भरल्याचे आढळून आले त्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे . - ( १ ) ५६ ,९९०/ - रु किंमतीचा मानवी मेंदूवर परिणाम करणारा अंमली पदार्थ गांजा वजन ११.३९८ किग्रॅ ( वजन पिशवीसह ) वजनाचा एका विमल पानमसाला नावाचे झोला वजा पिशवीत असलेला किंमत ५००० / - रुपये प्रति किलो . सदर बाबत धुळे तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोउनि अनिल महाजन हे करीत आहेत. अशाप्रकारे नमूद पोलीस अधिकारी व कर्मचारी अशांनी कौशल्याने अवैधरित्या होणारी गांजाची वाहतुक पकडून मानवी मेंदूवर परिणाम करणाऱ्या पदार्थाची तस्करी वाहतुक उघड केली आहे . सदरची कारवाई ही विशेष पोलीस महानिरीक्षक सो नाशिक परिक्षेत्र, नाशिक बी.जी. शेखर पाटील, पोलीस अधीक्षक धुळे, संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक धुळे किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी साक्री विभाग, प्रदीप मैराळे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली धुळे तालुका पोलीस स्टेशन येथील पोलीस उप निरीक्षक सागर काळे, प्रविण पाटील, किशोर खैरनार, अविनाश गहीवड, संतोष देवरे, मुकेश पवार, योगेश कोळी, नितीन दिवसे, अमोल कापसे यांनी केली आहे.

# क्रांतीगुरु लहुजी साळवे जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी नरेंद्र भालेराव, कार्याध्यक्षपदी विक्की लोखंडे तर स्वागताध्यक्ष पदी संदीप मानकर यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज


नरेंद्र भालेराव (अध्यक्ष)


विक्की लोखंडे (कार्याध्यक्ष)


संदीप मानकर (स्वागताध्यक्ष)

**औरंगाबाद :** भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील अग्रगण्य जनक आद्यक्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या 228 व्या जयंतीनिमित्त मातंग एकता आंदोलन या राज्यव्यापी सामाजिक संघटनेच्या वतीने जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून संघटनेचे राज्य सल्लागार तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राजू भाऊ आहिरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या बैठकीत उत्सव समितीच्या अध्यक्ष पदी नरेंद्र भालेराव, कार्याध्यक्ष पदी विक्की लोखंडे तर स्वागताध्यक्ष पदी जिल्हाध्यक्ष संदीप मानकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असून.. उर्वरीत कार्यकारिणी खालीलप्रमाणे **उपाध्यक्ष :** विजय आहिरे, भरत मानकर, ज्ञानेश्वर निकाळजे, सुरेश चंदनशिव **सचिव :** किशोर तुपे, राजश्री साठे, अंबादास पवार **सहसचिव :** गजानन मानकर, राहुल अंभोरे, कैलास भालेराव, मनेश ससाणे, **सहकार्याध्यक्ष** : अजिनाथ पाचवणे, संदीप कांबळे, रावसाहेब मोटे, स्वाती जोगदंडे, ज्योती साळवे, **कोषाध्यक्ष :** विजय कसारे, विलास भालेराव, रवि कसारे, जना खोतकर, नारायण साळवे **सदस्य :** साहेबराव दणके, संजय कांबळे, समाधान लोखंडे, विशाल आहिरे, श्रीकांत मानकर, राजु खरात, नितीन सौदागर, राजु कसारे, राजु कांबळे, सुनिल कसारे, दिपक सोनवणे, भगवान सोनवणे, कृष्णा सोनवणे, संजय कसारे, आनंद वाघमारे, बलराज अंभोरे, अविनाश पाखरे, दत्ता बारवकर **सल्लागार पदी :** ना.अब्दुल सत्तार कृषिमंत्री, अतुल सावे सहकार इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री, .संदीपान भुमरे पालकमंत्री तथा रोहयो/ फलोत्पादन मंत्री, मा.प्रदीप जैस्वाल आमदार, मा.रमेश दादा बागवे माजी गृहराज्यमंत्री तथा संस्थापक अध्यक्ष ए.आंदोलन, अविनाश बागवे प्रदेश कार्याध्यक्षए. आंदोलन, राजु भाऊ आहिरे राज्य सल्लागार तथा सदस्य जिल्हा नियोजन समिती, प्रा. संजय गायकवाड उपाध्यक्ष देवगिरी नागरी सहकारी बँक, मा.अशोक शिरसाठ जिल्हा सचिव, मा.अशोक कांबळे जिल्हा कार्याध्यक्ष, मा.राजु खाजेकर सामाजिक कार्यकर्ते, मा.योगेश दणके युवा नेते आदींची निवड करण्यात आली.



# पोलिस पाटील संघटनेकडून दिंडोरी पोलिसांवर कौतुकाची थाप

## निळवंडी येथील पोलीस पाटलांवरील प्राणघातक हल्ल्यांचा शोध

**लखमापूर :** दोन महिन्यापूर्वी निळवंडी येथील पोलिस पाटलांवर झालेल्या प्राण घातक हल्ल्याने अवघ्या तालुक्यात खळबळ उडाली होती. कोणताही सुगवा नसतांना दिंडोरी पोलिसांनी योग्य तपास करुन गुन्हेगारांना गजाआड टाकून पोलिसांचा धाक कायम ठेवला. यामुळे दिंडोरी पोलिसांचे कौतुक करत निळवंडी ग्रामस्थ व महाराष्ट्र राज्य गाव कामगार संघाच्या वतीने दिंडोरी पोलिसांचा नागरी सत्कार करण्यात आला.

दिंडोरीचे तहसीलदार पंकज पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ, पोलिस उपनिरीक्षक चेतन लोखंडे, पांडूरंग कावळे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक राजेंद्र लहारे, पोपट नवले, बाळासाहेब पानसरे, संदिप कडाळी, सुमित आवारे, बाळासाहेब कावळे, अमोल साळवे, अविनाश आहेर, मधुकर बेंडकूळे, हेमंत पवार, विशाल पैठणकर, श्रीमती बोंबले, सौ. वाघ आदींचा नागरी सत्कार करण्यात आला.

गुन्हेगारांना अटक करुन गुन्हेगारी प्रवृतींना चाप बसविण्याचे कार्य दिंडोरी पोलिसांनी केले आहे. निळवंडी येथील पोलिस पाटील शांत व संयमी स्वभावाने परिचित असतांना त्यांच्यावर प्राण घातक हल्ला कोण करु शकतो ? या विवंचनेत प्रत्येकजण सापडला होता. हल्ला होवून देखील संशय कुणावर घ्यावा, असा प्रश्न कुटूंबियांना देखील पडला होता. परंतू कोणताही सुगवा नसतांना दिंडोरी पोलिसांनी विशेष कामगिरी केली. यात विशेषतः वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक चेतन लोखंडे यांनी विशेष परिश्रम घेतले. याबद्दल चेतन लोखंडे यांचे विशेष कौतुक गावच्या वतीने करण्यात आले.


महाराष्ट्र राज्याचे गाव कामगार संघाचे सल्लागार समितीचे अध्यक्ष चिंतामण मोरे पाटील, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख कैलास पाटील, निळवंडीचे सरपंच एकनाथ डंबाळे, बाजार समितीचे माजी संचालक मच्छिंद्र पवार, पत्रकार भगवान गायकवाड आदींनी आपल्या मनोगतात दिंडोरी पोलिसांचे विशेष कौतुक करुन खाकीचा धाक हा कायम असाच राहु द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमास संदिप पाटील, रामदास पाटील, सुनील पाटील, कचरु पाटील, भाऊसाहेब पाटील, रविंद्र पाटील, दिलीप पताडे, सोमनाथ पाटील, गुलाबराव पाटील, संतोष पाटील, सोमनाथ पाटील, रोहिदास पाटील, नामदेव पवार, रमेश पाटील, सुभाष पाटील, भास्कर पताडे, शिवाजी पताडे, गणेश हिरे, अंबादास पाटील, कारभारी चौधरी, जयराम भवर, देवराम बोरस्ते, कचरु पवार, शाम पाटील, सुनील लोखंडे, किशोर अपसुंदे, निवृत्ती अपसुंदे, संजय आंबेकर, पोलिस पाटील संघटनेचे तालुकाध्यक्ष सोमनाथ मुळाणे, उपाध्यक्ष संजय धात्रक, सौ.अर्चना अनवट, सीमा ढगे, चित्रकला पाटील, स्वाती कळमकर, सम्राट पाटील, पंडीत दवंगे, राजेंद्र राऊत, मुरलीधर पवार, अशोक सांगळे,रामनाथ पाटील, वामनराव पाटील, वसंत परदेशी, किरण निरघुडे, वडजे, सम्राट राऊत, नारायण अपसुंदे, रोशन परदेशी, आदींसह पोलिस पाटील संघटनेचे पदाधिकारी, पोलिस वर्ग, निळवंडी, हातनोरे, मडकीजांब, पाडे, जांबुटके आदी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चिंतामण मोरे पाटील यांनी केले तर आभार संदिप अंबादास पाटील यांनी मानले.

> गुन्हेगाराने कितीही चालाखी केली तरी पोलिस त्यांच्यापर्यंत पोहचतात हे पुन्हा एकदा सिध्द झाले . सुगवा नसला तरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार गुप्त बातमीदार गुन्ह्याचा तांत्रिक तपास करत गुन्हेगारांना गजाआड करण्यास आम्हाला यश आले . हे आमच्या सर्व टीमचे यश असून त्याच्या कौतुकाची थाप आम्हास मिळत आहे याचा आम्हाला आनंद होत आहे . यापुढेही गुन्हेगारांना योग्य शासन करण्यास दिंडोरी पोलिस नेहमी अग्रेसर असतील याची खात्री देखील मी पोलिसांच्या वतीने देतो .
>
> **चेतन लोखंडे, पोलिस उपनिरीक्षक, दिंडोरी**

> निळवंडी येथील पोलिस पाटलांवर झालेला प्राण घातक हल्ला हा नक्कीच निदणीय होता . कोणताही सुगवा नसल्याने गुन्हेगार गजाआड होतील की नाही ? याविषयी शाशंकता निर्माण झाली होती . परंतू दिंडोरी पोलिसांनी योग्य पध्दतीने तपास लावत गुन्हेगारांना गजाआड करुन कायद्याचा धाक कायम ठेवला . पोलिस पाटलांना देखील योग्य तो न्याय मिळवून दिल्याबद्दल मी समस्त पोलिस पाटील संघटनेच्या वतीने पोलिसांचे आभार मानतो .
>
> **चिंतामण मोरे पाटील, अध्यक्ष गाव कामगार संघ सल्लागार समिती**

# विलास कोरडे यांची उद्या फेसबुक व यूट्यूबवर लाईव्ह मुलाखत

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** औरंगाबादच्या सामाजिक.. शैक्षणिक क्षेत्रात मुलांसाठी.. महिलांसाठी एका बांधिलकीच्या जाणिवेतून सतत गेल्या दोन दशकांपासून कार्यरत असलेले कुलस्वामिनी प्रतिष्ठापनचे संस्थापक विलास कोरडे यांची उद्या सायंकाळी ७ वाजता यूट्यूबवर व फेसबुकवर लाईव्ह मुलाखत प्रसारित करण्यात येणार आहे. पुण्यातील करंट केअर फाऊंडेशन आणि मिशन इलेक्ट्रीकल एम्पायर चे संस्थापक किशोर कुलकर्णी हे ही मुलाखत घेणार आहेत. पुण्यातील किशोर कुलकर्णी यांनी त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून आतापर्यंत गेल्या तीन वर्षांपासून असंख्य सामाजिक क्षेत्रातील, शैक्षणिक क्षेत्रात, कला क्षेत्रातील, क्रिडा क्षेत्रातील, उद्योगपतीच्या तसेच अनेक साहित्यिकांच्या मुलाखती यूट्यूबवर नी फेसबुक वरुन प्रसारित केलेल्या आहेत.

औरंगाबादच्या विलास कोरडे यांच्या उद्या सायंकाळी ७ वाजता प्रसारित होणाऱ्या त्यांच्या सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून केलेल्या कार्याचां इतिहासाची उकल या मुलाखतीच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राला नी साऱ्या जगताला करुन दिली जाणार आहे हे बाकी खरं...

# देवठाणा येथे प्रशासन आपल्या दारी अभियानास प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मराठवाडा मुक्ती संग्राम अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त नुकतेच देवठाणा ता ( भोकर ) येथे प्रशासन आपल्यादारी अभीयान घेण्यात आले आहे. समाजातील विविध घटकांसाठी असलेल्या योजनांची माहिती यावेळी देण्यात आली. पंचक्रोशीतील बहूसंख्य नागरीकांची उपस्थिती होती. शासनाच्या वतीने दरवर्षी लोकाभिमुख योजनांची अंमलबजावणी केली जाते याची तळागाळातील सर्वसामान्य माणसाला माहिती मिळावी आणि त्यांची उन्नती व्हावी यासाठी खेडोपाडी जाऊन योजनांची माहिती देण्यासाठी यंदा मराठवाडा मुक्ती संग्राम अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त प्रशासन आपल्या दारी हा अभिनव उपक्रम तालुक्यात राबविण्यात येत आहे.देवठाणा ( ता. भोकर ) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवठाणा,विधी व सेवा प्राधिकरण, तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जातो आहे. अध्यक्षस्थानी न्यायाधीश सावेनी हे होते. व्यासपीठावर न्यायाधीश डी.डी.माने, तहसीलदार राजेश लांडगे, गटविकास अधिकारी अमित राठोड, पूरवठा अधिकारी श्रीमती चामनर, गटशिक्षणाधिकारी माधव वाघमारे, ॲड.एस.एल. कुटे ॲड. सूजाता कांबळे, ॲड. शेख मूजाहेद, ॲड. सुर्यवंशी, ॲड. पेदे यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी आपापल्या शासकीय कार्यालयातील योजना व त्याचा लाभ कसा घ्यावा याची सखोल माहिती देऊन याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सरपंच राजकुमार अंगरवार, रामराव देशमुख, मारोती पवार, शंकर देशमुख, साहेबराव वाकोडे, तलाठी जोशी, शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले आहे. सूत्रसंचलन गोतम पोहरे यांनी केले. ग्रामसेवक आलेवाड यांनी आभार मानले आहे.

